श्री साईबाबा हॉस्पीटल मधील विविध ऑपरेशन थिएटर्स आणि अतिदक्षता विभागांमधील वातावरण ठराविक तापमानापर्यंत नियंत्रित रहावे. तसेच कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होऊ नये याकरीता एकुण १२ नग सेंट्रल ए.सी.यंत्रणा बसविण्यात आलेल्या असून त्या आहोरात्र चालतात. या सेंट्रल ए.सी. यंत्रणेच्या बाहेरील मशिनरींपासून हॉस्पीटलच्या आतील अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटरर्स पर्यंत एका डक्टव्दारे थंड हवा आत सोडली जाते व आतील गरम हवा दुस-या डक्टव्दारे बाहेर काढली जाते.

सेंट्रल एअर कंडिशन यंत्रणेच्या डक्टव्दारे हवा आत सोडण्याच्या वेळेस हवेतील अतिसुक्ष्म धुलीकण फिल्टरव्दारे आत ओढले जातात. कालांतराने डक्टमध्ये धुलीकणांचा संचय होऊन ते आत जाण्या-या हवेच्या दाबाने आत लोटले जाऊन हॉस्पीटलमधील भागात पसरतात. त्यामुळे बसविण्यात आलेल्या सेंट्रल एअर कंडिशनिंग सिस्टिमचे डक्टचे दरवर्षी क्लिनिंग होणे गरजेचे आहे. सदरचे क्लिनिंग न झाल्यामुळे विविध ऑपरेशन थिएटर्समध्ये आणि अति दक्षता विभागामध्ये उपचार घेणा-या रुग्णांवर धुलीकणांचे इन्फेक्शन होऊ शकते. तरी सेंट्रल एअर कंडिशनिंग सिस्टिमच्या डक्टचे क्लिनिंग तातडीने करणे संदर्भात श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे.

त्यानुसार एअर कंडिशनिंगची अधिकृत सर्व्हिस डिलर मे.ब्लू स्टार लिमिटेड, मुंबई यांचे प्रतिनिधींनी समक्ष साईटवर भेट देऊन कामाची पाहणी करुन दिनांक २४-०८-२०१० रोजी कोटेशन सादर केलेले आहे. मे.ब्लू स्टार लिमिटेड, मुंबई यांनी कळविल्यानुसार डक्ट साफ करणेपूर्वीचे तसेच डक्ट साफ केलेनंतरचे व्हिडिओ रेकॉर्डींगची कॅसेट तयार करुन प्रत्यक्ष कामामधील फरक पाहता येईल. तसेच डक्ट पूर्ण साफ झाले किंवा नाही याची खातरजमा करुन घेता येईल तसेच डक्ट क्लिन झाल्यानंतर मे.ब्लू स्टार लिमिटेड, मुंबई यांचेमार्फत सर्टिफिकेट दिले जाईल. मे.ब्लू स्टार लिमिटेड हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील NADCA ( National Air Duct Cleaners Association) चे सदस्य आहेत. मे.ब्लू स्टार लिमिटेड,मुंबई यांनी सदर डक्ट क्लिनिंग कामाचा व खर्चाचा दिलेला तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | विभागाचे नांव | डक्ट सफाई करणेकरीता लागणारी वेळ | खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१) | न्युरो ऑपरेशन थिएटर १ | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ०२) | न्युरो ऑपरेशन थिएटर २ | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ०३) | न्युरो ऑपरेशन थिएटर पॅसेज | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ०४) | न्युरो आय.सी.सी.यु.वॉर्ड | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ०५) | आय.सी.सी.यु.वॉर्ड | १२ ते १६ तास | ३५,०००/- |
| ०६) | जी.आय.सी.यु.वॉर्ड | १२ ते १६ तास | ३५,०००/- |
| ०७) | सीव्हीटीएस ऑपरेश थिएटर | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ०८) | सीव्हीटीएस ऑपरेश थिएटर पॅसेज | १६ ते २४ तास | ४८,०००/- |
| ०९) | कार्डियाक रिकव्हरी वॉर्ड | १० ते १२ तास | २५,०००/- |
| १०) | अर्थो ऑपरेशन थिएटर | १० ते १२ तास | २५,०००/- |
| ११) | जनरल ऑपरेशन थिएटर क्र.०१ | १० ते १२ तास | २५,०००/- |
| १२) | जनरल ऑपरेशन थिएटर क्र.०१ | १० ते १२ तास | २५,०००/- |
| | | एकुण :- | ३,४३,०००/- |
| | | सर्व्हिस टॅक्स १०.३% | ३५,३२९/- |
| | | **एकुण खर्च :-** | **३,७८,३२९/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील डक्ट स्वच्छ करुन घेणेकामी मे.ब्लू स्टार लिमिटेड, मुंबई यांनी रक्कम रुपये ३,७८,३२९/- इतका खर्चाचे इस्टिमेट सादर केलेले आहे. तरी सदरचे काम मे.ब्लू स्टार लिमिटेड, मुंबई यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये ३,७८,३२९/- चे खर्चास

मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,सदरचे काम करणे अत्यंत गरजेचे असल्याने त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

०९) **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीओलॉजिस्टच्या कामकाजाचे सुधारित वेळापत्रक निश्चित करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सध्या डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा हे दान्ही पूर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहे. तसेच डॉ.राहुल पाटील, डॉ.मनोज चोपडा, डॉ.विनोद व्हिजन व डॉ.अनिरुध्द धर्माधिकारी हे व्हिजिटिंग कार्डीओलॉजिस्ट म्हणून सेवा देत आहे.

डॉ.गौरव वर्मा यांचा परिविक्षाधीन कालावधी संपलेला असून त्यांचे सदर कालावधीतील कामकाज समाधानकारक आहे. तसेच कॅथलॅब मधील सर्व Interventional Procedures ते स्वतंत्रपणे व परिणामरित्या करु शकतात, याबद्दल इतर कार्डीओलॉजिस्टने आपला अभिप्राय दिलेला आहे. त्यानुसार त्यांना स्वतंत्रपणे कामकाज करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. सध्या डॉ.हरिष बजाज यांना आठवडयातील चार दिवस व डॉ.गौरव वर्मा यांना आठवडयातून दोन दिवस ओपीडी कामकाज दिलेले आहे. डॉ.गौरव वर्मा यांचा परिविक्षाधीन कालावधी संपल्यामुळे कार्डीओलॉजी विभागातील कामकाज डॉ.वर्मा व डॉ.बजाज या दोघांमध्ये समानरित्या विभागून देणे प्रस्तावित आहे. प्रस्तावित सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कार्डीओलॉजिस्ट नाव | पूर्णवेळ / व्हिजिटिंग | ओपीडी वार | कॅथलॅब वार |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.हरिष बजाज | पुर्णवेळ | सोमवार, बुधवार, शुक्रवार | मंगळवार, गुरुवार, शनिवार |
| ०२ | डॉ.गौरव वर्मा | पुर्णवेळ | मंगळवार, गुरुवार, शनिवार | सोमवार, बुधवार, शुक्रवार |
| ०३ | डॉ.अनिरुध्द धर्माधिकारी | व्हिजिटिंग | शनिवार | शनिवार |
| ०४ | डॉ.मनोज चोपडा | व्हिजिटिंग | बुधवार | बुधवार |
| ०५ | डॉ.विनोद विजन | व्हिजिटिंग | शुक्रवार | शुक्रवार |
| ०६ | डॉ.राहुल पाटील | व्हिजिटिंग | पहिला व तिसरा सोमवार | पहिला व तिसरा सोमवार |

तसेच खालील नियमावलीच्या अधीन राहून कार्डीओलॉजिस्टच्या कामकाजाचे उपरोक्त सुधारित वेळापत्रक निश्चित करणे प्रस्तावित आहे.

०१) व्हिजिटिंग कार्डीओलॉजिस्ट अनुपस्थित राहिल्यास रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधित दिवसाचे कामकाज पूर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट उपरोक्त तक्त्याप्रमाणे ज्या कार्डीओलॉजिस्टचा वार असेल ते पाहतील.

०२) ज्या पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट चा ओपीडी वार असेल त्यांनी ओपीडी संपलेनंतर ऑनकॉल रहावे.

०३) ओपीडी व कॅथलॅब चे सुधारित वेळापत्रक तंतोतंत पाळावे.

०४) रुग्णाला भरती केलेनंतर विहीत पॅकेज कालावधीमध्ये सदर रुग्ण डिसचार्ज होईल याची दक्षता घ्यावी.

०५) सॅम्पल मिळालेले स्टेंट तसेच स्किमनुसार उपलब्ध झालेले मोफत स्टेंट वापरण्यापूर्वी वैद्यकीय संचालक यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

०६) जीवनदायी रुग्णांसाठी स्टेंट वापरतांना जीवनदायी संदर्भातील नियमावली काटेकोर पाळणे आवश्यक आहे.

०७) डॉ.बजाज व डॉ.वर्मा रविवारी आळी-पाळीने ऑनकॉल राहतील.

०८) पोर्टेबल इको मशिनचा वापर हा ओपीडी वेळेनंतर व तातडीच्या वेळीच केला जावा.

०९) व्हिजिटिंग कार्डीओलॉजिस्टने फक्त त्यांच्या नावानेच रेफर झालेल्या केसेस पाहाव्यात, इतर नियमित केसेस या पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्टने बघाव्यात.

१०) व्हिजिटींग कार्डीओलॉजिस्टने यांनी त्यांची व्हिजिट रद्द केल्यास रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आगाऊ पूर्व कल्पना रिसेप्शन तसेच रुग्णालय प्रशासनाकडे देणे बंधनकारक आहे.

११) एखाद्या कार्डीओलॉजिस्टकडे त्यांचा ओपीडी वार नसतांना त्यांच्या नावाने रेफर पत्र घेऊन रुग्ण आल्यास वैद्यकीय संचालक यांचे पूर्व परवानगीने सदर रुग्ण तपासता येईल.

१२) कॅथलॅबच्या कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते रात्री १०.०० पर्यंत असेल.

तरी उपरोक्तप्रमाणे कार्डीओलॉजिस्ट यांचे सुधारित वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०४ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे जुलै-२०१०**

**(ब) माहे जुलै-२०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जुलै-ऑगस्ट २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जुलै-२०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे जुलै,२०१० मधील जमा रु.२५,८७,७१,६४०/- आणि खर्च रुपये १०,२६,१४,०१५/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील जुलै,२०१० रुपये २,७९,९४९/- चा तक्ता, दिनांक ३१.०८.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ४८४,३९,१५,३४९/- चा तक्ता, माहे जुलै-ऑगष्ट,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे एकूण रुपये १०,१७,३५,४८७/-व रुपये ९,५३,४२,६६९/- देणगीचा तक्ता, माहे जुलै-ऑगष्ट,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा अनुक्रमे रुपये ३,३७,९९६/- व रुपये २,३२,६२५/-चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जुलै-२०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुलै,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २२,४९,५६०/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जुलै,२०१० मध्ये रुपये ३९,१८,८००/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०१० मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे जुलै, २०१० मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुपये ४६,१६३/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४२,९५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०५. माहे माहे जुलै-२०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे जुलै,२०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४८,००० कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०७ पाणी तपासणी अहवाल.**

(F) माहे जुलै-ऑगष्ट,२०१० मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६७९ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**विषय नं.०५ पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शनलाईन मंडपामध्ये विद्युतीकरण करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शनलाईन मंडपामध्ये विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,१०,२७४.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २२-०५-२०१० चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.११ निर्णय क्र.५०७

अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव. |
| ०२ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०३ | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शनलाईन मंडपामध्ये विद्युतीकरणाचे काम करुन घेणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(कामाची अंदाजे रक्कम रुपये ३,१०,२७४/-)

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नांव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव. | २,७९,२४७/- | २,७९,२४७/- |
| ०२ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,७७,६९५/- | २,७१,४९०/- |
| ०३ | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,८२,३४९/- | २,५१,३२२/- |

**निर्णय क्र. ६८० यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्रीसाईश्रद्धा इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६ श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता स्प्लिट ए.सी. खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल मधील नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर करिता २ टन क्षमतेचे ९ स्प्लिट ए.सी. खरेदी करणेबाबतचा दि.१८.०६.२०१० रोजीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर ए.सी. खरेदीस व त्याकामी येणार अंदाजे खर्च रु.२,७०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन उप समितीचे दि.२७.०५.२०१० चे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा.क्र.८५५२/ २२.०७.२०१० नुसार नियमित पुरवठाधारकांकडून कोटेशनची मागणी करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे मुदतीअंती खालील पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| **अ.क्र.** | **पुरवठाधारकाचे नांव** |
|---|---|
| ०१. | शितल एअर कंडीशनर्स, राहुरी |
| ०२. | स्वास्तिक रेफ्रिजरेशन, नाशिक |
| ०३. | अमित एंटरप्रायझेस, श्रीरामपुर |
| ०४. | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक |
| ०५. | समर एजन्सी, जळगांव (Open) |
| ०६. | मे.कुल ब्रीज, पुणे (Late) |

उपरोक्त पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झालेले आहेत. पैकी अ.क्र.५ समर एजन्सी, जळगांव यांचेकडून प्राप्त कोटेशनचे पाकिटावर कोटेशनबाबत कुठल्याही प्रकारचा उल्लेख नसल्यामुळे सदरचे कोटेशन आवक विभागामार्फत उघडण्यात आले आहे. त्यामुळे सदरचे कोटेशन हे उघडलेल्या स्थितीमध्ये प्राप्त झालेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | | | चर्चेअंती देऊ केलेले एकूण दर रुपये (व्हॅटसह) |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ दर | इंस्टॉलेशन चार्जेस रु. | एकुण दर व्हॅटसह | |
| ०१. | शितल एअर कंडीशनर्स, राहुरी | २८,०००/- | १५००/- प्रति नग + स्टँड ५००/- | ३०,०००/- + जादा पाईप रु.१४०/- मीटर | ३०,०००/-+ जादा पाईप |
| ०२. | स्वास्तिक रेफ्रिजरेशन, नाशिक | २६,९५०/- | १०००/- प्रति नग + स्टँड ५००/- | २८,४५०/- + जादा पाईप ४मीटर नंतर रु.६५०/-र.मि. | २८,४५०/- + जादा पाईप रु.६००/- र.मि. |
| ०३. | अमित एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ३०,०००/- | १०००/- प्रति नग | ३१,०००/- | अनुपस्थित |
| ०४. | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | २९,१५५/- ५% कमी २७,६९७/- | १५००/- प्रति नग | ३०,६५५/- + जादा पाईप रु.५५०/-र.मि. | रु.२९,१९७/- + जादा पाईप |
| ०५. | समर एजन्सी, जळगांव (Open) | २८,९९०/- | १०००/- प्रति नग + स्टँड ६००/- | ३०,५९०/- | अनुपस्थित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६. | मे.कुल ब्रीज, पुणे (Late) | २८,२००/- | १५००/- प्रति नग + स्टँड ७५०/- | ३०,४५०/- + जादा पाईप रु.६००/- मिटर | अपात्र |

**निर्णय क्र. ६८१ यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. स्वास्तिक रेफ्रिजरेशन, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक खरेदी/विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ नवीन भक्तनिवासस्थान येथील रुममध्ये इलेक्ट्रीकल मेंटेनन्स करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** नविन भक्तनिवासस्थान येथील रुममधील वायरींगचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ४,०८,२२२/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता.या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २२-०५-२०१० चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.३८ निर्णय क्र.४८३ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव. |
| ०२) | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे नविन भक्तनिवासस्थान येथील रुममधील वायरींगचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(कामाची अंदाजे रक्कम रुपये ४,०८,२२२/-)

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नांव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव. | ३,६३,३१८/- | ३,५७,०००/- |
| ०२ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,४०,८६५/- | ३,२६,५७८/- |
| ०३ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,७१,४८२/- | ३,१०,२४९/- |

**निर्णय क्र. ६८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ०८ साईटेक प्रोजेक्ट सेंटरचे विद्युतीकरण कामाकरीता प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रोजेक्ट सेंटरचे विद्युतीकरण कामाकरीता व येणा-या रक्कम रु. ६,५४,८३१/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/०८/२०१० चे सभेतील निर्णय क्र.६६५ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या रुपये ५,००,०००/- चे खर्चास व याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार काम तातडीचे असल्याने जा.नं.एसएसएस / विद्युत / ९०९८/२०१० दिनांक १९-०८-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे पाच कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०२ | मे.ज्योत इलेक्ट्रीकल इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक |
| ०३ | मे.नुपूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०४ | मे.योगेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०५ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रोजेक्ट सेंटरचे विद्युतीकरणाचे काम करुन घेणेसाठी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(कामाची अंदाजे रक्कम रुपये ६,५४,८३१/-)

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील परसेंटेज दर | कोटेशन्समधील परसेंटेज दरानुसार होणारी रक्कम रु. | चर्चा/वाटाघाटी-नंतरचे परसेंटेज दर | चर्चा/वाटाघाटीनंतरचे परसेंटेज दरानुसार होणारी रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १३ % कमी | ५,६९,७०३/- | २०.५ % कमी | ५,२०,५९१/- |
| ०२ | मे.ज्योत इले. इंजि. ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | १७ % कमी | ५,४३,५१०/- | १८ % कमी | ५,३६,९६१/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | मे.नुपूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ९ % कमी | ५,९५,८९६/- | EMD न भरल्याने अपात्र | EMD न भरल्याने अपात्र |
| ०४ | मे.योगेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ८ % कमी | ६,०२,४४५/- | EMD न भरल्याने अपात्र | EMD न भरल्याने अपात्र |
| ०५ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव | ६ % कमी | ६,१५,५४१/- | ८ % कमी | ६,०२,४४५/- |

**निर्णय क्र. ६८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावर दिनांक ७.०८.२०१० च्या सभेत चर्चा होऊन, निर्णय क्र ६६५ अन्वये रुपये ६,५४,८३१/- चे खर्चाऐवजी काम तातडीने असल्याने रुपये ५,००,०००/- पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. कामाचे टेंडर हे आयटेम रेटवर नसुन परसेंटेज रेटवर होते. त्यामूळे वरील तक्त्यात रुपये ६,५४,८३१/- चे खर्चाऐवजी रुपये ५,००,०००/- चे (प्रत्यक्ष टेंडर एस्टिमेट रुपये ४,९४,४५९/-) खर्चाचे अधिन राहून कोटेशन्सधारकांनी देऊ केलेले परसेंटेज दर ग्राह्य धरल्यास होणाऱ्या अंतिम दरपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे -**

| अ.नं. | कोटेशनससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्स-मधील परसेंटेज दर | कोटेशन्समधील परसेंटेज दरानुसार होणारी रक्कम रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतरचे परसेंटेज दर | चर्चा/वाटाघाटीनंतरचे परसेंटेज दरानुसार होणारी रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १३ % कमी | ४,३०,१७९/- | २०.५ % कमी | ३,९३,०९५/- |
| ०२ | मे.ज्योत इले. इंजि. ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | १७ % कमी | ४,१०,४०१/- | १८ % कमी | ४,०५,४५६/- |
| ०३ | मे.नुपूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ९ % कमी | ४,४९,९५८/- | अपात्र | अपात्र |
| ०४ | मे.योगेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ८ % कमी | ४,५४,९०२/- | अपात्र | अपात्र |
| ०५ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव | ६ % कमी | ४,६४,७९१/- | ८ % कमी | ४,५४,९०२/- |

**उपरोक्त तक्त्यानुसार मे स्वरांजली इलेक्ट्रीकल,नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०९ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये वाढीव ऑक्सीजन पाईपलाईन कामाकरीता प्राप्त कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक शस्त्रक्रियेची संख्या सतत वाढतच असल्याने सध्या रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी कमीत कमी ३ महिने पर्यंत प्रतिक्षा करावी लागते. या सर्व बाबींचा विचार करीता श्री साईबाबा रुग्णालयात आणखी एक ऑपरेशन थिएटर लवकरात लवकर सध्याचे ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर विभागात कार्यान्वित करणे, श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर, ओ.पी.डी., ई.एन.टी. ऑपरेशन थिएटर इत्यादी कार्यान्वीत करण्यासाठी लागणाऱ्या सर्व मशिनरी/उपकरणे / इन्स्ट्रुमेंट/ फर्निचर इत्यादी खरेदी करण्याचे सर्व अधिकार वैद्यकिय संचालक व स्थानिक विश्वस्ताचे समितीस दि.०६/०३/२०१० चे मा. व्यवस्थापन समिती सभेत प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक आसणाऱ्या मशिनरी/उपकरणे/इन्स्ट्रुमेंट/फर्निचर इ. ची कामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१७.०४.२०१० अखेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे कार्डीयाक ओ.टी. मध्ये सहा ते आठ खाटांचे रिकव्हरी वार्ड तयार करावयाचे आहे.त्यामुळे तेथे ऑक्सीजन, सक्शन, एयर कॉम्प्रेसर इ. चे पॉईंट प्रत्येक खाटाजवळ बसवावे लागणार आहे. त्यासाठी सध्याच्या ऑक्सीजन पाईप लाईनमध्ये वाढीव काम करुन घ्यावे लागणार आहे.

दि.२२/०५/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत श्री साईबाबा हॉस्पिटलचे नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागासाठी वाढीव ऑक्सीजन पाईप लाईन कामाकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. १३२० दि. ०१/०७/२०१० अन्वये एकुण ८ कोटेशन धारकांकडून दि.१७/०७/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरुन ३ कोटेशन प्राप्त झालेले होते, ते खालीलप्रमाणे-

०१) मे. युनायटेड सर्जिकल, ठाणे (प्राप्त दि. २४/०७/२०१०)

०२) मे. अल-मेड इक्विपमेंट, मुंबई (प्राप्त दि. २०/०७/२०१०)

०३) मे. जाम्बोटकर मेडीक्वीप प्रा. लि., मुंबई (प्राप्त दि. १३/०७/२०१०)

उपरोक्त प्रमाणे प्राप्त ०३ सिलबंद कोटेशन दि. ०५/०८/२०१० रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. सदर कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून तो सोबत सादर केलेला आहे. प्राप्त तीनही कोटेशनधारकांनी यापुर्वी आपणाकडे काम केलेले आहे व त्यांचे काम समाधानकारक आहे. परंतु मे.जाम्बोटकर मेडीक्वीप प्रा. लि., मुंबई यांनी त्यांचे कोटेशनमध्ये जर आपणाकडून साईट तयार नसेल व त्यांचे कर्मचाऱ्यांना येथे राहण्याची वेळ आल्यास त्यांना दररोज रु. १०००/- आम्ही संस्थानकडून घेऊ अशी अट घातलेली आहे. परंतु चर्चा/वाटाघाटीसाठी बोलवून जर ते सदरची अट माघार घेत असतील तर त्यांचा विचार करावा अन्यथा त्यांचे कोटेशन अमान्य करता येईल.

तुर्तास तिनही कोटेशन धारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी आजचे सभेपुढे समक्ष बोलवून किती निम्नत्तम दर प्राप्त होतात याचा विचार करुन निर्णय घेता येईल. असा प्रस्ताव सादर केला होता.

उपरोक्त चर्चा/वाटाघाटीसाठी मे.जाम्बोटकर मेडीक्वीप प्रा. लि., मुंबई यांनी ०४/०९/२०१० चे फॅक्स पत्रान्वये आम्ही सभेस उपस्थित राहू शकत नाही असे कळविले आहे उर्वरीत दोन कोटेशन धारक आजचे सभेपुढे उपस्थित होते. मे. अल-मेड इक्विपमेंट, मुंबई यांनी त्यांचे कोटेशन मधील दरावर १५% तर मे. युनायटेड सर्जिकल, ठाणे यांनी २% सूट दिलेली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| **Sr. No.** | **Description** | **Qty** | **Jambotkar Medequip Pvt. Ltd., Mumbai** | | | **Al-Med Equipments, Mumbai** | | | | **United Surgical, Thane** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Rate Per in Rs.** | **Rate After Negotiation** | **Total Amt. in Rs.** | **Mfg.** | **Rate Per in Rs.** | **Rate After Negotiation** | **Total Amt. in Rs.** | **Rate Per in Rs.** | **Rate After Negotiation** | **Total Amt. in Rs.** |
| 1 | 15 mm OD Copper Pipe for O2, Air & Vac. | 150 Mtrs. | 490.00 | Nil | 73500.00 | | 600.00 | 510.00 | 76500.00 | 390.00 | 382.20 | 57330.00 |
| 2 | 12 mm OD Copper Pipe for O2, Air & Vac. | 30 Mtrs. | 300.00 | Nil | 9000.00 | | 350.00 | 297.50 | 8925.00 | 350.00 | 343.00 | 10290.00 |
| 3 | Outlet Point, Schrader type (O2, Vac, 8 each) (Air :4 Nos.) | 20 Nos. | 1260.00 | Nil | 25200.00 | HMP Medical | 1000.00 | 850.00 | 17000.00 | 950.00 | 931.00 | 18620.00 |
| 4 | 15 mm Isolation Valve (Air : 1 No) | 1 No. | 925.00 | Nil | 925.00 | | 800.00 | 680.00 | 680.00 | 1200.00 | 1176.00 | 1176.00 |
| 5 | BPC Flowmeter Single having chrome plated metal body and with Humidifier. | 8 Nos. | 1445.00 | Nil | 11560.00 | HMP Medical | 1100.00 | 935.00 | 7480.00 | 1450.00 | 1421.00 | 11368.00 |
| 6 | Vacuumeter Minor with 600ml jar | 8 Nos. | 2575.00 (Polycarb | Nil | 20600.00 | HMP Medical | 3000.00 | 2550.00 | 20400.00 | 3100.00 | 3038.00 | 24304.00 |
| | **Total Amt.After Negotiation in Rs.-** | | | | **140785.00** | | | | **130985.00** | | | **123088.00** |
| | Warranty – | | One Year | | | | | | | 1 Year from date of Installation | | |
| | AMC | | | | | | | | | 5% Cost of Project | | |
| | CMC | | | | | | | | | 30% Cost of Project | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | If work remain idle due to site conditions we will charge Rs.1000/- per day or part therefore. | | | | | | | |
| | Payment | | 60% Advance against the order & balance 40% within 2 weeks after receipt of invoice. | | | | | | | |

**निर्णय क्र. ६८४ यावर चर्चा होऊन मे. युनायटेड सर्जिकल, ठाणे यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा आणि प्रत्यक्ष होणारी मोजमापे व कामाप्रमाणे त्यांना बील आदा करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे वार्षिक कार्यालयीन स्टेशनरी कामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी लागणाऱ्या आवश्यक कार्यालयीन स्टेशनरी व साहित्याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २२.०५.२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.४७६ अन्वये एकूण रु. २,५४,९३० /- चे खर्चास व विहित पध्दतीने कोटेशन मागवून घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे स्टेशनरी खरेदीकामी एकूण ९ पुरवठा धारकांकडून इकडील पत्र क्र. १०७१ दि. १९.०६.२०१० अन्वये सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यानुसार सदरचे खरेदी कामी ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१) क्लासिक स्टेशनर्स, मुंबई ( बंद कोटेशन प्राप्त दि.०२.०७.२०१०)

०२) ज्योती बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर्स, नाशिक ( बंद कोटेशन प्राप्त दि.०६.०७.२०१०)

०३) शिरोडे ॲण्ड सन्स, कोपरगांव ( बंद कोटेशन प्राप्त दि.१३.०७.२०१०)

उपरोक्त प्रमाणे ३ सिलबंद निविदा हया मा. उपकार्यकारी अधिकारी सो, यांचे समक्ष दि. २३.०७.२०१० रोजी उघडण्यात आल्या होत्या. सदर कोटेशनचा मुळ तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो सोबत सादर केला आहे.

सदरहू कोटेशन धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलावण्यात आलेले असून सदर निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

आजचे सभेपुढे तीनही कोटेशन धारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते त्यांनी देऊ केलेली सूट खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशिल | कंपनी | खरेदी नग | शिरोडे ॲन्ड सन्स, कोपरगाव | | | | ज्योती बुक सेलर्स ॲन्ड स्टेशनर्स, नाशिक | | | | क्लासिक स्टेशनर्स कं., मुंबई | | | | एकुण किंमत निम्नतम दरानुसार रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कंपनी | दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर | सुट्टीनंतर चे एकुण किंमत रु. | कंपनी | दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर | सुट्टीनंतर चे एकुण किंमत रु. | कंपनी | दर प्रती नग रु. | च चर्चेअंती देऊ केलेले दर र.पं. | सुटी नंतरचे एकुण किंमत रु. | |
| १ | मार्कर पेन (मोठी साईज रंग काळा) | कॅमल / कोरस | २४ नग | कॅमल / कोरस | १३.६५ | **१२.५६** | **३०१.३९** | कॅमल | १३.५० | १३.३७ | ३२०.७६ | कॅमल / कोरस | १९.९६ | १७.६३ | ४२३.०५ | ३०१.३९ |
| २ | सी.डी. मार्कर पेन (लहान पॉईंट रंग काळा) | कॅमल / कोरस | १०० नग | कॅमल / कोरस | १२.०६ | **११.१०** | **११०९.५२** | कॅमल | ११.२५ | ११.१४ | १११३.७५ | कॅमल / कोरस | १४.७० | १३.५२ | १३५२.४० | ११०९.५२ |

| १६ | १५ | १४ | १३ | १२ | ११ | १० | ९ | ८ | ७ | ६ | ५ | ४ | ३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टिस्को टेप | स्टॅपलर मोठे (नं. ५५५) | स्टॅपलर लहान ( नं - १० ) | स्टॅम्प पॅड इंक निळी बाटली २५ml | ५ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | २ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रबर बॅण्ड - ४ इंच | रबर बॅण्ड - २ इंच | व्हाईटनर पेन -१० ml | स्टॅपलर पीन मोठी | स्टॅपलर पीन लहान | शॉर्पनर | खोडरबर लहान | एच.बी.पेन्सील (एका पॅकेटमध्ये १० नग) |
| | कांगारु | कांगारु | कॅमल / कोरेस | रजत / ओसवाल | रजत / ओसवाल | STANDAR | STANDARD | मल / कोरेस | कांगारु | कांगारु | नटराज | नटराज - | नटराज - ६२१ |
| ३६ नग | १८ नग | १८ नग | ३९ नग | १०६ नग | १३० नग | ३ किलो | ५ किलो | ५६ नग | २० पॅकेट | ११०० पॅकेट | ५० नग | ५० नग | २०० नग |
| | कांगारु | कांगारु | कॅमल / कोरेस | रजत / ओसवाल | रजत / ओसवाल | STANDARD | STANDARD | कॅमल / कोरेस | कांगारु | कांगारु | नटराज | नटराज - ६२१ प्लास्टो | नटराज - ६२१ |
| ७.८७ | ६७.५० | २२.५० | १०.७४ | १२७.१ | ४३.४७ | १८०.०० | १८०.०० | २१.३७ | ९.५३ | ४.५० | २.७३ | ०.८९ | २.७३ |
| ७.२४ | **६२.१०** | **२०.७०** | **९.८८** | **११६.८९** | **३९.९९** | **१६५.६०** | **१६५.६०** | **१९.६६** | **८.७७** | **४.१४** | २.५१ | **०.८२** | **२.५१** |
| २६०.६५ | **१११७.८०** | **३७२.६०** | **३८५.३५** | **१२३८९.९२** | **५१९९.०१** | **४९६.८०** | **८२८.००** | **११००.९८** | **१७५.३५** | **५५४.००** | १२५.५८ | **४०.९४** | **५०२.३२** |
| ३ m Scoth | कांगारु | कांगारु | कॅमल | ओसवाल | ओसवाल | STANDARD | STANDARD | कॅमल | कांगारु २४१६ | कांगारु नं.१० | कॅमलीन | कॅमलीन | कॅमलीन |
| ४.८० | ७५.०० | ३८.०० | १०.६५ | १६०.०० | ६४.०० | १९५.०० | १९५.०० | २०.६३ | १०.४० | ५.१५ | २.२५ | २.२५ | २.९६ |
| **४.७५** | ७४.२५ | ३७.६२ | १०.५४ | १५८.४० | ६३.३६ | १९३.०५ | १९३.०५ | २०.४२ | १०.३० | ५.१० | **२.२३** | २.२३ | २.९३ |
| **१७१.०७** | १३३६.५० | ६७७.१६ | ४११.२० | १६७९०.४० | ८२३६.८० | ५७९.१५ | ९६५.२५ | ११४३.७३ | २०५.९२ | ५६०८.३५ | **१११.३८** | १११.३८ | ५८६.०८ |
| | कांगारु | कांगारु | कॅमल / कोरेस | रजत / ओसवाल | रजत / ओसवाल | STANDARD | STANDARD | कॅमल / कोरेस | कांगारु | कांगारु | नटराज | नटराज - ६२१ प्लास्टो | नटराज - ६२१ |
| ५५.६५ | ७३.१३ | २२.५० | १२.३८ | २८८.७५ | ११७.६० | १९१.२५ | १९१.२५ | २३.३५ | ११.८१ | ५.४० | २.८३ | ०.९५ | २.९४ |
| ५१.२० | ६७.२८ | **२०.७०** | ११.३९ | २६५.६५ | १०८.१९ | १७५.९५ | १७५.९५ | २१.४८ | १०.८७ | ४.९७ | २.६० | ०.८७ | २.७० |
| १८४३.१३ | १२११.०३ | ३७२.६० | ४४४.१९ | २८१५८.९० | १४०६४.९६ | ५२७.८५ | ८७९.७५ | १२०२.९९ | २१७.३० | ५४६४.८० | १३०.१८ | ४३.७० | ५४०.९६ |
| १७१.०७ | १११७.८० | ३७२.६० | ३८५.३५ | १२३८९.९२ | ५१९९.०१ | ९६.८० | ८२८.०० | ११००.९८ | १७५.३५ | ४५५४.०० | १११.३८ | ४०.९४ | ५०२.३२ |

| २७ | २६ | २५ | २४ | २३ | २२ | २१ | २० | १९ | १८ | १७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| TONNER FOR RICOH XEROX MACHINE NO. २०२० D | OPC DEVEPLOER FOR RICOH XEROX MACHIN NO. २०२० D | OPC DRUM FOR RICOH XEROX MACHIN NO. २०२० D | स्टॅम्प पॅड इंक (निळा रंग, २५ml.) | झेरॉक्स पेपर २९७ mm x २१० mm (A४ साईज) ७० Gsm मॅपलिथो | झेरॉक्स पेपर लिगल ३४५ mm x २१५ mm (FS) ७० Gsm मॅपलिथो | बॉक्स फाईल (लॅमिनेशनसह) | डिंक बाटली ७०० ml | डिंक बाटली ३०० ml | पिन कुशन | खाका टेप -२ इंच |
| RICOH - | RICOH | RICOH | कॅमल / कोरेस | (जे. के. कॉपीयर) हिरव्या रंगात | (जे. के. कॉपीयर) लाल रंगात पॅकींग | JYOTI / TANDARD | कॅमल | कॅमल | | |
| १८ नग | ०२ नग | ०२ नग | ३६ नग | ३२० रिम | ५३० रिम | ३०० नग | २५ नग | २५ नग | २४ नग | ६० नग |
| RICOH - १२३० D, | RICOH | RICOH | कॅमल / कोरेस | (जे. के. कॉपीयर) हिरव्या रंगात पॅकींग | (जे. के. कॉपीयर) लाल रंगात पॅकींग | JYOTI/ STAN DARD | कॅमल | कॅमल | | |
| ७८७.५० | २१००.०० | १०५०.०० | १०.७४ | १३३.३५ | १५६.०० | ६७.५० | १०५.०० | ४४.०० | १३.५० | १४.६२ |
| **७२४.५०** | **१९३२.००** | **९६६.००** | **९.८८** | १२२.६८ | **१४३.५२** | ६२.१० | ९६.६० | ४०.४८ | १२.४२ | **१३.४५** |
| **१३०४१.००** | **३८६४.००** | **१९३२.००** | **३५५.७१** | ३९२५८.२४ | **७६०६५.६०** | १८६३०.०० | २४१५.०० | १०१२.०० | २९८.०८ | **८०७.०२** |
| | | | कॅमल | (जे. के. कॉपीयर) हिरव्या रंगात पॅकींग | (जे. के. कॉपीयर) हिरवा रंगात पॅकींग | JYOTI | कॅमल | कॅमल | | ३m |
| NQ | NQ | NQ | १०.६५ | १२०.०० | १५०.०० | ६५.०० | ८१.१८ | ४२.६५ | ११.५० | २०.८० |
| | | | १०.५४ | **११८.८०** | १४८.५० | ६४.३५ | ८०.३७ | ४२.२२ | **११.३९** | २०.५९ |
| ०.०० | ०.०० | ०.०० | ३७९.५७ | **३८०१६.००** | ७८७०५.०० | १९३०५.०० | २००९.२१ | १०५५.५९ | **२७३.२४** | १२३५.५२ |
| RICOH - १२३० D, CODE NO. ८८८२१६ | RICOH | RICOH | कॅमल / कोरेस | (जे. के. कॉपीयर) हिरव्या रंगात पॅकींग | (जे. के. कॉपीयर) लाल रंगात पॅकींग | JYOTI / STANDA RD | कॅमल Past पांढरी डिप | कॅमल Past पांढरी डिप | | |
| ११८१.२५ | ३२४०.०० | १३३३.१२ | १२.३८ | १३६.५० | १८३.७५ | ६४.१२ | ३९.६५ | २५.०० | १८.०० | २६.२५ |
| १०८६.७५ | २९८०.८० | १२२६.४७ | ११.३९ | १२५.५८ | १६९.०५ | **५८.९९** | **३६.४८** | **२३.००** | १६.५६ | २४.१५ |
| १९५६१.५० | ५९६१.६० | २४५२.९४ | ४१०.०३ | ४०१८५.६० | ८९५९६.५० | **१७६९७.१२** | **९११.९५** | **५७५.००** | ३९७.४४ | १४४९.०० |
| १३०४१.०० | ३८६४.०० | १९३२.०० | ३५५.७१ | ३८०१६.०० | ७६०६५.६० | १७६९७.१२ | ९११.९५ | ५७५.०० | २७३.२४ | ८०७.०२ |

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | हाफ बॉक्स फाईल | | ५० नग | | ३७.१२ | ३४.१५ | १७०७.५२ | Dhandai | ४३.८५ | ४३.४१ | २१७०.५८ | | ३६.०० | ३३.१२ | १६५६.०० | १६५६.०० |
| २९ | फोर फ्लॅप पॅड | | १०० नग | | १६.८७ | १५.५२ | १५५२.०४ | | २२.६० | २२.३७ | २२३७.४० | | २०.२५ | १८.६३ | १८६३.०० | १५५२.०४ |
| ३० | निळी कार्बन बॉक्स २१०mm x ३३०mm | कॅमल | १० नग | कॅमल IMPRESS | ११५.५० | १०६.२६ | १०६२.६० | कॅमल IMPRESS | १२५.०० | १२३.७५ | १२३७.५० | कॅमल IMPRESS | १४०.६२ | १२९.३७ | १२९३.७० | १०६२.६० |
| ३१ | डबल साईड कार्बन बॉक्स काळी २१०mm x ३३०mm | कॅमल IMPRESS | ०६ नग | कॅमल IMPRESS | २३३.१० | २१४.४५ | १२८६.७१ | कॅमल IMPRESS | २५०.०० | २४७.५० | १४८५.०० | कॅमल IMPRESS | १४६.२५ | १३४.५५ | ८०७.३० | ८०७.३० |
| ३२ | प्लॅस्टीक पट्टी | कॅमल / | ०६ नग | कॅमल / कोरेस | ७.२८ | ६.७० | ४०.१९ | कॅमल ३० cm | ७.३५ | ७.२८ | ४३.६६ | कॅमल / कोरेस | ११.२५ | १०.३५ | ६२.१० | ४०.१९ |
| ३३ | टाचणी (६० Gm. पॅकेट) | कोरेस | ३० बॉक्स | कोरेस | १२.९३ | ११.९० | ३५६.८७ | कोरेस ७० gm | २४.५० | २४.२६ | ७२७.६५ | कोरेस | १३.५० | १२.४२ | ३७२.६० | ३५६.८७ |
| ३४ | १ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत / | १० नग | रजत / ओसवाल | २७.७२ | २५.५० | २५५.०२ | ओसवाल | ३२.०० | ३१.६८ | ३१६.८० | रजत / ओसवाल | ६३.०० | ५७.९६ | ५७९.६० | २५५.०२ |
| ३५ | ३ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत / ओसवाल | १० नग | रजत / ओसवाल | ७२.७६ | ६६.९४ | ६६९.३९ | ओसवाल | ९६.०० | ९५.०४ | ९५०.४० | रजत / ओसवाल | १७३.२५ | १५९.३९ | १५९३.९० | ६६९.३९ |
| ३६ | हजेरी मस्टर (२ कॉयर) | रजत / ओसवाल | १० नग | रजत / ओसवाल | ८८.२० | ८१.१४ | ८११.४४ | ओसवाल | ८४.०० | ८३.१६ | ८३१.६० | रजत / ओसवाल | १३६.५० | १२५.५८ | १२५५.८० | ८११.४४ |
| ३७ | स्टॅम्प पॅड मोठी साईज | कॅमल | १० नग | कॅमल | ३८.५० | ३५.४२ | ३५४.२० | कॅमल No.३ | ३७.५० | ३७.१३ | ३७१.२५ | कॅमल | ४७.२५ | ४३.४७ | ४३४.७० | ३५४.२० |
| ३८ | पॅकिंग पट्टी | | १० किलो | | ६०.०० | ५५.२० | ५५२.०० | | NQ | | ०.०० | | ९९९.०० | ९१९.०८ | ९१९०.८० | ५५२.०० |
| ३९ | पॅकिंग क्लिप लोखंडी | | १० किलो | | ६०.०० | ५५.२० | ५५२.०० | | NQ | | ०.०० | | ९९९.०० | ९१९.०८ | ९१९०.८० | ५५२.०० |
| | | | | | | | | | | | | | | | एकुण क्कम रु. | १९१०६४.१२ |

**निर्णय क्र. ६८५ यावर चर्चा होऊन उपरोक्त पैकी आयटम प्रमाणे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११ नवीन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्सकरीता मशिनरी /उपकरणे खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नविन अत्याधूनिक ॲम्बूलन्स खरेदी करणेबाबतची कार्यवाही संस्थानचे वाहन विभागामार्फत सुरु आहे. कार्डीयाक ॲम्बूलन्समध्ये आवश्यक असणाऱ्या सुविधा व आवश्यक त्या ॲक्सेसरीज उदा. फोल्डींग स्ट्रेचर, स्कुप स्ट्रेचर, स्पाईन बोर्ड इ. वाहन विभागाकडून ॲम्बूलन्स बरोबर उपलब्ध होणार आहेत, परंतु सदरचे ॲम्बूलन्समध्ये लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे हॉस्पिटल मार्फत उपलब्ध करुन द्यावयाची आहे. त्यानुसार मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.९,२५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर ॲम्बूलन्समध्ये लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे खर्च रु.९,२५,०००/- असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक २०७ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस, मुंबई, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून ०५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

सदरच्या बंद निविदा ह्या दि. ०३.०४.२०१० चे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदरचे तुलनात्मक तक्त्यामध्ये
०१) Transport Ventilator - Qty.०१ करीता एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्यामध्ये मे.एक्सेल सर्व्हीसेस,मुंबई व मे.विप्रो जीई हेल्थकेअर,मुंबई यांनी आपले स्पेसिफीकेशनप्रमाणे दर दिलेले आहे व ते नामांकित कंपन्याचे आहे तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मशिनरीवरुन त्यांचा सध्याचा अनुभव चांगला आहे.
०२) Multiparameter Monitor-Qty-०१ करीता एकुण ०५ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये मे.विप्रो जीई हेल्थकेअर,मुंबई , मे.एक्सेल कॉर्पोरेशन,नाशिक व मे.सायरोनीक्स इन्स्ट्रुमेंट,पुणे यांनी आपले स्पेसिफीकेशनप्रमाणे दर दिलेले आहे व ते नामांकित कंपन्याचे आहे तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मशिनरीवरुन त्यांचा सध्याचा अनुभव चांगला आहे.
०३) Defibrillator-Qty-०१ करीता एकुण ०४ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये मे.एक्सेल सर्व्हीसेस, मुंबई, मे.विप्रो जीई हेल्थकेअर,मुंबई, मे.एक्सेल कॉर्पोरेशन,नाशिक व मे.सायरोनीक्स, पुणे यांनी आपले स्पेसिफीकेशनप्रमाणे दर दिलेले आहे व ते नामांकित कंपन्याचे आहे तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मशिनरीवरुन त्यांचा सध्याचा अनुभव चांगला आहे.
त्यांची प्राधन्याप्रमाणे माहिती खालील प्रमाणे.

01) Transport Ventilator- Qty.-01

| **Priority** | Priority -I | Priority -II |
|---|---|---|
| **Name of Supplier** | Excel Services, Mumbai | Wipro GE, Mumbai |
| **Make** | Max Meditech | Own |
| **Model** | MX40P | I Vent 101 |
| **Rate Per in Rs.** | Rs.2,38,350.00 | Rs.3,95,000.00 |

02) Multiparameter Monitor- Qty-01

| **Priority** | Priority –I | Priority -II | Priority -III |
|---|---|---|---|
| **Name of Supplier** | Wipro GE, Mumbai | Excel Corporation, Nashik | Cyronics Instrument, Pune |
| **Make** | Own | L&T, Medical | Philips |
| **Model** | Dash 2500 | Star50N | Intellivue MP20 |
| **Rate Per in Rs.** | Rs.1,75,000.00 | Rs.1,70,000.00 | Rs.3,31,500.00 |

03) Defibrillator - Qty.-01

| **Priority** | Priority –I | Priority -II | Priority -III |
|---|---|---|---|
| **Name of Supplier** | Excel Services, Mumbai | Wipro GE, Mumbai | Excel Corporation, Nashik |
| **Make** | Schiller India | GE | L & T |
| **Model** | Cardioplus | Cardioserv | Zoll M-Series |
| **Rate Per in Rs.** | Rs.1,22,850.00 | Rs.1,75,000.00 | Rs.3,70,000.00 |

तरी प्राधान्य असलेल्या निविदाधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे.

आजचे सभेपुढे मे. Wipro GE, Mumbai,Cyronics Instrument, Pune व Excel Corporation, Nashik हे तीन निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते तर Excel Services, Mumbai हे अनुपस्थित होते परंतु सभेमध्ये त्यांना दूरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली असता त्यांनी याच

Defibrillator मशिनमध्येच Multiparameter Monitor असलेले मशिन सुध्दा आमच्या कंपनीचे येते (Two in One Model - CardioPlus) याचे दर रु.१,९५,०००/- तर Transport Ventilator चे दर रु. २,२३०००/- असे कळविलेले आहे व तसा त्यांनी फॅक्स द्वारे कळविले आहे.

उपरोक्त चारही निविदा धारकांचे सूटीनंतरचा तक्ता खालीलप्रमाणे -

01) Transport Ventilator- Qty.-01

| Priority | Priority -I | Priority -II |
|---|---|---|
| **Name of Supplier** | Excel Services, Mumbai | Wipro GE, Mumbai |
| **Make** | Max Meditech | Own |
| **Model** | MX40P | I Vent 101 |
| **Rate Per in Rs.** | Rs.2,38,350.00 | Rs.3,95,000.00 |
| **Total Amt. After Negotiation in Rs.-** | 223000.00 | 395000.00 |
| **Optional -** | | PRVC - Free<br>Adv. Bilevel - Free |
| **Warranty** | 1 Year | 2 Year |
| **AMC** | AMC 2% the invoice value | 3% |
| **CMC** | CMC 5% of the invoice value as per the standard terms & conditions | 6% |

02) Multiparameter Monitor- Qty-01

| Priority | Priority –I | Priority -II | Priority -III |
|---|---|---|---|
| **Name of Supplier** | Wipro GE, Mumbai | Excel Corporation, Nashik | Cyronics Instrument, Pune |
| **Make** | Own | L&T, Medical | Philips |
| **Model** | Dash 2500 | Star50N | Intellivue MP20 |
| **Rate Per in Rs.** | 1,75,000.00 | 1,70,000.00 | 3,31,500.00 |
| **Total Amt. After Negotiation in Rs.-** | 175000.00 | 170000.00 | 298350.00 |
| Warranty - | 2 Year | 1 Year | 1 Year |
| AMC | 3% | N.Q. | 7500/- without batries |
| CMC | 6% | 7% of invoice Value | 22500/- without batries & 7.5% escalation every year |

03)Defibrillator - Qty.-01

| Priority | Priority –I | Priority -II | Priority -III |
|---|---|---|---|
| **Name of Supplier** | Excel Services, Mumbai | Wipro GE, Mumbai | Excel Corporation, Nashik |
| **Make** | Schiller India | GE | L & T |
| **Model** | Cardioplus | Cardioserv | Zoll M-Series |
| **Rate Per in Rs.** | Rs.1,22,850.00 | Rs.1,75,000.00 | Rs.3,70,000.00 |
| **Total Amt. After Negotiation in Rs.-** | Defibrillator with Multi Parameter Monitor -195000.00 | 275000.00 | 380000.00 |
| Warranty - | 1 Year | 2 Year | 1 Year |
| AMC | AMC 2% the invoice value | 3% | 25000.00 - NCMC |
| CMC | CMC 5% of the invoice value as per the standard terms & conditions | 6% | |
| | | | |

**निर्णय क्र. ६८६** **यावर चर्चा होऊन सदरचे Transport Ventilator करीता M/s.Excel Services, Mumbai यांचे निम्नतम दर रु.२,२३,०००/- आहे व त्यांनीच Defibrillator मशिनमध्ये Multiparameter Monitor असलेले एकत्रित मॉडेल (Two in One) चे दोन्हीचे एकत्रित दर रु.१,९५,०००/- दिलेले आहे व ते इतर निविदाधारकांच्या दोन मशिनच्या तुलनेत निम्नतम येतात. त्यामुळे उपरोक्त पैकी Multiparameter Monitor हे मशिन खरेदी करण्याची आवश्यकता नाही. तेंव्हा M/s.Excel Services, Mumbai यांचे एकत्रित मॉडेल असलेले Defibrillator रु.१,९५,०००/- मध्ये स्विकारण्यात यावे M/s.Excel Services, Mumbai यांना उपरोक्त दोन्ही मशिनचा पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच त्यांचेकडे १ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर त्यांचेकडे पुढील कालावधीसाठी एकूण किंमतीच्या ५% इतकी रक्कम अदा करुन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा रुग्णालयातील यूरोलॉजी इन्स्ट्रूमेंट (PCNL. Set) चर्चा वाटाघाटी करुन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सध्या दोन मानद युरोलॉजिस्ट डॉ. मुंदडा व डॉ. राजन पटणी हे अनुक्रमे गुरुवारी व शनिवारी भेट देऊन उपस्थित रुग्णांवर तपासण्या व शस्त्रक्रिया करत असतात. श्री साईबाबा रुग्णालयात

युरोलॉजी विभाग हा नव्यानेच कार्यान्वित करणेत आलेला आहे त्यासाठी काही इन्स्टुमेंट यापूर्वी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ चे मान्यतेने रु. २३,९८,२७५.३० ची घेऊन दिलेली होती.

सध्या PCNL चे शस्त्रक्रिया (टाक्याचे ऑपरेशन न करता स्कोपद्वारे किडनी स्टोन नष्ट करणे) यासाठी डॉ. मुंदडा व डॉ. पटणी यांनी सध्या असलेल्या इन्स्टुमेंट बरोबर काही अतिरिक्त इन्स्टुमेंटची मागणी केलेली आहे जेणेकरुन PCNL ही शस्त्रक्रिया अचूकपणे करता येऊ शकेल. सदरची मागणी जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२९/१०/२००९ चे मागणी पत्रकान्वये केलेली होती.

सदर युरोलॉजी इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे खर्च रु.६७८६७४/- येणार असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७/०१/२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.२१८ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस,मुंबई, सकाळ -पुणे, लोकमत-औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३/०२/२०१० ते १०/०३/२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२/०३/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून ०४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

सदर सिलबंद निविदा ह्या दि.०३/०४/२०१० रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तुलनात्मक तक्ता श्री साईबाबा रुग्णालयातील मानद युरोलॉजिस्ट डॉ. राजन पटणी व डॉ. मुंदडा यांना दाखवून घेण्यात आलेला आहे. त्यांच्या शिफारशीपैकी ज्या ठिकाणी दोघांनी सारखीच शिफारस केलेली आहे तर ज्या ठिकाणी दोघांच्या वेगवेगळ्या शिफारशी आहे तेथे निम्नतम दरांची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी रु. ३४९७४१/- इतका खर्च येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. इगल मेडीकल सिस्टिम, दिल्ली. | रु. ३२४५४४.५० |
| २ | मे. क्रिटीकल केअर सिस्टिम, पुणे | रु. २५१९६.४० |
| | **एकूण रक्कम** | **रु.३४९७४०.९०** |
| | **पुर्णांकित रक्कम** | **रु.३४९७४१.००** |

तरी सदरहू निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असून त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

उपरोक्त पैकी, आजचे सभेपुढे मे. क्रिटीकल केअर सिस्टिम, पुणे हे उपस्थित होते तरी मे. इगल मेडीकल सिस्टिम, दिल्ली हे उपस्थित नसल्यामुळे त्यांना सभेमध्ये दूरध्वनीवरुन आपण देऊ केलेल्या दरावर आणखी काही सूट देऊ शकतात किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार त्यांना देऊ केलेल्या दरावर १०% सूट देण्याचे मान्य केले आहे तसे त्यांनी दि.०७/०९/२०१० रोजी प्राप्त झालेल्या फॅक्स पत्रान्वये कळविलेले आहे त्यांनी देऊ केलेल्या सूटीचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. नं. | निविदाधारकाचे नाव | दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. पै. | वॉरंटी | AMC |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. इगल मेडीकल सिस्टिम, दिल्ली. | ३२४५४४.५० | २९२०९०.०५ | १ Year | Free AMC- for ५ years after warranty of १ year. |
| २ | मे. क्रिटीकल केअर सिस्टिम, पुणे | २५१९६.४० | २४४४०.५१ | १ Year | |
| | एकूण रक्कम | रु.३४९७४०.९० | ३१६५३०.५६ | | |
| | पुर्णांकित रक्कम | रु.३४९७४१.०० | ३१६५३१.०० | | |

**निर्णय क्र. ६८७ यावर चर्चा होऊन उपरोक्त देऊ केलेल्या सूटीनंतरच्या दरानूसार मे. क्रिटीकल केअर सिस्टिम, पुणे व मे. इगल मेडीकल सिस्टिम, दिल्ली यांच्याकडून इन्स्टुमेंट खरेदी करण्यात यावी तसेच दोनही निविदा धारकांनी एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दिलेला आहे पैकी मे. इगल मेडीकल सिस्टिम, दिल्ली यांनी एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील पाच वर्षाकरीता मोफत AMC दिलेली आहे ती स्विकारण्यात येऊन पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये नविन कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/ इन्स्टुमेंट इत्यादि खरेदीकामी प्राप्त झालेल्या कमर्शियल निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु., जनरल आय.सी.यु. इत्यादी तातडीने कार्यान्वित करणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस व वैद्यकिय संचालक यांना सदरचे ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारे मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इन्स्टुमेंट / किरकोळ साहित्य इ. सर्व प्रकारचे खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी/उपकरणे/ फर्निचर / इन्स्ट्रुमेंट / किरकोळ साहित्य इ. ची यादी सध्या असलेल्या मशिनरी / उपकरणे / फर्निचर इत्यादी विचारात घेऊन तयार करण्यात आली असून त्यासाठी अंदाजे खर्च रु.३,००,७२,५००/- (अक्षरी रु. तीन कोटी बहात्तर हजार पाचशे मात्र) चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देण्याचा प्रस्ताव दि.११/०३/२०१० चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून घेण्याची उपसमितीने शिफारस केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी इंडीयन एक्सप्रेस - पुणे व महाराष्ट्र टाईम्स - पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर सदरची जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत ही दि.०५/०४/२०१० ते १५/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१७/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकुण ८३ उत्पादक कंपन्या / पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र.५५३० दि.०५.०४.२०१० अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय मिळून एकोनचाळीस (३९) निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

प्राप्त सिलबंद तांत्रिक निविदा दि. २२/०५/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला आहे. उपरोक्त तुलनात्मक तक्ता N. M. Wadia Cardiology Institute, Pune येथील कार्डीयाक सर्जन डॉ. प्रधान व श्री साईबाबा हॉस्पिटमधील पुर्णवेळ कार्डीयाक सर्जन डॉ. विदयुत कुमार सिन्हा यांना दाखविण्यात येऊन त्यांचा सल्ला घेण्यात आलेला आहे. उपरोक्त मशिनरी / उपकरणे यापैकी डॉ. प्रधान, पुणे यांनी प्राप्त निविदामधील Heart Lung Machine with Heater Cooler या आयटमकरीता मे. जे. मित्रा मेडीकल इक्विपमेंट, मुंबई यांचेकडून देखील दर मागवावे कारण सदर मशिन देखील उत्कृष्ट दर्जाचे आहे असे सांगितले, तर Electrical Sternum Saw System या आयटमकरीता मे. मनमन, पुणे यांचेकडून देखील कोटेशन मागविण्यात यावे, असे डॉ. प्रधान व डॉ. विदयुत कुमार सिन्हा यांनी अभिप्राय दिलेला आहे, त्यामुळे उपरोक्त दोन्हीही आयटमकरीता त्यांचेकडून फॅक्स / ई-मेल व्दारे कोटेशन मागविण्यात आलेले आहे. सदरचे खरेदीकामी प्राप्त Commercial निविदा खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | B.Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 2 | B. L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi |
| 3 | Biomedicon Systems (I) Pvt.Ltd.,Mumbai |
| 4 | Biomedicon Services (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 5 | Concept Integrations (I) Pvt. Ltd., Pune |
| 6 | Critical Care Systems, Pune |
| 7 | Cyronics Instruments Pvt. Ltd., Pune |
| 8 | Emco Meditek Pvt. Ltd., Mumbai |
| 9 | Emergent Medi-Tech (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 10 | Emergent Medi-Tech (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 11 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai |
| 12 | Excel Corporation , Nashik |
| 13 | Gandhi Enterprises, Ahmednager |
| 14 | Hansaraj Nayyar Medical India, Mumbai |
| 15 | Imperial Surgical Company,Mumbai |
| 16 | Intermedics, Mumbai |
| 17 | Jalaram Steel Furniture Pvt. Ltd, Surat |
| 18 | Janak Healthcare Pvt. Ltd., Mumbai |
| 19 | Kalelkar Surgicals Pvt. Ltd., Mumbai |
| 20 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune |
| 21 | Karl Storz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi |
| 22 | M. Shah And Company, Pune |
| 23 | Maquet Medical India Pvt.Ltd.,Mumbai (2 Envelop) |
| 24 | Matrix Medicals Pvt. Ltd., Thane |
| 25 | Pest Control (I) Pvt. Ltd., Pune |
| 26 | PSN Instrumentation (P) Ltd.,Delhi |
| 27 | Pulmocare Consultants, New Delhi |
| 28 | Qualisurge Surgicals Pvt. Ltd., Pune |
| 29 | Regency Lifesciences, Bangalore |
| 30 | Rescare Medisys (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 31 | Sai Enterprises, Shrirampur |

| | |
|---|---|
| 32 | Saitrons Medical Equipments,Loni |
| 33 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune |
| 34 | Steranco Health Care Pvt. Ltd., Mumbai |
| 35 | Summit Healthcare (P) Ltd., Mumbai |
| 36 | Tejas Electronics,Ahmednagar |
| 37 | Unitek Power Solutions (I) Ltd.,Mumbai |
| 38 | Vitek Medisystems, Mumbai |
| 39 | Zenith Surgical Co.,Mumbai |
| 40 | Allwin Lifecare, Mumbai |
| 41 | Life Care Medical Systems, Mumbai |
| 42 | Life Care Medical Systems, Mumbai |
| 43 | Life Care Medical Systems, Mumbai |

वरीलपैकी अ.नं. ४० ते ४३ या चार निविदाधारकांनी निविदेच्या पाकीटावर उल्लेख करताना ई.एन.टी / ऑप्थॅलमिक ओ. टी. करीता लागणारे मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट साठी निविदा असे नमुद केलेले होते, परंतु प्रत्यक्षात तांत्रिक निविदा उघडल्यानंतर ती कार्डीयाक ओ.टी. करीता लागणारे मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट याकरीता असलेल्या Technical Specification ची आहे. त्यामुळे सदरच्या निविदा तुलनात्मक तक्ता तयार करताना कार्डीयाक खरेदीमध्ये विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

तरी सदरचे खरेदीकामी प्राप्त एकुण ४३ सिलबंद Commercial निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ६८८ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये नविन कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी/ उपकरणे/ फर्निचर/इन्स्ट्रुमेंट इत्यादि खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकूण ४३ सिलबंद कमर्शियल निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** माहे सप्टेंबर ,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०१/०९/२०१० | २,८३,००,०००.०० |
| ०२ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, ( Staff B.Fund ) | ०४/०९/२०१० | ५,६८,६९३.०० |
| ०३ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ०६/०९/२०१० | १,०३,४६,७५४.०० |
| ०४ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ०६/०९/२०१० | १,०३,४६,७५४.०० |
| ०५ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ०७/०९/२०१० | २२,९९,२७९.०० |
| ०६ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०१/०९/२०१० | १,५२,००,०००.०० |
| ०७ | बॅंक ऑफ बरोडा, नाशिक ( F/ex ) | १४/०९/२०१० | १,३६,३५,३९३.०० |
| ०८ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २२/०९/२०१० | ४,१८,००,०००.०० |
| ०९ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २८/०९/२०१० | १,००,००,०००.०० |
| १० | किसान विकास पत्र, शिर्डी | २९/०९/२०१० | २,००,००,०००.०० |
| ११ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे सप्टेंबर २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण रक्कम -** | **२०,२४,९६,८७३.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. २०.२४ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बॅंकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बॅंक, शिर्डी
४) स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बॅंक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बॅंक, शिर्डी

९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.२०.२४ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र. ६८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. ०१ ते ११ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.२०.२४ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, पूर्वीची परकीय चलनातील गुंतवणुकीची रक्कम परकीय चलन बचत खात्यात वर्ग करावी, तसेच आंध्र बँक, शिर्डी येथील संस्थानच्या नित्य अन्नदान योजना या बचत खात्यातील साठलेली रक्कम प्रचलित दराने आंध्र बँकेकडेच गुंतविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१५ श्रीहनुमान मंदीरामध्ये श्रीं चे मुर्तीचे गाभाऱ्याचे बाजूला रेड आग्रास्टोनची जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री हनुमान मंदिराचे नुतनिकरण करणेत आले आले असून, श्री हनुमान मुर्तीचे बाजूने भक्त प्रदक्षिणा घालतात, त्यावेळेस श्रीं चे मुर्तीला हात लावून स्पर्श करतात. त्यामुळे मुर्ती खराब होऊ नये याकरीता सध्या तेथे लोखंडी ग्रील बसविणेत आलेले आहेत. मा. कार्यकारी अधिकारी सोा यांचे पहाणीमध्ये सदर ठिकाणी मंदिर परिसराशी सुसंगत असे रेड आग्रा स्टोनची जाळी बसविणेबाबत सूचना केली आहे. याकरीता जनसपंर्क कार्यालयासमोरील कारंजाचे बाजूने रेड अग्रास्टोनची जाळी नव्याने बसविणेत आलेली आहे. त्याच डिझाईननूसार सदर ठिकाणी रेड आग्रा स्टोनची जाळी बसविणेकामी इकडील जा. नं. ८८५३/२०१० दि. ०६.०८.२०१० रोजीचे कोटेशन पत्रान्वये खालील ०४ ठेकेदारांकडून दरपत्रके मागविणे आली असून, त्यापैकी तिन सिलबंद दरपत्रके दि. २३.०८.२०१० रोजी उघडण्यात आली आहेत. तसेच जनसपंर्क कार्यालयासमोरील कारंजाचे बाजूने देणगी दाखल रेड अग्रास्टोनची जाळी बसविणारे दि रॉकस्कॅप कंपनी, मुंबई यांनीही दि. २५.०८.२०१० रोजीचे ई-मेल व्दारे दरपत्रक सादर केले आहे. करीता त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहेतः-

| अ. नं. | तपशिल | परिमाण / एकक | दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव / दर / रक्कम | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी | | श्री. व्दारकाप्रसाद कुमावत, शिर्डी | | श्री. मदनलाल कुमावत, शिर्डी | | दि रॉकस्कॅप कंपनी, मुंबई | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| ०१ | रेड आग्रा स्टोनची जाळी बसविणे करीता ३"x३" साईजचे रेड आग्रा स्टोनचे खांब तयार करुन, पॉलिश करुन जागेवर बसविणे.<br>०१. ३' उंचीचे<br>०२. ३'-७" उंचीचे | <br>०८ नग<br>०६ नग | <br>४५०<br>४५० | <br>३६००<br>२७०० | <br>४७५<br>४७५ | <br>३८००<br>२८५० | <br>४९०<br>४९० | <br>३९२०<br>२९४० | रु. २,००,०००/- एकत्रित | |
| ०२ (अ) | १-१/२" जाडीचे व २-१/२" रुंदीची फ्रेमसह ३' उंचीची रेड आग्रा स्टोन जाळी सोबतचे ड्रॉईंग नूसार तयार करुन बसविणे. | ४४.५२ चौरस फुट | ४३० | १९१४३ | ४९५ | २२०३७.४ | ४८० | २१३६९.६ | | |
| (ब) | १-१/२" जाडीचे व २-१/२" रुंदीची फ्रेमसह ३'-७" उंचीचे रेड आग्रा स्टोनची जाळी सोबतचे ड्रॉईंग नूसार तयार करुन बसविणे. | ५३.७४ चौरस फुट | ४३० | २३१०८ | ४९५ | २६६०१.३ | ४८० | २५७९५.२ | | |
| ०३ | ३" रुंदी व १-१/२" जाडीची रेड आग्रा स्टोनचे रेलिंग तयार करुन बसविणे. तसेच वरिल बाजूने मोल्डींग, पॉलिश करणे. | २७.०० रनिंग फुट | ३५० | ९४५० | ४०० | १०८०० | ४१० | ११०७० | | |
| | | एकुण रुपये.. | | ५८००१ | | ६६०८८.७ | | ६५०९४.८० | २,२०,०००/- | |
| | | शेरा.. | | निम्नतम | | | | | | |

मे. श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी यांनी नमूद केलेले दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने सदरचे काम त्यांचे कडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. ५८,००१/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ६९० यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.श्री साई नॅचरल स्टोन, साकुरी यांनी नमूद केलेले दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने सदरचे काम त्यांचे कडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. ५८,००१/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६ श्रीसाईबाबा मंदीर परिसरालगतचे पूर्वेकडील १६ आर जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर परिसराचे पूर्वेकडील हद्दीलगत असलेले संस्थान मालकीचे १६ आर क्षेत्रामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणेकामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४.०७.२०१० रोजीचे सभेत निविदा उघडण्यात आल्या असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Name and Address of Tenderer | Tender Percentage | Negotiated Percentage |
|---|---|---|---|
| 01 | M/s. A. S. Construction, Aurangabad | 32.60% Above | 32.60% Above |
| 02 | Krishakant M. Khond, Manmad | 3% Above | At Par |
| 03 | S.R. Gite, Government Contractor, Sonoshi (Sangmner) | 7% Below | 7% Below |
| 04 | R.L.Bhutada, Kopargaon | 42% Above | Abseent |

उपरोक्त प्रमाणे उघडण्यात आलेल्या निविदांवर निर्णय क्रमांक ५३३ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

" सदरचे काम नविन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरणाचे काम मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांनी उत्कृष्ट प्रकारे केले असल्याने सदरचे काम त्यांचे निविदा दरात करत असल्यास त्यांचेकडून सदरहू काम करुन घेण्यात यावे."

याबाबत ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांनी त्यांचेकडील दि. २४.०७.२०१० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, त्यांचे शिर्डी साईटचे काम माहे मार्च, २०१० मध्ये पूर्ण झालेले असल्याने त्यांचेकडील यंत्रणा व मनुष्यबळ दुसऱ्या साईटवर शिफ्ट केले असल्याने सदरचे काम करु शकत नसल्याबाबत कळविले आहे.

तरी वरिल प्रमाणे ठेकेदार मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांनी विषयांकीत काम करणेस असमर्थतता दर्शविलेली असल्याने सदरहू कामासाठी नव्याने निविदा मागवून काम करुन घेणेस मंजूरीस्तव सादर.

**निर्णय क्र. ६९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि., पुणे यांनी पेन्टींग ब्लॉकसह इतर काम करणेस असमर्थता दर्शविली आहे. याकामी वरीलप्रमाणे चार निविदा आलेल्या आहेत. पैकी एस.आर. गिते, सोनोशी (संगमनेर) यांची निविदा निम्नतम दराची आहे. त्यांची निम्नतम दराची निविदा मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७ मंदीर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात सुरक्षा साहित्याची सेंट्रलाईज कंट्रोलरुम तयार करणे इंटेरियर कामाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार, समाधी मंदिरासह संस्थान परिसराचे व भक्तांचे सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अंदाजे रक्कम रुपये ४.५ कोटी मात्र खर्चाची सुरक्षा यंत्रणा प्रणाली उभारण्यात येत आहे. सदरहू सुरक्षा यंत्रणा प्रकल्पासाठी उभारण्यात यावयाच्या नियंत्रण कक्षासाठी आर्किटेक्ट अमोल चौधरी, नाशिक यांचेकडून नियंत्रण व साठवण कक्षाचा प्राथमिक बांधकाम आराखडा तयार करुन घेण्यात आलेला आहे. सदरहू कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७ ऑगष्ट, २०१० रोजीचे सभेत सुरक्षा यंत्रणाचे नियंत्रण कक्ष व इतर अनुषंगिक सोयी करणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

इकडील विभागाचे दिनांक २० ऑगस्ट, २०१० रोजीचे मंजूर टिपणीनुसार अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेल्या खालील ०३ इच्छुक ठेकेदारांनी सादर केलेल्या तीन निविदा उघडणेत आलेल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | निविदेतील रक्कम | चर्चा वाटाघाटी नंतर देऊ केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 01 | Trimiti Interiors, Nashik | 3,52,315.00 | 3,31,000/- |
| 02 | Magar Jaibhave Associates,Nashik | 3,50,450.00 | 3,32,927/- (5% Below) |
| 03 | Wave Interiors Pvt. Ltd., Nashik | 3,76,255.00 | 3,53,679/- (6% Below) |

उपरोक्त निविदा सादरकर्त्यांनी दिलेल्या दराबाबत त्यांना इकडील जा.नं.९०९३/२०१० दि. २७.०८.२०१० रोजीचे पत्रान्वये चर्चा वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, अ. नं. ०१ चे मे. त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक हे उपस्थीत होते. अ. नं. ०२ व ०३ हे उपस्थित नसल्याने त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा तथा वाटाघाटी करणेत आल्या असता, त्यांनी उपरोक्त प्रमाणे दर देऊ केले आहे. उपरोक्त तपशिलावरुन मे. त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक यांचे रु.३,३१,०००/- मात्र निम्नतम दर असल्याने सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ६९२ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे. त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक यांचे रु.३,३१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. १८ नियोजित साईगार्डन प्रकल्पांतर्गत लेजर शो उभारणीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी आध्यात्मिक व मनोरंजनात्मक उद्यान (बगीचा) उभारण्याचा मा. व्यवस्थापन समितीचा मानस आहे. त्यादृष्टीने मा. व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभांमध्ये वेळोवेळी चर्चा झालेली असून, त्यास अनुसरुन निर्णय घेण्यात आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर श्री क्षेत्र शिर्डी जवळील मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या अंदाजे २० एकर जमिनींमध्ये आध्यात्मिक व मनोरंजनात्मक उद्यान (साई गार्डन) उभारण्यासाठी निविदा मागविणेत आलेल्या असून, त्याबाबत विहीत पध्दतीने कार्यवाही सुरु आहे.

साई गार्डन हा नियोजित व प्रस्तावित प्रकल्प राबविण्याचे अनुषंगाने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२ मे, २०१० रोजीचे सभेमध्ये, सिंगापूर येथील सेन्टोसा आयलंड या थीम पार्कची पहाणी मा. व्यवस्थापन समिती सदस्यांनी व संस्थान अधिकाऱ्यांनी करावी, जेणेकरुन शिर्डी येथे उभारण्यात येणाऱ्या नियोजित व प्रस्तावित साई गार्डन प्रकल्पासाठी काही नवीन संकल्पना राबविणे शक्य होईल, अशी चर्चा झाली. त्यानुसार, मा. व्यवस्थापन समिती सदस्य सिंगापूर येथील सेन्टोसा आयलंड पहाणी व अभ्यास दौरा करणेसाठी जाऊ इच्छितात त्यांचेसह संस्थानतर्फे मा.कार्यकारी अधिकारी अथवा उपकार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी पहाणी व अभ्यास दौरा करावा, असा निर्णय झाला.

सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, खालील मा.व्यवस्थापन समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांनी दिनांक ०१ जून, २०१० ते ०५ जून, २०१० अखेर, सेन्टोसा आयलंड (सिंगापूर) येथे भेट देऊन तेथील मनोरंजनात्मक सोयी-सुविधांची पहाणी केली.

सदर पाहणीचे दरम्यान सिंगापूर येथे सेन्टोसा पार्क मधील लेजर शोची निर्मीती कंपनी Laservison, Australia चे कार्यकारी संचालक Mr. Paul Mc Closkey यांचे वतीने Mr. John Kehoe, Business Development Manager- Laservision यांचेशी Laser show चे उभारणी बाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली. संबंधित प्रतिनिधींनी Laser show ची तांत्रिक माहिती, Show कार्यान्वित करण्याची पध्दत, त्याची देखभाल इत्यादी बाबीबाबत सविस्तर माहिती दिली.

दिनांक ०४/०७/२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त समितीचे सिंगापूर भेटीचे अहवालाबाबत चर्चा होऊन संस्थानचे नियोजीत "साईगार्डन "प्रकल्पासाठी Laser Show चे उभारणी करीता 'Maris International Consulting Pvt. Ltd., Singapore यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली.

**(ब)** सदर कंपनीचे सल्लागार यांना शिर्डी येथे नियोजित साई गार्डन स्थळ भेटीसाठी निमंत्रीत करणेत आले होते. त्यानूसार 'Maris International Consulting Pvt. Ltd., Singapore यांचे तर्फे खालील व्यक्तींचा समावेश असलेली तज्ञांचा गट दि.३०/०७/२०१० रोजी शिर्डी येथे आला होता.

01. Mr. John Kehoe, Business Development Manager- Laservision
02. Mr. Tim Andrew Baker
03. Mr. Jeyendran Naidu, Consultant & Coordinator

सदर तज्ञांसोबत चर्चा व विचारविनीमय करणेसाठी प्रकल्पाचे आर्कीटेक्ट माथुर काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री. उदय काप्रे यांना निमंत्रित करण्यात आले होते.सिंगापूर येथे करण्यात आलेल्या Laser-Show प्रमाणे शिर्डी येथे Laser-Show उभारणी करता येईल असे त्यांनी सांगीतले यासाठी साईबाबांचे जिवणावर आधारीत साई सत्चरित्राच्या आधारावर सदर प्रकल्पाची उभारणी करावी असे त्यांना सांगण्यात आले.

सर्व प्रथम मा. कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सल्लागारांचे स्वागत करुन त्यांना संस्थानचे विवीध प्रकल्पाबाबत व संस्थान साईभक्तांचे सोयीसाठी राबवत आसलेल्या उपक्रमाबाबत माहिती दिली. त्यानंतर नियोजित साईगार्डनच्या जागेची पहाणी करणेत आली. साईगार्डन उभारणीबाबत संस्थानची संकल्पना सल्लागार यांना सविस्तरपणे समजावून देण्यात आली. तद्नंतर सल्लागार यांनी साई गार्डन (लेजर शो) प्रकल्पाबाबत सोबत जोडलेले परिशिष्ट " अ " नूसार माहिती सादर केली.

सल्लागार यांनी सादर केलेल्या सादरीकरणे व लेजर शो बाबतचे माहितीवर सविस्तर चर्चा करुन असे ठरविण्यात आले की,

१) आर्किटेक्ट यांनी Laser-Show चे सल्लागार यांनी सूचविलेप्रमाणे साईगार्डनचे Lay-out Plan मध्ये बदल करुन घ्यावा.

२) साईगार्डनचा प्रकल्प तीन टप्प्यात पूर्ण करण्यासाठी आर्किटेक्ट यांनी ६६.१५ कोटी खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले त्यापैकी आता पहिल्या टप्प्यात Laser-Show व त्या अनुषंगाने करावयाचे बांधकामाचे सुधारीत अंदाजपत्रक आर्किटेक्ट यांनी सादर करावे.

दिनांक ३१/०७/२०१० रोजी सल्लागार व आर्किटेक्ट यांचे उपस्थीतीत उप समितीचे सभेत सर्व प्रथम सल्लागार यांना मा.अध्यक्ष सो व मा. कार्यकारी अधिकारी यांनी साई गार्डन उभारणीबाबत हेतू विषद केला. शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. सदरहू मंदिर

परिसरातील गर्दी कमी करण्याचे दृष्टीने तसेच साईभक्तांना दर्शनाव्यतिरीक्त आकर्षन केंद्र, मनोरंजनातून अध्यात्म साध्य होण्यासाठी अद्यावत असे साई गार्डन उभारणी करण्याचे ठरले आहे.

सल्लागार यांनी त्यांचे कंपनीला संस्थानने चर्चेसाठी व LASER -SHOW चे माहितीसाठी बोलविल्या बद्दल आभार मानले. कंपनीचे प्रतिनीधी Mr. John Kehoe यांनी सागीतले की, त्यांचे कंपनीने यापूर्वी बँकॉक, सिंगापूर इ. ठिकाणी मोठ्या इमारती व जादा लाईटींग असल्यामुळे तसेच भौगोलीक परिस्थीती नूसार प्रकल्पासाठी जादा खर्च आलेला आहे. त्यामानाने शिर्डी येथे प्रकल्प जमिनीवर उभारावयाचा आहे. तसेच तुलनेने प्रकल्पाचे आजूबाजूस जादा लाईट व इमारती नसल्यामुळे Laser साठी कमी Power ची यंत्रणा चालू शकते व पर्यायाने त्यामुळे प्रकल्पासाठी कमी खर्च येईल असे त्यांनी सांगीतले. Laser-Show उभारणी कामी अंदाजे रुपये २३ ते ३२ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चामध्ये सर्व प्रकारच्या उपकरणे, उभारणी, प्रोग्राम तयार करणे, शो कॉन्टेन्ट या समवेत असेल. सिव्हिल व इलेक्ट्रीकल यात समाविष्ट नाही.

याबाबत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांनी त्यांचे दि. ०५/०८/२०१०चे पत्रान्वये (सदर पत्र सोबत ब परिशिष्ट म्हणून जोडले आहे.) प्रस्तावीत लेजरशोसाठी योग्य ते बदल करावे लागणार आहेत . आराखड्यात होणारे बदलामुळे तसेच बाजारभावात होणारे साहित्याचे दर वाढीमुळे पूर्वीचे अंदाजपत्रकीय खर्चात वाढ होणार आहे. सदरहू प्रकल्पासाठी अंदाजे एकुण खर्च रु. ९४.१९ कोटी अपेक्षित असल्याचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी कळविले आहे.

वरिल प्रमाणे सल्लागार यांनी सादर केलेले सादरीकरणावर सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले व Laser-Show उभारणीचे व त्या-अनुषंगाने करावयाचे बांधकाम, इलेक्ट्रीक काम पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात यावे, असे ठरविण्यात आले. तसेच याकामी आंतराष्ट्रीय स्तरावर जाहीरात देऊन निवीदा मागविणेत याव्यात, असे ठरले.

**(क)** १) यापूर्वी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी सादर केलेले आराखड्यानूसार साई गार्डन प्रकल्प उभारणी करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात व संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन इच्छुक संस्था / विकसक संस्थाकडून विहीत मुदतीत ०२ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदरचे प्रस्तावांची Validity Period दि.०९.११.२०१० रोजी संपुष्टात येत असल्याने, सदर सिलबंद प्रस्तावाबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती.

२) तसेच उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे, उच्च तंत्रज्ञान असलेले लेजर शो उभारणीच्या कामाचा समावेश करुन नव्याने प्रस्ताव सादर करणेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर जाहिरात प्रसिध्दी करुन प्रस्ताव मागविणेकामी मान्यता असावी.

**निर्णय क्र. ६९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू पकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे BOT तत्वावरील प्रकल्पासाठी प्राप्त झालेले दोन प्रस्ताव रद्द करण्यात यावेत. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

**तसेच, 4D- शो व इतर वैशिष्टयपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१९** **औषधे भांडार विभागाकडे असलेल्या साठ्याची दिनांक ३१.०३.२०१० रोजी प्रत्यक्ष केलेल्या मोजणी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मध्यवर्ती औषध भांडारात व वार्ड, ओ.टी. मध्ये दि.३१/०३/२०१० रोजी असलेल्या औषध साठयाची अंतर्गत लेखापरिक्षक यांचे मार्फत प्रत्यक्ष साठा मोजणी करण्यात आलेली आहे. दि.३१/०३/२०१० रोजी संगणक प्रणालीत ११९४ इतक्या औषधांची संख्या औषध भांडारात असून खरेदी दराने मुल्यांकन केले असता एकुण किमंत रु.१,०५,५०,८१३/- व इतर वार्ड / ओ.टी. मध्ये रु.२६,९२,१६९/- असा एकूण रु.१,३२,४२,९८२/- मात्रचा औषध साठा आहे. त्यापैकी मुख्य औषध भांडारात ४५ औषधे ही संगणक साठयापेक्षा कमी आढळून आली असून, त्यांची किमंत रु.१५,३०१/- इतकी आहे, तर १३ औषधे ही साठा संगणक साठयापेक्षा जास्त आढळून आली असून, त्यांची किंमत रु.५,७७८/- इतकी आहे. याचा प्रत्यक्ष मेळ घातला असता वर्षभरात निव्वळ रु.९,५२३/- मात्रची औषधे कमी आढळून आलेली आहेत.

वॉर्ड / विभागात देतांना प्रत्यक्ष मोजुन देणे यामुळे तफावत दिसुन येते. तसेच देवाण घेवाणमध्ये समजून न येणाऱ्या व मोजण्यातही कधी-कधी चुका होऊ शकतात.

तरी दि. ३१/०३/२०१० रोजी औषध भांडारात असलेल्या संगणक साठयाशी केलेल्या प्रत्यक्ष साठा पडताळणी अहवालामध्ये कमी दिसून आलेल्या नोंदी संगणक साठयामधून निर्लिखित करणेस व ज्या औषधांचा साठा संगणक साठयापेक्षा जास्त आहे त्या नोंदी संगणकात जमा घेण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ६९४ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दिनांक ३१.०३.२०१० रोजी औषध भांडारात असलेल्या संगणक साठयाशी केलेल्या प्रत्यक्ष साठा पडताळणी अहवालामध्ये कमी दिसून आलेल्या नोंदी संगणक साठयामधून निर्लिखित करणेस व ज्या औषधांचा साठा संगणक साठयापेक्षा जास्त आहे त्या नोंदी संगणकात जमा घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय न.२० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड/ विभागाकरीता लॉकर खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ ब्लड बॅक विभागाने डि.पी. नं. ३७८८ दि.०८/०५/२०१० अन्वये २२ खण असलेल्या लॉकरची मागणी केलेली आहे. परंतु सदर लॉकर्स हे प्रत्यक्षात ६ खणांचे एक लॉकर येत असते त्यामुळे ६ खण असलेले ३ लॉकर खरेदी करण्याचा प्रस्ताव होता. सदरचे लॉकर खरेदीकामीचा प्रस्ताव दि. १५/०५/२०१० रोजीचे टिपणीन्वये उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब अशा प्रकारच्या लॉकर्सची सर्व वॉर्ड / विभागाची मागणी एकत्रित करुन प्रस्ताव सादर करावा असे आदेश दिले होते.

दि. १५/०५/२०१० रोजीचे टिपणीवरील उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशानुसार एकत्रित लॉकर्स खरेदीकामी दोन्ही रुग्णालयाचे वॉर्ड / विभागांना दि.१६/०६/२०१० चे परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे मागणी प्राप्त झालेली आहे-

| Sr.No. | Name of Wards | Qty. |
|---|---|---|
| 1 | Sainath Blood Bank | 3 |
| 2 | Saibaba ICCU | 1 |
| 3 | Saibaba GICU | 1 |
| 4 | Saibaba Gen.O.T. | 1 |
| 5 | Saibaba FGW | 1 |
| 6 | Saibaba CRU-II | 1 |
| 7 | Saibaba CRU-I | 4 |
| 8 | Saibaba SPW - I | 1 |
| 9 | Saibaba TSR / SPR | 2 |
| 10 | Saibaba Laboratory | 2 |
| 11 | Saibaba CVTS/Cathlab | 3 |
| 12 | Saibaba Matron Office | 1 |
| 13 | Saibaba Radiology | 2 |
| 14 | Sainath MMW | 2 |
| 15 | Sainath MSW | 1 |
| 16 | Sainath Pathology | 3 |
| | **Total -** | **29** |

उपरोक्त प्रमाणे २९ लॉकर्स खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु. ९९९९/- प्रमाणे रु. २,८९,९७१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे लॉकर्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८९,९७१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ६९५ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे लॉकर्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८९,९७१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१ ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी मे. रोश डायग्नॉस्टिक प्रा.लि.मुंबई या कंपनीचे OMNI C हे ब्लड गॅस ॲनालायझर मशिन एकुण रू.६,७५,०००/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे.मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे चालू आर्थिक वर्षासाठी रु. ३३,०३५/- इतक्या रक्कमेत AMC करणेत आलेले आहे. AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची वकन्झ्युमेबल्सची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या दि.२५/०७/१० रोजी मशिन नादुरूस्त झाल्याने मशिनची तपासणी केली असता मशिनमधील इलेक्ट्रॉनिक बोर्डवर ब्लड सँपल व रीएजंट मिक्स्चर आढळून आले होते. त्यानुसार कंपनी इंजिनीअर यांनी दि. २७/०७/१० त्यांचे तातडीचे भेटीद्वारे मशिनचा Actuator Board व Barex Tube हे पार्ट खराब झालेचे सांगितले आहे.कंपनीने पर्यायी व्यवस्था करणेकरीता त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट क्र.२६१ अन्वये वरील स्पेअरपार्ट बदलले आहेत. सदरच्या पार्टस् करीता मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा. ली. मुंबई यांनी सध्याचे अधिकृत डिलर मे. सास एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेमार्फत दि. ०९/०८/२०१० चे पत्रान्वये रु. ५७,६२४/-इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस वरील पार्ट श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. ए.बी.जी. मशीनचे स्पेअर पार्ट व कन्झ्युमेबल्स फक्त मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा. ली. मुंबई व त्यांचे अधिकृत डीलर यांचेकडेच मिळतात.

तरी मे.सास एंटरप्रायजेस,औरंगाबाद यांचेकडून ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचे Actuator Board व Barex Tube हे पार्ट बदलुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रू. ५७,६२४/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र. ६९६ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मे.सास एंटरप्रायजेस,औरंगाबाद यांचेकडून ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचे Actuator Board व Barex Tube हे पार्ट बदलुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रू. ५७,६२४/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागासाठी पेशंट वॉर्मर मशिन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो शस्त्रक्रिया विभागात न्युरो शस्त्रक्रिया झालेनंतर किंवा शस्त्रक्रिया चालु असताना रुग्णास देण्यात येत असलेल्या इंजेक्शन किंवा सलाईनमुळे अथवा इतर कारणास्तव थंडी वाजून आल्यानंतर त्वरीत सदर मशिनव्दारे गरम हवा देऊन आराम मिळू शकतो. त्यासाठी न्युरो शस्त्रक्रिया विभागाने उपरोक्त वॉर्मर दोन नगाची मागणी केलेली आहे. याकामी अंदाजे खर्चासाठी मे. बी. एल. लाईफसायन्स प्रा. लि., मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दि. १५/०७/२०१० च्या दरपत्रकानुसार एका नगासाठी अंदाजे रु. ९४,५००/- तर दोन नगांसाठी एकुण रक्कम रु. १,८९,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सध्या नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागासाठी मशिनरी / उपकरणे खरेदीकामी तांत्रिक निविदा उघडून पुढील कार्यवाही चालु आहे व त्यामध्ये ०७ नग खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर खरेदीमध्ये उपरोक्त ०२ नग वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त दोन नगांची संख्या वाढवून घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,८९,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ६९७ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागासाठी मशिनरी / उपकरणे खरेदीकामी तांत्रिक निविदा उघडून पुढील कार्यवाही चालु आहे व त्यामध्ये ०७ नग खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर खरेदीमध्ये ज्यादा ०२ नग पेशंट वॉर्मर मशिन चर्चा/ वाटाघाटी करुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,८९,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३ जीवनदायी योजनेअंतर्गत झालेल्या शस्त्रक्रिया व Procedures वर डॉक्टरांना देण्यात येणारा इन्सेन्टीव्ह जीवनदायी योजनेकडून रक्कम प्राप्त झालेवर देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांना त्यांनी केलेल्या कामाचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे व त्यानुसार डॉक्टरांना इन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे. जीवनदायी योजनेअंतर्गत मोठया प्रमाणावर शस्त्रक्रिया व Procedures केल्या जात आहे व सदर उपचारांची रक्कम जीवनदायी प्राधिकरणाकडून मिळण्यास विलंब होत असतो. डॉक्टरांना मात्र महिन्यानंतर लगेचच इन्सेन्टीव्ह दिला जातो. इतर रुग्णालयांमध्ये जीवनदायी योजनेअंतर्गत झालेल्या शस्त्रक्रियांवर डॉक्टरांना जीवनदायी योजनेकडून रक्कम प्राप्त झाल्यावर देण्यात येतो.

अशाच प्रकारे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांना जीवनदायी योजनेअंतर्गत झालेल्या शस्त्रक्रियेवर इन्सेन्टीव्ह जीवनदायी योजनेकडून रक्कम प्राप्त झाल्यानंतर देणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र. ६९८ यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्याचे प्रचलित पद्धतीत बदल न करता पूर्वीप्रमाणे कार्यवाही चालु ठेवण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४ Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ. बजाज हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी रोहीत प्रल्हाद मुळे या पेशंटला दि.११/०५/२०१० रोजी पेसमेकर बसविलेला आहे.

सदरचे शस्त्रक्रियेकरीता त्यांनी St. Jude Medical Co. चा Pacemaker VVIR (Peadiatric) Pulse Generator हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक

यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

दि. १०.०५.२०१० च्या पत्रान्वये डॉ. बजाज यांनी उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. त्यानुसार M/s.Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बील क्र.०४२० दि.१२/०५/२०१० (डिलेव्हरी चलन नं. ८२६ दि.११/०५/२०१०) अन्वये एक नग रु.९२,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.११/०५/२०१० रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

रोहीत प्रल्हाद मुळे ह्या पेशंटची प्रथमतः TOF ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती. सदरच्या शस्त्रक्रियेसाठी एकुण रु. ७२,०००/- इतक्या खर्चाचे कोटेशन देण्यात येऊन त्यास जीवनदायी योजने अंतर्गत रक्कम रु. ६५,०००/-इतकी मंजूर झाली होती. त्यानंतर पेसमेकर बसविणेकामी एकूण रु. १,२०,०००/- चे कोटेशन देण्यात येऊन त्यास जीवनदायी योजनेअंतर्गत रक्कम रु. ८५,०००/- इतके मंजूर झाले होते. सदरच्या दोन्ही शस्त्रक्रिया करणेकामी व हॉस्पिटलचे इतर खर्चाचे तसेच जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर रक्कम व त्यांनी भरलेली रक्कम पावती नं. २१०२७५१३ दि.२८/०६/२०१० अन्वये खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Details of package | Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1) | PPI- Package | |
| a) | Hospital Charges | 28000.00 |
| b) | Pacemaker Charges | 92000.00 |
| 2) | TOF | 72000.00 |
| 3) | Hospital Charges | 8705.00 |
| | Total Amt. in Rs. | 200705.00 |
| | Less - Jeevandai Sanction Amt in Rs. | 150000.00 |
| | Balance Amt. in Rs. | 50705.00 |
| | Less – Cash paid Amt. in Rs. | 31000.00 |
| | Less - Charity Amt. in Rs. | 19705.00 |
| | | Nil |

तरी उपरोक्तप्रमाणे M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.९२,०००/- M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर पेसमेकर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र. ६९९ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.९२,०००/- M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५ Kidney Stone शिबीराकरीता आलेल्या प्रत्यक्ष खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात दिनांक २९-३०-३१ जुलै २०१० अखेर Kidney Stone शिबीराचे आयोजन करणेत आले होते. या प्रकारचे शिबीर अहमदाबाद येथील लेसर किरण तज्ञ डॉ. केतन शुक्ला व त्यांचे सहकारी यांचे योगदानातून आयोजित केले जाते.

अशा प्रकारचे उपचारासाठी खाजगी रुग्णालयात ३० ते ४० हजार रुपये प्रत्येकी खर्च येतो. त्यामुळे सदर खर्च गरीब रुग्णांना पेलावणारा नसल्याने ते उपचारापासून वंचित राहतात. असे शिबीर दर तीन महिन्यातुन एकदा आयोजित करणेस व याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

यावेळी एकूण ५६ रुग्णांवर उपचार/शस्त्रक्रिया करणेत आल्या. त्यापैकी २३ रुग्णांवर Lithotripsy उपचार करणेत आले. व ०३ रुग्णांवर शस्त्रक्रिया व Lithotripsy अशा दोन्ही प्रकारे उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच डॉ. केतन शुक्ला यांनी यावेळीही (Percutaneous Nephrolithotomy) ( P.C.N.L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर पुर्वी प्रमाणेच ३६ रुग्णांवर मोफत स्कोपीने शस्त्रक्रिया केलेल्या आहेत.

उपरोक्तपैकी २३ रुग्णांवर करण्यात आलेल्या Lithotripsy उपचाराचे बिलापोटी रु. २५००/- प्रति रुग्ण याप्रमाणे रु. ५७,५००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न हजार पाचशे) मात्र गुजरात किडनी ॲन्ड स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद ( डॉ. केतन शुक्ला ) यांना अदा करावे लागतील.

तसेच या पुढे आयोजित करण्यात येणा-या प्रत्येक किडनी स्टोन शिबीरातील रुग्णांचे Lithotripsy उपचाराचे बीलापोटी रु.२५००/- प्रति रुग्ण याप्रमाणे होणारे एकूण बील गुजरात किडनी ॲन्ड स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना नेहमीप्रमाणे अदा करणेस मान्यता असावी.

तरी वरील प्रमाणे रु.५७,५००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न हजार पाचशे) मात्र गुजरात किडनी ॲन्ड स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा करणेस व शिबीरकामी प्रत्यक्ष आलेल्या रु.५७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपडीक, जनरल व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने खालीलप्रमाणे मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या असलेली काही मशिनरी / उपकरणे / फर्नीचर वापरुन खराब झालेले आहेत, तर काही नविन मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची त्यांना आवश्यकता आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Sai-nath Lab | Ortho OT | Gen OT | Neu-ro OT | Qty. | App. Rate Per in Rs. | App.Total Cost in Rs. | Reason for Demand |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(A) Machinery** | | | | | | | | | |
| 1 | Cell Counter Machine | 1 | | | | 1 | 520000.00 | 520000.00 | Old one is 5 years old, frequent breakdowns hamper work. |
| 2 | Ultra sonic instrument cleaner machine | | | | 1 | 1 | 40000.00 | 40000.00 | New demand, For micro fine & also all type instrument cleaning |
| **(B) Equipment** | | | | | | | | | |
| 1 | O.T. Table | | | 1 | | 1 | 200000.00 | 200000.00 | Old table is not working properly |
| 2 | Colonoscope with following Accessories- | | | 1 | | 1 | 850000.00 | 850000.00 | New Demand |
| | Biopsy Forcep | | | 3 | | 3 | 7000.00 | 21000.00 | |
| | Polyp Sniar | | | 2 | | 2 | 7000.00 | 14000.00 | |
| 3 | Peripheral nerve locator (Stimulator) with following insulated needle | | 1 | | | 1 | 56250.00 | 56250.00 | New Demand, For peripheral nerve blocks |
| | Contiplex D sets 55 mm | | 10 | | | 10 | 1391.25 | 13912.50 | |
| | Contiplex D sets 110 mm | | 10 | | | 10 | 1627.50 | 16275.00 | |
| | Stimuplex Needles | | 30 | | | 30 | 840.00 | 25200.00 | |
| **(C) Furniture** | | | | | | | | | |
| 1 | Endoscopic Trolley | | | 2 | | 2 | 30000.00 | 60000.00 | New demand, To keep Endoscopic Instrument during operation |
| 2 | Medicine Trolley | | | 2 | | 2 | 25000.00 | 50000.00 | New demand, To keep Guide wire / Stent / Catheters etc. |
| 3 | Instrument Trolley (Large OT) | | | 1 | | 1 | 6167.00 | 6167.00 | New Demand |
| | | | | | | | **Total -** | **1872804.50** | |

वरीलप्रमाणे मशिनरी/उपकरणे/फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रु. १८,७२,८०५/-इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे खरेदीकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०१ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मशिनरी /उपकरणे/फर्नीचर खरेदीकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७ श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता बेडशीटचे वाढीव खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०७/११/२००९ चे सभेतील निर्णय क्रमांक८९५ व निर्णय क्रमांक८९६ अन्वये श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय दोन्ही रुग्णालयाकरीता व नवीन भक्तनिवास या विभागाकरीता मे.बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रिज, पानिपत यांचेकडुन प्रती नग रु.१४१/- अधिक वाहतुक भाडे याप्रमाणे खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयाकरीता जा.क्र.६८९५ दिनांक ०१/०५/२०१० अन्वये एकुण १२०० बेडशीट, एकुण रु.१,६९,२००/- व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता जा.क्र. ५८६७ दिनांक १४/०४/२०१० अन्वये एकुण ११०० बेडशीट एकुण रु.१,५५,१००/- खरेदीचे पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. परंतु बेडशीट पाच कलरमध्ये मागणी केली होती याकरीता मे.बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रिज लि.पानिपत यांनी दिनांक०८/०५/२०१० च्या पत्राअन्वये बेडशीटचे वेगवेगळे कलर पाठविले होते. वैद्यकीय संचालक यांनी सदर बेडशीटचे कलर पाहिल्यानंतर त्यांनी पाठवलेल्या नमुन्यापैकी एकही रंग पसंत पडला नव्हता त्यामुळे दोन्ही रुग्णालयाकरीता (off white) कलर घेण्याचे ठरले व तसे त्यांना इकडील जा.क्र.९८२ दिनांक १८/०६/२०१० पत्राअन्वये कळवुन लवकरात लवकर बेडशीट पाठविण्याचे करावे असे पत्र दिले होते.

मे.बजाज हॅण्डलुम इंडस्ट्रिज,पाणिपत यांनी दिनांक २६/०६/२०१० च्या फॅक्सव्दारे सदर बेडशीटचे दर आता वाढलेले आहेत असे कळविले आहे. पुरवठा आदेशातील मंजुर दर रु.१४१/-प्रती नग असे होते, व नवीन दर रु.१५२/-प्रती नग अधिक वाहतुक भाडे झाल्याचे कळविले आहे म्हणजे प्रत्येक नगामागे रु.११/- ने दर वाढले आहेत एकुण २३०० नग बेडशीटकरीता रु.२५,३००/- असा जास्तीचा खर्च आलेला आहे व पुन्हा दर वाढवु नये व रुग्णालयात बेडशीटचा तुटवडा होता म्हणुन मे.बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रिज,पानिपत यांना नवीन दर रु.१५२/- प्रमाणे पुरवठा करणेबाबद कळविण्यात आले होते. मे. बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रि यांनी १२०० नगाचा पुरवठा केला असुन ११०० बेडशीट पाठवले आहे असे दुरध्वनीवरुन दिनांक २०/०८/२०१० रोजी सांगितले आहे.

तरी सदर बेडशीट खरेदीकरता आलेल्या रु.२५,३००/- चे जादा खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८ श्रीसाईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरकरीता युरोलॉजी इन्स्ट्रूमेंट खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात युरोलॉजी शस्त्रक्रिया केल्या जातात, सदरचे शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता आहे, त्यामुळे त्यांनी दि. १२/०६/२०१० चे मागणी पत्रान्वये खालील इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या असलेली काही इन्स्ट्रुमेंट वापरुन खराब झालेले आहेत, तर काही नविन इन्स्ट्रुमेंटची त्यांना आवश्यकता आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | App.Rate Per in Rs. | Total App. Cost in Rs. | Reason for Demand |
|---|---|---|---|---|---|
| 1 | UTI Forcep 4F or 3F | 1 | 4500.00 | 4500.00 | New Demand |
| 2 | Formalin Vaporizer Large | 4 | 5000.00 | 20000.00 | To Keep endoscopic instruments for sterilizing |
| 3 | Formalin Vaporizer Medium | 4 | 5000.00 | 20000.00 | |
| 4 | One step knottingham dilator 6/10 | 1 | 2554.00 | 2554.00 | New Demand |
| 5 | One step knottingham dilator 6/12 | 2 | 2554.00 | 5108.00 | New Demand |
| 6 | One step knottingham dilator 6/14 | 1 | 2554.00 | 2554.00 | New Demand |
| 7 | Resertocope loop (Cutting) | 24 | 3500.00 | 84000.00 | All loops are crash |
| 8 | Nitinol Basket for stone removing through uretrescope 4F, 3F (Each 2) | 4 | 12000.00 | 48000.00 | New Demand |
| 9 | DJ Stent removel forceps | 2 | 3500.00 | 7000.00 | New Demand |
| 10 | Balloon Dialator for uretor | 2 | 3038.00 | 6076.00 | New Demand |
| 11 | Bone Nibbler | 1 | 1669.00 | 1669.00 | New Demand |
| 12 | Rib Respiratory Right | 1 | 1923.00 | 1923.00 | New Demand |
| 13 | Rib Respiratory Left | 1 | 1923.00 | 1923.00 | New Demand |
| 14 | Vascular Bulldog clips small | 2 | 951.00 | 1902.00 | New Demand |
| 15 | Lium OD Dubbaction Bone Cutter | 1 | 1604.00 | 1604.00 | New Demand |
| 16 | Mixter Straight 5", 6", 8", 10" Each 2 | 8 | 1000.00 | 8000.00 | New Demand |
| | | | **Total -** | **2,16,813.00** | |

वरीलप्रमाणे युरोलॉजी शस्त्रक्रियेकरीता लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. २,१६,८१३/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.२,१६,८१३/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०३ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे युरोलॉजी शस्त्रक्रियेकरीता लागणारे इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणारे अंदाजे रु.२,१६,८१३/- चे खर्चास मान्यता आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९ साईसेवा निवासी मतिमंद मुला-मुलींचे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य तपासणी व औषधे देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याध्यापक, साई सेवा निवासी मतिमंद मुला - मुलींची शाळा, शिरडी - साकुरी शिवरस्ता, ता. राहाता यांनी त्यांचे जा.क्र.२०८/२०१०-११ दि. १३/०८/२०१० रोजीचे पत्रान्वये, साई सेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळेत शिक्षण घेत असलेल्या ६० मतिमंद मुला - मुलींची मोफत वैद्यकीय तपासणी व औषधे मोफत देणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. .

सदर विनंती अर्जानुसार साई सेवा निवासी मतिमंद मुला - मुलींची शाळा, शिरडी या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या ६० मतिमंद मुला - मुलींची चालू शैक्षणिक वर्ष २०१०-११ या काळात मोफत वैद्यकीय तपासणी व सदर तपासणी काळात आवश्यक त्यांना मोफत औषधे रुग्णालयामार्फत देता येतील. परंतु सदरची सुविधा त्यांना कायम स्वरुपी देता येणार नाही.

तरी साई सेवा निवासी मतिमंद शाळेच्या एकूण ६० मतीमंद विद्यार्थ्यांना (मुला-मुलींचे) मोफत वैद्यकीय तपासणी व मोफत औषधे देणेबाबत मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०४ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साई सेवा निवासी मतिमंद मुला - मुलींची शाळा,शिरडी या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या ६० मतिमंद मुला-मुलींची चालू शैक्षणिक वर्ष २०१०-११ या काळात मोफत वैद्यकीय तपासणी व सदर तपासणी काळात आवश्यक त्यांना मोफत औषधे रुग्णालयामार्फत मोफत देण्यात यावेत,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३० श्री भगवान नरहरी मते,लिपिक यांचे अवलंबित आईचे वैद्यकीय बील मंजूरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. भगवान नरहरी मते, (लिपिक - टंकलेखक, बांधकाम विभाग) यांची आई सौ.सुमन नरहरी मते यांचा गुडघा दुखत असल्यामुळे त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय उपचारासाठी अस्थिरोग तज्ञ डॉ. जपे यांच्याकडे दि. २६/०८/२००९ रोजी भरती करण्यात आले होते. विहित तपासण्याअंती कृत्रीम सांधा रोपण शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉक्टरांनी त्यांना दिला होता. यासाठी साधारणतः रु. ८२,०६४/- इतका अपेक्षित खर्च सांगितला होता.

कृत्रीम सांधा रोपण शस्त्रक्रियेमध्ये लागणारा इंर्पोटेड अथवा इतर देशी कृत्रीम सांधा संस्थान मार्फत दिला जात नाही, असे मा. वैद्यकिय संचालक यांनी श्री. मते यांना स्पष्टपणे सांगितले होते. यावर लागणाऱ्या एकुण रक्कमेपैकी रु. २५,०००/- रोखीने जमा केली. संस्थान कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबितासाठी परतावा देणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येऊन त्यावर होणारा निर्णय मला मान्य राहील, आवश्यक असलेली रक्कम मी रोख भरण्यासाठी तयार आहे, तथापी माझ्या पगारातून वसुल करण्यास हरकत नाही, असे श्री. मते यांनी लेखी स्वरुपात त्यावेळेस मान्य केले होते.

हॉस्पिटलमध्ये अशा प्रकारच्या शस्त्रक्रियांमध्ये संस्थानमार्फत कृत्रीम सांधा देण्यात येत नाही. याबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन संस्थान कर्मचाऱ्यांना मेडीक्लेम योजना लागु करण्याबाबत निर्णय झालेला आहे परंतु प्रत्यक्ष वैद्यकिय खर्च व मेडीक्लेम विमा हप्ता यांचा सारासार विचार करता अदयाप मेडीक्लेम योजना लागू करण्याबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही.

श्री.मते यांचे विनंती अर्जावरुन त्यांचे आई सौ. सुमन नरहरी मते यांना रु. ७५,१६४/- चा इंर्पोटेड कृत्रीम सांधा वापरण्यात आला आहे. यापैकी त्यांनी पावती क्रमांक ५१०२५१७१ दि.०५/०९/२००९ अन्वये रु.२५,०००/- जमा केले आहेत. यापुर्वी अशाप्रकारे संस्थान कर्मचारी श्री. शेज्वळ या रुग्णास आवश्यकता भासली होती तेंव्हा प्रस्ताव प्रथमतः मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये सादर करुन विशेष मंजुरीसह इंर्पोटेड कृत्रिम सांध्याच्या खर्चास मंजुरी मिळाली होती व त्यानंतर वैद्यकिय उपचार करण्यात आले होते.

श्री. मते यांनी संस्थानमध्ये रक्कम जमा केली तेंव्हा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचाराधीन होता. मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मेडीक्लेम योजना लागू करणेबाबत निर्णय झालेला आहे. परंतु मेडीक्लेम योजनेबाबत कार्यवाही झालेली नाही. अशा प्रकारे जर कृत्रीम सांधे कर्मचाऱ्याने उपलब्ध करुन दिले तर पुढील वैद्यकिय उपचार मोफत करण्यात येतात. अपवादात्मक परिस्थितीत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रथमतः मान्यता घेऊन खर्च केला गेला आहे. मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतरच कार्यवाही केली आहे. उदा. श्री. शेज्वळ यांचे वडीलांकरीता रु. ७८,०००/- मंजूर झाल्यानंतर कार्यवाही झालेली आहे. सदर परिस्थितीचा सारासार विचार करता श्री. मते यांना एकूण रु.

७५,१६४/- पूर्णपणे माफ करणेस अथवा साधा गुडघा व महागडा गुडघा यातील फरक रु. ३५,१६४/- भरुन उर्वरीत रु. ४०,०००/- माफ करणेस अथवा संपूर्ण रक्कम रु. ७५,१६४/- रोखीने अथवा त्यांनी संमती दिलेप्रमाणे पगारातून वसूल करता येईल.

**निर्णय क्र. ७०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. भगवान नरहरी मते, लिपिक यांचे अवलंबित आईचा बसविण्यात आलेला साधा गुडघा व महागडा गुडघा यातील फरक रक्कम रु. ३५,१६४/- संबंधिताकडून भरुन घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१ श्रीसाईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाकरिता Micro Scissor खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२९/०७/२०१० रोजीचे मागणी पत्रान्वये खालील प्रमाणे Micro Scissor ची मागणी केलेली आहे. कारण सध्या असलेल्या सिझर नादुरुस्त असल्यामुळे कंपनीकडे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत, तसेच शस्त्रक्रियांची संख्यादेखील वाढलेली आहे. त्यामुळे सदरचे सिझरची ऑपरेशन थिएटर विभागात दैनंदिन शस्त्रक्रियेकरीता अत्यंत आवश्यकता आहे. त्यानुसार खालील प्रमाणे Micro Scissor खरेदीचा प्रस्ताव आहे. सदरचे खरेदीकामी Aesculap कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. इम्पेरीयल सर्जिकल, मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दि. ०९/०८/२०१० रोजीचे फॅक्स दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी रु.२,८८,९५२/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Catalogue No. | Description | Make | Qty. | App. Rate Per in Rs. | App.Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | FD012R | MICRO SCSRFLT-HDL/ CROSS – SERSTR120MM | Aesculap | 1 | 44669.67 | 44669.67 |
| 2 | FD013R | MICRO SCSRFLT-HDL/ CROSS – SERCVD120MM | Aesculap | 1 | 48782.41 | 48782.41 |
| 3 | FD022R | YASARGIL MICRO SCISSOR STR 185MM | Aesculap | 1 | 62485.91 | 62485.91 |
| 4 | FD023R | JACOBSON MICRO SCISSORS CVD 185MM | Aesculap | 1 | 68656.73 | 68656.73 |
| 5 | FM042R | MICRO SPRING SCISSORS STR SP/SP 180MM | Aesculap | 1 | 64357.19 | 64357.19 |
| | | | | | **Total in Rs.** | **2,88,951.90** |

तरी वरीलप्रमाणे Micro Scissor विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,८८,९५२/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Micro Scissor विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,८८,९५२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात ईपॉक्सी फ्लोअरिंगचे काम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जनरल ऑपरेशन थिएटर विभागातील ऑपरेशन थिएटर नं. १ व २ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे, सदरचे Epoxy Flooring हे सन २००६ या वर्षात करणेत आलेले होते परंतु दररोजचे दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले आहे. त्यामुळे त्यात पाणी जाऊन जंतुसंसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते, तेंव्हा बांधकाम विभागास समक्ष पाहणी करुन तेथे नविन Epoxy Flooring चे काम करणेकामी मोजमापे करणे विषयी दि.२२/०७/२०१० चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.०४/०८/२०१० चे पत्रान्वये सदरची मोजमापे दिलेली आहेत ती खालील प्रमाणे:-

| अ.नं. | ठिकाण | साईज | साईज स्के.मि. |
|---|---|---|---|
| १ | जनरल ऑपरेशन थिएटर नं. १ | १९"-६"x१६" | ३१३.६ sqft. |
| २ | जनरल ऑपरेशन थिएटर नं. २ | १९"-६"x१६" | ३१३.६ sqft. |
| | | Less Corner ६ x १२ | ७२ sqft |
| | | Total | ५५५.०२sqft (५३ Sqm.) |
| ३ | Coving O.T. १ & २ Both | | ७१Rft. (२२ Mtr) |

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या मोजमापावरुन दोन्ही ऑपरेशन थिएटर मिळून ५३ स्क्वे.मि. इतके Epoxy Flooring व Coving चे २२ रनिंग मिटर इतके काम करावे लागणार आहे. यापूर्वी श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता इकडील पत्र क्र.१४५१७ दि.२८/११/२००९ अन्वये व श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. व ऑप्थेलमिक ऑपरेशन थिएटर विभागात ईपॉक्सी फ्लोअरींगचे कामासाठी दि.०७/११/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजूर दराने इकडील पत्र क्र.४४१६ दि.०९/०३/२०१० अन्वये मे. ॲपल एअरकॉन प्रा.लि., मुंबई यांचेकडून काम करुन घेण्यात आलेले आहे. उपरोक्त मंजुर दर प्रती स्क्वे.मि. रु.१४५०/- याप्रमाणे सदरचे ५३ स्क्वे.मि.

इतके Epoxy Flooring व Coving - २२ रनिंग मिटर असे एकुण एकत्रित कामाकरीता अंदाजे रु.१,०८,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी जनरल ऑपरेशन थिएटर विभागात Epoxy Flooring व Coving चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करण्यास व सदरचे कामासाठी येणाऱ्या एकूण अंदाजे रु. १,०८,७५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे जनरल ऑपरेशन थिएटर विभागात Epoxy Flooring व Coving चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करण्यास याकामी येणाऱ्या एकूण अंदाजे रु. १,०८,७५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३३ श्रीसाईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडिक ऑपरेशन थिएटरसाठी हॅलो मिल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.११/०१/२०१०चे मागणी पत्रकान्वये सिन्थेस कंपनीच्या ३ साईजच्या प्रत्येकी १ नग हॅलो मिलची मागणी केलेली आहे. कारण सध्या आपणाकडे सिन्थेस कंपनीचे इन्स्ट्रुमेंट आहे. त्यासाठी याच कंपनीच्या हॅलो मीलची आवश्यकता आहे. सदर हॅलो मिल हे रुग्णांची शस्त्रक्रिया करतांनी जर एखादा स्क्रु रुग्णाच्या शरीरात राहीला तर तो हाताने काढता येऊ शकत नाही त्यामुळे सदर हॅलो मिल वापरल्यास शरीराला कोणतीही इजा होत नाही.

याकामी मे. सिन्थेस मेडीकल प्रा.लि., नवी दिल्ली यांना फोन करुन ई-मेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते त्यास अनूसरुन त्यांनी दि.०६/०८/२०१० अन्वये ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे दर दिलेले आहे.

| Sr.No. | Cat. No. | Description | Qty. | Rate Per in Rs Incl. Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 309.035 | Hollow-Reamer- Compl Anticlockwise Cuttin | 1 | 13628.82 | 13628.82 |
| 2 | 309.450 | Hollow-Reamer- Compl Anticlockwise Cuttin | 1 | 13628.82 | 13628.82 |
| 3 | 309.065 | Hollow-Reamer- Compl Anticlockwise Cuttin | 1 | 13628.82 | 13628.82 |
| | | **Total Amt. in Rs.** | | | **40886.46** |
| | | **Less 10% Discount** | | | **4088.65** |
| | | **Total Amt. in Rs.** | | | **36797.81** |

उपरोक्त दरांचा विचार करीता ३ नग हॅलो मिल खरेदीकामी अंदाजे रु.४०,८८६/- इतका खर्च येणार होता. सदर दरांबाबत कंपनीचे एरीया सेल्स मॅनेजर श्री उदय पाटील यांना आपण दिलेल्या दरात अजून काही सूट देऊ शकतात का ? असे दूरध्वनीवरुन दि.१६/०८/२०१० रोजी विचारणा करण्यात आली होती त्यास अनूसरुन त्यांनी दि.१६/०८/२०१० चे ई-मेल पत्रान्वये १०% सूट देऊ केलेली आहे त्यांचे नविन दरानुसार ३ नग हॅलो मिल खरेदीकामी एकूण रु.३६,७९८/- इतका खर्च येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे ३ नग हॅलो मिल मे. सिन्थेस मेडीकल प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.३६,७९८/- इतक्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७०८ यावर सविस्तर चर्चा होऊन श्रीसाईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडिक ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक असणारे ०३ नग हॅलो मिल मे. सिन्थेस मेडीकल प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.३६,७९८/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३४ रुग्णालयाचे जावक विभागासाठी पाकीटे छपाई करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एच.आर.विभागात श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलचे जावक विभागाचे कामकाज दि. १२.०५.२०१० पासून स्वतंत्रपणे सुरु करण्यात आलेले आहे. रुग्णालयाचे जावक विभागाने पत्र पोस्टाने पाठविणेकामी लागणारे पाकीट व नोंदी घेणेसाठी लागणारे रजिष्टरची डी.पी.नं. ३७९६, दि. २१.०७.२०१० रोजी मागणी केलेली आहे. यापूर्वी जावक विभाग संस्थानचे प्रशासन शाखेकडे होते. त्यामुळे वार्षिक छपाईमध्ये सदर पाकिटांची मागणी केलेली नव्हती. तसेच सदरचे पाकिटे संस्थानचे भांडार विभागाकडे शिल्लक नाही.

त्यांचे मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | छपाई तपशिल | साईज | मागणी (नग) | अंदाजे किंमत प्रति नग | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जावक नोंदणी रजिष्टर | १४" x १०" साईजचे, ३०० पेजेस (३०० नंबर), ७० Gsm लेजर पेपर (ब्राऊन पेपर कव्हर, कॉर्नर कापड पट्टी बायडींग व नंबरींगसह ) | १० | ३००.०० | ३०००.०० |
| ०२ | खाकी विंडो पाकिटे | १०" x ४" साईजचे, कागद नमुन्याप्रमाणे | १५,००० | ०.८० | १२,०००.०० |
| ०३ | पांढरी (उदी प्रसाद) विंडो पाकिटे | ८" x ४" साईजचे, कागद नमुन्याप्रमाणे | १०,००० | ०.८० | ८,०००.०० |
| ०४ | खाकी मोठी पाकिटे | १२" x ५" साईजचे, कागद नमुन्याप्रमाणे | ५,००० | १.०० | ५,०००.०० |
| ०५ | खाकी मोठी पाकिटे | १५" x १०.५" साईजचे, कागद नमुन्याप्रमाणे | २,००० | २.०० | ४,०००.०० |
| ०६ | खाकी (प्लेन) पाकिटे | १०" x ४" साईजचे, कागद नमुन्याप्रमाणे | १०,००० | ०.७० | ७०००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | ३९,०००.०० |

उपरोक्त खाकी पाकिटे छपाईकामी अंदाजे रुपये ३९,००० /- (अक्षरी रु. एकोणचाळीस हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे छपाई कामी येणाऱ्या अंदाजे रु. ३९,००० /- (अक्षरी रु. एकोणचाळीस हजार) चे खर्चास व विहीत पध्दतीने छपाई करुन घेणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र. ७०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रुग्णालयाचे जावक विभागासाठी आवश्यक असणारे खाकी पाकीटै विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३९,०००/-खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३५ सन २०१०-११ करीता इलेक्ट्रीक व हार्डवेअर साहित्य खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ सालामध्ये संस्थानचे विद्युत विभाग दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक इलेक्ट्रीक, हार्डवेअर साहित्य खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

०१. विदयुत विभाग रु. ३०,९४,८५८.७०

**एकुण पुर्णांकित रक्कम रु.३१,००,०००.००**

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु.३१,००,०००/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २(झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

०१. विदयुत, विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल, हार्डवेअर साहित्य, साहित्यासाठी स्वतंत्रपणे निविदा मागणी करता येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २०१०-११ साठी विद्युत विभागास आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे तत्वतः मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेत येईल. त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस तत्वतः मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ७१० यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१०-११ साठी विद्युत विभागास आवश्यक असणारे वार्षिक साहित्य खरेदीस तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग )

---

**विषय नं.३६ विशेष भोजन कक्षाकरीता पापड व बडीशोप खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील विशेष भोजन कक्षामध्ये भोजन घेणाऱ्या भक्तांस भोजनामध्ये पापड देण्यात येतात. तसेच भोजनानंतर त्यांना मुखशुध्दीसाठी बडीशोप देण्यात येते. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र.२७६(४९) नुसार दि.२८.०६.२०१० पासून विशेष भोजन कक्षामध्ये प्रती व्यक्ती रु.४०/- दराने अमर्याद संख्येने भक्तांस भोजनाचा लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे विशेष भोजन कक्षामध्ये भोजन प्रसादाचा लाभ घेणाऱ्या साईभक्तांच्या संख्येत ४ पटीने वाढ झालेली आहे.

सन २०१०-११ चे वार्षिक किराणा माल खरेदीमध्ये पापड व बडीशोपबाबत खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | परिमाण क्विंटल | दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१. | पापड, लिज्जत | ०६.०० | रु.१५,२००/- |
| ०२. | बडीशोप, हिरवी बारीक | ०.७५ | रु.१४,५००/-+ व्हॅट |

उपरोक्त प्रमाणे मालाचा पुरवठा करणेकामी मे.बाफना बाजार, नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे माल मागणीचलनाप्रमाणे त्यांनी मालाचा पुरवठा नियमीत केलेला असून सदर मालाची मर्यादा संपलेली आहे.

परंतू श्री साई प्रसादालय विभागाकडील दि.१६.०८.२०१० रोजीचे मंजुर टिपणी अन्वये त्यांनी कळविले प्रमाणे विशेष भोजन कक्षामध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांमध्ये ४ पटीने वाढ झाल्याने सन २०१०-११ मध्ये पापड व बडीशोप ची खरेदी करणे गरजेचे आहे. त्यानुसार त्यांनी आणखी १८०० किलो पापड व २२५ किलो बडीशोप खरेदी करण्याचे सुचविले आहे.

उपरोक्त प्रमाणे १८०० किलो पापड व २२५ किलो बडीशोप मंजुर दराने खरेदी केल्यास अनुक्रमे रु.२,७३,६००/- व रु.३२,६२५/- (+व्हॅट) असा एकत्रित रु.३,०६,२२५/- + (रु.३२,६२५/- चे रकमेस व्हॅट) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी मे.बाफना बाजार, नाशिक यांचेकडून उपरोक्तप्रमाणे वाढीव परिमाणात पापड १८०० किलो व बडीशोप २२५ किलो वार्षिक मंजुर दराने खरेदी करणेस व अंदाजे येणारा रु.३,०६,२२५/- + व्हॅट चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ७११ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विशेष भोजन कक्षाकरीता आवश्यक असणारे पापड १८०० किलो व बडीशोप २२५ किलो वार्षिक मंजूर दराने मे.बाफना बाजार, नाशिक यांचे कडून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,०६,२२५/- + व्हॅटचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३७ सुरक्षा साहित्याचे सेंट्रल लाईज्ड कंट्रोल रुमकरीता नवीन ए.सी खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व परीसर तसेच `श्रीं` चे दर्शनाकरीता येणा-या भक्तांचे सुरक्षिततेकरीता मे.व्हेन्टेज सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा या कंपनीमार्फत सुमारे ४.५ कोटी रुपयांचे सुरक्षा साहित्य (सी.सी.टि.व्ही.कॅमेरे, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, बॅग स्कॅनर इ.) बसविण्यात येणार असून त्यावर नियंत्रण ठेवले जाणार आहे. तसेच सदर यंत्रणा व्यवस्थीत कार्यान्वित राहावी यासाठी सदरच्या रुमचे तापमान नियंत्रित असणे गरजेचे आहे.

उपरोक्त गोष्टी लक्षात घेता त्यासाठी तयार करावी लागणारी यंत्रणा कंट्रोल रुम मंदिर परीसरातच मध्यवर्ती ठिकाणी गुरुस्थान मंदिराचे समोर असलेल्या तळघरात (ध्यानमंदिर) हॉलमधील जागेत करण्याचे उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे. त्या अनुषंगाने सदरच्या ध्यान मंदिरातील हॉलमध्ये तयार येणा-या कंट्रोल रुमची प्रत्यक्ष विद्युत विभागामार्फत पाहणी केली असता सदर ठिकाणी कंट्रोल रुममसाठी तापमान नियंत्रित राहावे याकरीता एकुण दोन टन क्षमतेचे ०६ नग स्प्लिट ए.सी.बसवावे लागणार आहे. सध्या विद्युत विभागाकडे नविन ए.सी.शिल्लक नसल्याने आपणाला नविन ०६ नग ए.सी.सदर कंट्रोल रुमसाठी खरेदी करुन बसवावे लागणार आहे.

सरंक्षण विभागाचे नविन कंट्रोल रुमचे ठिकाणी नविन ए.सी. स्प्लिट टाईप २ टनी ए.सी. बसविणे गरजेचे आहे. त्यासाठी ते खालीलप्रमाणे खरेदी करावे लागणार आहे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 3-27 | Supplying and erecting split type room Airconditioning unit 2 TR capacity 250V. 50 cycles, A.C. supply having 1 No of air handling unit hi-wall mounting type complete at position as per specification no. AP-AC/SAC | 06 Nos. | 40,181.40 | 2,41,088.40 |
| | | | | Total. | 2,41,088.40 |
| | | | | **Round up :-** | **2,41,088.00** |

उपरोक्तप्रमाणे संरक्षण विभागाचे सेंट्रल लाईज्ड कंट्रोल रुमसाठी नविन ए.सी.ची खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,४१,०८८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे ए.सी. कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संरक्षण विभागाचे सेंट्रल लाईज्ड कंट्रोल रुमसाठी नविन ए.सी. कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,४१,०८८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८ सुरक्षा साहित्य कंट्रोल रुमचे विद्युतीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** ``श्रीं`` च्या दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी मंदिर परीसर, चारही ठिकाणचे प्रवेशव्दार तसेच दर्शनलाईनमध्ये C.C.T.V., कॅमेरे, एल.सी.डी., डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, बॅगेज स्कॅनर इत्यादि यंत्रणा बसवून कार्यान्वित करावयाचे आहेत. सदर यंत्रणेचे कंट्रोल रुम गुरुस्थान मंदिरासमोरील तळघरामध्ये (ध्यान मंदिर) याठिकाणी कार्यान्वित करण्याचे ठरलेले आहे. सदर प्रोजेक्टसाठी कंपनीला १५ KW इतका इलेक्ट्रीक

लोड (कंट्रोल रुममध्ये बसविण्यात येणारे ए.सी.व इतर इलेक्ट्रीक उपकरणे सोडून) आवश्यक आहे. तरी नव्याने करण्यात येणा-या गुरुस्थान समोरील तळघरातील सुरक्षा कंट्रोल रुममध्ये १५ KW इतका इलेक्ट्रीक लोड पुरविणेकामी संरक्षण विभाग यांनी उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे. तसेच तेथील केबीनमधील टयुबलाईट व स्वीच बोर्ड शिफ्ट करुन नविन बसवावे लागणार आहेत. कंट्रोल रुममधील मशिनरींना तसेच ए.सी.यंत्रणेला वीजपुरवठा करणेकरीता वायरींगचे काम करुन दयावे लागणार आहे.

सुरक्षा साहित्य कंट्रोल रुमचे विद्युतीकरण कामाची माहिती तसेच येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 5-1-18 | Supplying & Erecting Triple pole HRC fuse switch 415 / 500V 200A with neutral link | 02 Nos. | 9,580.20 | 0,19,160.40 |
| 02) | 9-1-2 | Supplying & Erecting copper earth plate size 30x30x06cm complete with all materials. | 01 Nos. | 2,625.00 | 0,02,625.00 |
| 03) | 9-2-2 | Supplying & Erecting copper strip of required size. | 40 K.G. | 0,526.05 | 0,21,042.00 |
| 04) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 300 Mtr. | 0,044,10 | 0,13,230.00 |
| 05) | 7-1-24 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 50 sq.mm. aluminium conductor. | 300 Mtr. | 0,346.50 | 1,03,950.00 |
| 06) | 5-4-18 | Supplying & erecting single pole and netural distribution board. | 01 Nos. | 1,079.40 | 0,01,079.40 |
| 07) | 5-4-10 | Supplying and erecting triple pole and neutral distribution board. | 01 Nos. | 4,814.25 | 0,04,819.25 |
| 08) | 5-3-2 | Suppling,erecting & marking SPMCB 6A to 32A. | 20 Nos. | 0,171.15 | 0,03,423.00 |
| 09) | 5-6-10 | Supplying, fixing and commissioning 32A/40A 2 pole RCCB+MCB. | 01 Nos. | 2,641.80 | 0,02,641.80 |
| 10) | 5-6-14 | Supplying, fixing and commissioning 63A 4 pole 3 phase RCCB+MCB. | 01 Nos. | 3,381.00 | 0,03,381.00 |
| 11) | 7-7-5 | Supplying and erecting Flange type brass cable glands. | 04 Nos. | 0,121.27 | 0,00,485.08 |
| 12) | 7-10-4 | Supplying and erecting crimping type aluminium lugs. | 16 Nos. | 0,012.60 | 0,00,201.60 |
| 13) | 17-5-12 | Supplying and erecting ISI mark G.I. pipe 50mm. dia "C" class. | 250 Mtr. | 0,387.45 | 0,96,862.50 |
| 14) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A / 10A | 25 Nos. | 0,090.30 | 0,02,257.50 |
| 15) | 1-8-7 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20A with indicator. | 20 Nos. | 0,140.70 | 0,02,814.00 |
| 16) | 1-8-15 | Supplying and Erecting modular type 3 pin 16A combined unit. | 20 Nos. | 0,185.85 | 0,03,717.00 |
| 17) | 1-8-13 | Supplying and Erecting modular type 3 pin 6A socket. | 10 Nos. | 0,107.10 | 0,01,071.00 |
| 18) | 1-8-27 | Supplying and erecting modular type electronic step regulator two module. | 10 Nos. | 0,397.95 | 0,03,979.50 |
| 19) | 1-8-36 | Supplying and Erecting PVC Surface 8 modular switch box. | 02 Nos. | 0,245.70 | 0,00,491.40 |
| 20) | 1-8-37 | Supplying and Erecting PVC Surface 12 modular switch box. | 03 Nos. | 0,305.55 | 0,00,916.65 |
| 21) | 1-8-33 | Supplying and Erecting PVC Surface 3 modular switch box. | 06 Nos. | 0,130.20 | 0,00,781.20 |
| 22) | 1-8-32 | Supplying and Erecting PVC Surface 2 modular switch box. | 15 | 0,108.15 | 0,01,622.25 |
| 23) | NON C.S.R. | Supplying & Erecting 2x2.5 Sq.mm. and earth wire 2.5 sq. mm. | 100 Mtr. | 0,059.85 | 0,05,985.00 |
| 24) | NON C.S.R | Supplying & Erecting 2x4 Sq.mm. and earth wire 2.5 sq. mm. | 600 Mtr. | 0,076.65 | 0,45,990.00 |
| 25) | NON C.S.R | Cutting the existing tiles on the floor without any damages and making the trench. | 65 Mtr. | 0,220.00 | 0,14,300.00 |
| 26) | NON C.S.R | Cutting the existing tiles on the floor without any damages and making the trench. | 40 Mtr. | 0,205.00 | 0,08,200.00 |
| | | | | Total. | 3,65,021.53 |
| | | | | + Contigency 5% | 0,18,251.08 |
| | | | | Total Amount :- | 3,83,272.61 |
| | | | | **Round up :-** | **3,83,273.00** |

उपरोक्तप्रमाणे सुरक्षा रुममधील विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ३,८३,२७३.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा रुममधील विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,८३,२७३.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं ३९ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध ठिकाणी कोलॅप्सीबल गेट तयार करुन बसविणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व हॉस्पीटलमध्ये होणारी अनावश्यक गर्दी टाळणेसाठी वैद्यकीय संचालक यांचे मागणीनुसार खालीलप्रमाणे तीन ठिकाणी कॉलॅप्सीबल गेट बसवून देणेबाबत मागणी केलेली आहे.

०१) जनरल ओटी व अपघात विभागाच्या अंतर्गत प्रवेश व्दारासमोर अपघात विभागाकडे येणारा रॅम्प जेथे संपतो तेथील दोन कॉलमला जोडून पूर्व-पश्चिम गेट.

०२) मध्यवर्ती औषध भांडाराच्या प्रवेशव्दारासमोर व हॉस्पीटलमधून जनसंपर्क विभागामध्ये जाणा-या पाय-यांसमोर पूर्व-पश्चिम गेट, सदर गेट हे औषध भांडार समोरील प्रवेशव्दाराच्या कठ्डयापासून जनसंपर्क विभागाकडे जाणा-या पाय-याच्या कठ्डयापर्यंतच कोलॅप्सीबल करुन उर्वरीत दोन्ही भिंतीपर्यंत फिक्स करावे लागतील.

०३) रिसेप्शनमागील जिन्याच्या पायथ्याजवळ वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक, वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी समक्ष पाहणी करुन गर्दीचे नियोजन करणेसाठी वरीलप्रमाणे कोलॅप्सीबल गेट बसविण्याच्या सुचना केलेल्या आहेत. तरी श्री साईबाबा हॉस्पीटलच्या मागणीनुसार वरील ठिकाणी कोलॅप्सीबल गेट बसवून मिळणेकामी उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध ठिकाणी कोलॅप्सीबल गेट स्थानिक फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन बसवून घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे)रु | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल, साईज :- ५० x ५० x ५ एम.एम. | ३०० किलो. | ५०.०० | १५,०००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल, साईज :- ४० x ४० x ५ एम.एम. | १०० किलो. | ५०.०० | ५,०००.०० |
| ०३) | एम.एस.स्क्वेअर बार, साईज :- १० एम.एम. | ६५० किलो. | ५०.०० | ३२,५००.०० |
| ०४) | एम.एस.शीट, १८ गेज, साईज :- ८ x ६ Feet. | ०२५ किलो. | ८०.०० | २,०००.०० |
| ०५) | एस.एस.ऑल्ड्रॉप हेवी, साईज :- १२`` | ००२ नग. | २००.०० | ४००.०० |
| ०६) | कोलॅप्सीबल गेट, साईज :- १६० स्क्वेअर फूट | १६० स्क्वेअर फूट (०२ नग) | २००.०० | ३२,०००.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | ८६,९००.००<br>१०,८६३.०० |
| | | | एकुण :-<br>+ लेबर चार्जेस ४०% :- | ९७,७६३.००<br>३९,१०५.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **१,३६,८६८.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध ठिकाणी कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,३६,८६८/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध ठिकाणी कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन्स मागवून तयार करुन घेण्यात यावे याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,३६,८६८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४० संस्थानचे पाणीपुरवठा योजनेकरीता नवीन जलशुध्दीकरण केंद्र, ओव्हरहेड टँक (ESR) जलवाहिन्या, पंपींग मशिनरी इत्यादींचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ०६ मार्च २०१० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये उपरोक्त विषयासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय नं.२९१ संमत करण्यात आलेला आहे.

"यावर सविस्त चर्चा होवून, सध्याच्या निविदा रद्द करुन किर्लोस्कर कंन्सल्टंट लि.पुणे यांची नेमणूक रद्द करण्यात यावी. तसेच, बारामती व शिरपुर येथील पाणी पुरवठा योजनेचे काम इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग प्रा.लि,पुणे या संस्थेची संस्थानचे नविन पाणी पुरवठा योजनेकरीता नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ. कामासाठी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात यावी आणि त्यांचेकडून प्रकल्पाचे डिझाईन व निविदा तयार करुन घ्याव्यात व त्यानुसार नव्याने निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार जा.नं.७१९०, दि.१०.०५.२०१० चे नोटीसीव्दारे किर्लोस्कर कंन्सल्टंट लिमिटेड, पुणे यांची नेमणूक रद्द करण्यात आलेली आहे. तसेच जा.नं.७६१८, दि.०४.०६.२०१० रोजीचे पत्राव्दारे इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि,पुणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्प हा महत्त्वपूर्ण व मोठया स्वरुपाचा असल्याने त्याविषयी मार्गदर्शन मिळणेकामी श्री आर.जी.होलाणी, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रदेश, औरंगाबाद यांना जा.नं.७२७१, दि.१५.०५.२०१० चे पत्राव्दारे विनंती करण्यात आली होती. तसेच याबाबत मा.अध्यक्ष साहेब यांनी त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली होती. त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दि.१९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे मा.श्री होलाणी साहेब यांची समक्ष भेट घेउन चर्चा केली. त्यानंतर मा.श्री होलाणी साहेब यांनी दि.०४.०६.२०१० रोजी शिर्डी येथे भेट देउन संस्थानची सध्याची पाणी पुरवठा योजना व इमारतींची पहाणी केली. त्यावेळी सल्लागार इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि,पुणे यांचे प्रतिनिधी श्री.आशिष दोषी हेही उपस्थित होते. तद्नंतर इन्फ्रा प्लॅन यांचेकडील श्री.आशिष दोषी यांनी

वेळोवेळी श्री.होलाणी साहेब यांची भेट घेवून चर्चा केली व त्यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे डिझाईन, प्लॅन व इस्टिमेट तयार केले असून दि.३०.०८.२०१० रोजी संस्थानकडे सादर केले आहे, त्यांनी सादर केलेल्या एस्टिमेटनुसार सदर प्रकल्पासाठी रुपये २८.१६ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर प्रकल्पासाठी येणारे रुपये २८.१६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास आणि वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मंजुरी मिळणेस विनंती. तसेच इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि,पुणे यांना सदरहु प्रकल्पासाठी सल्लासेवा पुरविणेकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३ % (तीन टक्के) अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी अदा करणेसाठी मंजुरीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ७१५ आजचे सभेपुढे इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि,पुणे यांचे प्रतिनिधी श्री.आशिष दोषी व श्री.दहीवाळ यांनी विषयांकीत प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण केले तसेच सर्व सदस्यांना प्रकल्पाच्या सविस्तर माहितीबाबत तयार केलेली पुस्तीका दिली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे पाणीपुरवठा योजनेकरीता नवीन जलशुध्दीकरण केंद्र, ओव्हरहेड टँक (ESR) जलवाहिन्या, पंपींग मशिनरी इत्यादींचे कामासाठी येणारे एकूण रुपये २८.१६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे साठवण तलावाची क्षमता आवश्यक त्या प्रमाणात वाढविणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत सविस्तर प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा, त्याचबरोबर सध्याचा कार्यान्वित असलेला प्रोजेक्ट पुरक ठेवावा, असे ठरले.**

**तसेच, इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि,पुणे यांना सदरहु प्रकल्पासाठी सल्लासेवा पुरविणेकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% (तीन टक्के) अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी अदा करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१ गर्दीचे कालावधीमध्ये तसेच उत्सवाचे वेळी अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजा बंद ठेवणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना स्वहस्ते पूजा अर्चना करता यावी यासाठी संस्थानचे वतीने भक्तांसाठी अभिषेक पूजा व श्री साईसत्यव्रत पूजेच्या बॅचेस घेतल्या जातात. बरेच भाविक दररोज या पूजेत सहभागी होतात व पुजेचा लाभ घेतात. उत्सवात परंपरेनुसार असलेले भरगच्च कार्यक्रमामुळे या कालावधीत अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजेसाठी स्वतंत्र पुजारी व इतर कर्मचारी देणे शक्य होत नाही. तसेच इतर वेळात भाविकांना या पूजेचा लाभ नेहमीच घेता येतो.

अ) तरी श्री रामनवमी उत्सवामध्ये ३ अथवा ४ दिवस +२ दिवस, श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ३ दिवस +२ दिवस, श्री पुण्यतिथी(दसरा) उत्सव ३अथवा ४ दिवस +२ दिवस याप्रमाणे सर्व उत्सव कालावधीत तसेच उत्सवाचे आदले दिवशी व उत्सव सांगता दिनाचे चे दुसरे दिवशी, तसेच वर्षातील २६ जानेवारी, ०१ मे (महाराष्ट्र दिन), १५ ऑगष्ट, दिपावली (पाडवा), गुढीपाडवा, सर्व शनि अमावस्या, दिवाळीची सुट्टीचे वेळी २१ दिवस, नाताळच्या सुट्टीतील दि.२४ डिसेंबर ते ०२ जानेवारी अखेर व उन्हाळयाच्या सुट्टीतील गुरुवार व रविवार व गर्दीचे दिवस, या प्रचंड गर्दीचे कालावधीत अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजा बंद ठेवण्यात याव्यात असे नम्र मत आहे.

यापुर्वी जवळपास ४० ते ५० वर्षापासून उत्सव कालावधीत अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजा बंद ठेवण्यात येत होत्या. त्यावेळी गर्दीचे प्रमाण आताच्या प्रमाणे एवढ्या मोठ्या प्रमाणात नव्हती. तरीही पूजा बंद ठेवण्यात येत होत्या आतातर गर्दीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. अलिकडे ०८ ते १० वर्षांपासून अभिषेक पूजा व सत्यनारायण पूजा चालू ठेवण्यात येत आहेत.

श्रींचे उत्सव कालावधीत व इतरवेळी सत्यनारायण व अभिषेक पूजा उपरोक्त "अ' प्रमाणे बंद ठेवाव्यात तसेच इतर गर्दीचे कालावधीमध्ये सत्यनारायण व अभिषेक पूजा बंद ठेवण्याबाबत उपरोक्त गर्दीच्या दिवशी सदर वर्षातील निर्णय संभाव्य गर्दीचा विचार करुन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी घेण्यात यावा. तसे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना देण्यात यावे असे नम्र मत आहे. तरी या कालावधीत पूजा बंद केल्यास जास्तीत जास्त भक्तांची सुलभ दर्शनासाठी सोय करता येईल. जेणेकरुन जास्तीत जास्त भाविकांना दर्शनाचा लाभ घेता येईल. इतर पूजेसाठी धावपळ होणार नाही. तसेच दर्शनासाठी पुजारी उपलब्ध करता येतील. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र. ७१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे उत्सव कालावधीत व इतर गर्दीचे वेळी सत्यनारायण व अभिषेक पूजा पूजा बंद ठेवण्याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा असे ठरले.**

**तसेच गर्दीचे कालावधीत रात्रभर मंदिर उघडे ठेवणेबाबतही मा.कार्यकारी अधिकारी यांनी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.४२ विशेष भोजन कक्षासाठी स्टेनलेस स्टिल ताट व इतर साहित्य खरेदी करणे/ देणगी घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०३/२०१० चे सभेतील निर्णय क्र.२७६(४९) नुसार साईभक्तांचे सोईसाठी विशेष भोजन व्यवस्था सुरु करणेबाबत निर्णय झालेला आहे. दि.२८/०६/२०१० पासुन इच्छूक भक्तांसाठी

सदर विशेष भोजन व्यवस्थेची तिकीट विक्री खुल्या स्वरुपात काऊंटरवर सुरु केल्यानंतर विशेष भोजनास उस्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे. भोजनासाठी एकूण भक्तांची गर्दी कमी असतांनासुध्दा दररोज सुमारे २००० पर्यंत साईभक्त विशेष प्रसाद भोजनाचा लाभ घेत आहेत. गर्दीचे कालावधीत सदर संख्या ३००० पर्यंत किंवा त्यापेक्षा जादा होईल.

पूर्वी मर्यादीत स्वरुपात भक्तांसाठी उपरोक्तप्रमाणे व्यवस्था चालू होती. त्यानुसार दररोज सुमारे ५०० पर्यंत भक्त सदर व्यवस्थेचा लाभ घेत होते. संख्या मर्यादीत असल्यामुळे त्याकामी भोजन घेणे, भोजन वाढणे वगैरेसाठी लागणारे साहित्य (स्टे.स्टील ताट, वाटी, चौपाळे, दुपाळे, चमचे वगैरे) मर्यादीत संख्येने खरेदी करण्यात आलेले होते. सदरकामी खरेदी केलेली ताट मशिनद्वारे धुतली जात नाहीत. त्यामुळे सदरची ताटे मनुष्यबळाकडून धुऊन घ्यावी लागत असून त्याकामी प्रति शिफ्टला ८ कर्मचारी लागतात. पूर्वीचे ताटाचा वापर मर्यादीत होता. आता सदर ताट शाही भोजन सुरु झाल्यास त्यासाठी वापरता येतील. विशेष भोजन व्यवस्थेसाठी दुस-या प्रकारचे ताट खरेदी करणे गरजेचे आहे. सदर ताट खरेदी करतांना डिश वॉशिंग मशिनद्वारे धुता येतील अशा पध्दतीचे खरेदी करावे लागतील.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या निर्णयानुसार सदर व्यवस्था खुल्या स्वरुपात (इच्छूक भक्तांसाठी) सुरु केलेली असल्याने त्याकामी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे .

| अ.नं. | तपशील | साईज | संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | स्टे. स्टील ताट | १२ इंच व्यास, गोल आकार | १००० नग |
| ०२ | स्टे. स्टील वाटी | १०० मिली ग्रॅम क्षमता | ३००० नग |
| ०३ | स्टे.स्टील चौपाळे | प्रति पाळयाची क्षमता १ लि. | १२ नग |
| ०४ | स्टे.स्टील तिपाळे | प्रति पाळयाची क्षमता १ लि. | ४८ नग |
| ०५ | स्टे.स्टील दुपाळे | प्रति पाळयाची क्षमता १ लि. | २४ नग |
| ०६ | स्टे. स्टील चमचे | ०.०५० मिली ग्रॅम क्षमता | १०० नग |
| ०७ | स्टे. स्टील ओगराळे | ०.१०० मिली ग्रॅम क्षमता | १०० नग |

वरीलप्रमाणे साहित्य घेणेसाठी अंदाजे रु.२,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. त्याकामी एखादा देणगीदार मिळाल्यास साहित्य देणगी स्वरुपात घेता येईल अथवा विहीत पध्दतीने खरेदी करता येतील.

तरी उपरोक्त साहित्य देणगी स्वरुपात घेणेस अथवा खरेदी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, विशेष भोजन कक्षासाठी स्टेनलेस स्टिल ताटे व इतर साहित्य खरेदी करणे अथवा देणगी घेणे बाबत मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४३ चपाती मशिनचा पुरवठा करणेस मुदतवाढ देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन उपसमिती दि.११/०३/२०१० चे सभेच्या शिफारशीनूसार व मा.व्यवस्थापन समिती दि.१८/०४/२०१० चे सभेतील निर्णय क्रं.३५७ अन्वये सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांचेकडून २ चपाती मशिन्स खरेदीस मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनूसार प्र.शा.जा.नं.एसएसएस /वशि/ प्रसादा/ ५७९८/१० दि.१२/०४/२०१० चे पत्राव्दारे सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांना २ चपाती मशिन पुरवठा करणेबाबत कळविणेत आलेले होते.

पुरवठा आदेशातील अटी/शर्ती क्रं.३ मध्ये चपाती मशिन पुरवठयासाठी २ ते ३ महिण्याचा कालावधी नमूद केलेला आहे. चपाती मशिन पुरवठा करणेसाठी दि.१२/०४/२०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानूसार पुरवठा आदेश देऊन ३ महिनेचा कालावधी पुर्ण झालेला आहे. तसेच चपाती मशिन पुरवठा करणेसाठी सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांनी दि.१३/०५/२०१० रोजी रितसर करारनामा करुन दिलेला आहे. सदर करारनाम्यातील अटी/शर्ती क्रं.२ मध्ये करारनाम्याचे तारखेपासून ६० दिवसात (२ महिने) चपाती मशिन पुरविणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. मात्र पुरवठादार यांनी सदर मुदतीत चपाती मशिनचा पुरवठा केलेला नाही. करारनाम्यातील अटी/शर्ती क्रं.११ मध्ये करारनामा अटी/शर्ती क्रं.२ नूसार पुरवठादार यांनी ६० दिवसांत चपाती मशिन श्री साई प्रसादालयात कार्यान्वीत करुन दिले नाही तर पुरवठादार यांनी प्रतिदिनी रु.५००/- संस्थानमध्ये जमा करणेचे आहे. सदर दंडाची रक्कम संस्थानने पुरवठादार यांची राहिलेली ५०% रक्कमेतून कपात करावयाची आहे. अशी करारनाम्यात तरतूद केलेली आहे.

सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांना चपाती मशिन नग २ चे पुरवठयासाठी देण्यात आलेली मुदत दि.१३/०७/२०१० रोजी संपलेली आहे. मात्र सनशाईन इंडस्ट्रीज नोईडा यांनी दि.१३/०७/२०१० चे पत्राद्वारे दि.१५/०८/२०१० पर्यंत चपाती मशिनचे पुरवठयाकरीता मुदतवाढ मागितलेली होती. पत्रामध्ये चपाती मशिन पुरवठादार यांनी २ चपाती मशिनचे किंमतीच्या ५०% ॲडव्हान्स १ महिना उशिराने मिळाला. आमची आर्थिक परिस्थीती तेवढी सक्षम नसल्यामुळे मशिनसाठी स्पेशल डाय बनविणेस उशीर झाला व त्यामुळे दि.१३/०७/२०१० पर्यंत मशिनचा पुरवठा करु शकलेलो नाही. या कारणास्तव आम्हाला २ चपाती मशिनचा

पुरवठा करणेस २ महिने मुदतवाढ मिळावी. मात्र त्यानंतर सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांनी दि.०७/०८/२०१० व दि.१७/०८/२०१० रोजीचे पत्राद्वारे कळविलेले आहे की, संस्थानला पुरवठा करावयाचे मशिन चांगल्या क्वालिटीचे व टिकाऊ असे देण्याचे असल्याने मशिनमध्ये आवश्यक ते बदल करावे लागत आहे. त्यामुळे मशिन पुरवठा करण्यास उशिर होत आहे. तरी आता दि.१२/०९/२०१० रोजी चपाती मशिनची तपासणी व पहाणी करणेसाठी आपले प्रतिनीधी पाठवावेत. आपले प्रतिनीधींचे चपाती मशिनबाबत समाधान झाल्यानंतर दि.१४/०९/२०१० रोजी नोईडा येथून पाठविणेत येईल. त्यानंतर ३-४ दिवसात मशिन शिरडी येथे पोहचेल. उपरोक्तप्रमाणे परवानगी असावी असे नमूद केलेले आहे.

तरी सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांचे दि.१३/०७/२०१०, दि.०७/०८/२०१० व १७/०८/२०१० चे पत्रामध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीवर विचार होऊन चपाती मशिन्स नग ०२ पुरवठा करण्यास सुमारे दि.२०/०९/२०१० अखेर मुदतवाढ देणे व दि.१२/०९/२०१० रोजी चपाती मशिनची पहाणी व तपासणी करणेकामी संस्थान प्रतिनीधी पाठविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सनशाईन इंडस्ट्रीज, नोईडा यांना चपाती मशिन्स नग ०२ पुरवठा करण्यास सुमारे दि.२०/०९/२०१० अखेर मुदतवाढ देण्यात यावी तसेच चपाती मशिनची पहाणी व तपासणी करणेकामी संस्थान प्रतिनीधींना (मा.विश्वस्तांना) विमानाने पाठविण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**दि.०५.०९.२०१० चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**विषय नं.४४ जुन्या प्रसादालयातील स्टेनलेस स्टिल टॉप व सीट लोखंडी फ्रेम असलेल्या टेबल्सची विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** जुन्या प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसादभोजनासाठी सन २००१ मध्ये स्टे.स्टील टॉप व सीट लोखंडी फ्रेमचे २०१ टेबल बनविण्यात आलेले होते. जुन्या प्रसादालयतील टेबलाचा घसारा वजा जाता एकत्रित किमंत रु.२,४०,३२०/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख चाळीस हजार तीनशे वीस मात्र) एवढी आहे. सदर टेबल्सचा वापर करतांना सतत पाण्याचा संबंध आल्याने फ्रेम्सनां गंज लागून खराब झालेल्या आहेत. त्यामुळे सदर टेबल्सची विक्री करणे योग्य होईल.

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांनी दि.०९/०६/२००९ चे पत्राने सदर टेबल्स नाममात्र दरात मिळावे म्हणून विनंती केली होती. त्यानूसार मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ चे सभेपुढे विषयाची टिपणी ठेवण्यात आलेली होती. त्यावर सविस्तर चर्चा होऊन सदर टेबल्सची लिलावाने विक्री करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे. मात्र अद्याप पावेतो सदर टेबल्सची लिलावाने विक्री केलेली नाही.

| तपशील | संख्या | प्रति नग दर | एकूण किंमत | घसारा वजा जाता किंमत | वापर सुरु झालेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| स्टे.स्टील टॉप व सीट लोखंडी फ्रेम असलेले टेबल्स | २०१ | ४१४४/- | ८,३२,९४४/- | २,४०,३२०/- | सन २००१ |

अभिलेख कक्षाकडील जा.नं.एसएसएस/वशि/ अ.क/१५/ ११९५/१० दि.१०/०४/२०१० परिपत्रकान्वये निरोपयोगी लोखंडी स्टे.स्टील. पितळी, ॲल्युमिनियम वगैरे साहित्याची कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेबाबत कळविलेले आहे. त्यानूसार सदर टेबल्सच्या लोखंडी फ्रेमची विक्री लोखंडी भंगार म्हणून प्रति किलो रु.१९/- व स्टे.स्टील टॉप व सीटची प्रति किलो रु.४०/५० प्रमाणे विक्री होऊ शकेल. त्यानुसार उपरोक्त टेबल्सची विक्री केल्यास प्रति टेबल्सची (लोखंड व स्टे.स्टील वजनाप्रमाणे) सुमारे रुपये १,३००/- किंमत येऊ शकेल. एकूण २०१ टेबल्सची सुमारे रु.२,६१,३००/- पर्यंत किंमत येऊ शकेल.

त्याचप्रमाणे मा.अधिक्षक प्रादेशिक मनो रुग्णालय, येरवडा पुणे यांनीही जुन्या प्रसादायातील फर्निचर देणगी स्वरुपात मिळावे अशी दिनांक ०७/०५/१० चे पत्राने कळविलेले आहे. त्याबाबत निर्णय होणेबाकी आहे.

तरी जुन्या प्रसादालयातील स्टे.स्टील टॉप व सीट लोखंडी फ्रेमचे टेबल्सची लिलावाने विक्री करावी अथवा अभिलेख कक्षाकडील परिपत्रकानूसार विक्री करावी किंवा मा.अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा पुणे यांना देणगी स्वरुपात देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ७१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या प्रसादालयातील स्टेनलेस स्टिल टॉप व सीट लोखंडी फ्रेम असलेले टेबल्स जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण व मा.अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा पुणे यांना देणगी म्हणून देण्यात यावी, याकामी शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी असे ठरले.**

**एकूण २०१ टेबल्स पैकी १४० टेबल्स थोड्याफार दुरुस्तीनंतर वापरता येऊ शकतील असे आहेत. १४० पैकी ५० टेबल्स मा.अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा पुणे व उर्वरित ९० टेबल्स जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांना देणेत यावेत. २०१ टेबल्सपैकी १४० टेबल्स वजा जाता राहिलेले ६१ टेबल्स अगदीच तुटलेले आहेत. सदर टेबल्स जंगली महाराज आश्रम ट्रस्ट**

**दुरुस्त करुन वापरणार असतील तर त्यांना द्यावेत. सदर ६१ टेबल्स जंगली महाराज आश्रम ट्रस्ट यांनी घेतले नाही तर लोखंडी, स्टे.स्टील भंगारचे वार्षिक मंजूर दराने विक्री करणेत यावेत, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४५** **श्री साईप्रसादालयातील मेंटेनन्ससाठी वार्षिक स्पेअरपार्ट खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयमध्ये वेगवेगळया मशिनरी कार्यान्वीत आहेत. सदर मशिनरी कार्यान्वीत राहणेसाठी मशिनरी दुरुस्ती व देखभाल कर्मचा-यांकडून वेळोवेळी सर्व्हीसींग कराव्या लागतात. त्यासाठी नेहमी लागणारे किरकोळ स्पेअरपार्ट वारंवार खरेदी करावे लागतात. बरेचसे स्पेअरपार्ट स्थानिक मार्केटमध्ये वेळेवर उपलब्ध नसतात. त्यामुळे दैनंदिन कामामध्ये अडचण निर्माण होते.आपले आवश्यकतेनूसार वेळोवेळी स्पेअरपार्ट उपलब्ध व्हावेत यासाठी सोबतचे यादीप्रमाणे स्पेअरपार्टची वार्षिक खरेदी करणे आवश्यक आहे. वार्षिक खरेदीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | स्पेअरपार्टचे नांव | साईज | कंपनी | मागणी संख्या | अंदाजे नग किमंत | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | zz बेअरींग | ६२०२ | SKF | १८ | १००.०० | १८००.०० |
| | | ६२०४ | -- | ७२ | १६०.०० | ११५२०.०० |
| | | ६२०५ | -- | २४ | १९०.०० | ४५६०.०० |
| | | ६२०६ | -- | ६ | २३०.०० | १३८०.०० |
| | | ६२०९ | -- | ६ | ३४०.०० | २०४०.०० |
| | | ६३०४ | -- | ६ | ३५०.०० | २१००.०० |
| | | URB RBR ६३१० | -- | २ | ८००.०० | १६००.०० |
| | | LS १० | -- | ४ | २५०.०० | १०००.०० |
| ०२ | रोलर बेअरींग | ३०२०७ | -- | ३ | ५५०.०० | १६५०.०० |
| | | ३०२१० | -- | ३ | ६५०.०० | १९५०.०० |
| | | ३०३१० | -- | ३ | ७००.०० | २१००.०० |
| ०३ | टेपर बेअरींग | ५२७७९ U | -- | २ | ३००.०० | ६००.०० |
| | | ५२७८० U | -- | २ | ३००.०० | ६००.०० |
| ०४ | पेडस्टल बेअरींग | P २०४ | -- | १० | २५०.०० | २५००.०० |
| | | P २०६ | -- | ४ | २६०.०० | १०४०.०० |
| | | P २०७ | -- | ६ | ३००.०० | १८००.०० |
| | | P २०८ | -- | ४ | ३२५.०० | १३००.०० |
| | | P २०९ | -- | १० | ३४०.०० | ३४००.०० |
| | | P ५०७ | -- | ४ | ३७०.०० | १४८०.०० |
| ०५ | प्रेस बेअरींग गिरणीसाठी | ६ No. | -- | २० | ६५.०० | १३००.०० |
| ०६ | रबर बुश (Neoprine) | OD =३० mm, ID= १३ mm Length= ४० mm दोन्ही बाजुने चापरींग १० mm | | १०० | ३५.०० | ३५००.०० |
| ०७ | गिअर ऑईल | ४० नं. | कॅस्ट्रोल | १० | १३०.०० | १३००.०० |
| | | ९० नं. | -- | १५ | १५०.०० | २२५०.०० |
| | | १४० नं. | -- | १५ | १६५.०० | २४७५.०० |
| ०८ | कॉम्प्रेसर ऑईल (हायड्रो) | ४६ नं. | -- | ५ | १८०.०० | ९००.०० |
| ०९ | बेअरींग ग्रिस | लिथिअम | -- | १० | १४०.०० | १४००.०० |
| | | हाय टेम्प्रेचर | -- | ३० | १५०.०० | ४५००.०० |
| १० | एम सील | ५० gm | | ९ | ३०.०० | २७०.०० |
| ११ | एरेल डाईट | २०० gm | | ३ | ५०.०० | १५०.०० |
| १२ | फेवीक्वीक | ५०० gm | | १ | १००.०० | १००.०० |
| | | | | | | **६२५६५.००** |
| १३ | सॅलॅक कंपाऊड | ४० mm | | १२ | ४०.०० | ४८०.०० |
| १४ | गेट व्हॉल्व (G. M.) | १५ mm | | ६ | २००.०० | १२००.०० |
| १५ | बॉल व्हॉल्व (SS) | १५ mm | | १८ | १४०.०० | २५२०.०० |
| १६ | टी (G.I.) | १५ mm | | १८ | ५०.०० | ९००.०० |
| १७ | एल्बो (G.I.) | १५ mm | | ६ | ४०.०० | २४०.०० |
| १८ | एसएस जाळी (आटा चाळणी) | Mesh Size= ९x९ per cm, width= ०.३० mm | | ३० sq. mtr. | ९०.०० | २७००.०० |
| १९ | एसएस जाळी (डिस्टोार) | Mesh Size= ५x५ per cm, width= ०.६० mm | | १५ sq. mtr. | १५०.०० | २२५०.०० |
| २० | ग्रिस पंप सर्व नेपल सह | | | १ | ८००.०० | ८००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | हॅकसॉ ब्लेड फ्रेम | HSS १/२"x१२" | Miranda | १ | १५०.०० | १५०.०० |
| २२ | हॅकसॉ ब्लेड | | Miranda | १२ | २५.०० | ३००.०० |
| २३ | असबेटॉस राउंड पॅकींग | ३ mm ₵ | champion | ५ mtr | ६२०.०० | ३१००.०० |
| २४ | चॉम्पिया गॅसकेट हायप्रेशर Thickness- ३mm | I.D. ₵ ५० mm | champion | १२ | ६०.०० | ७२०.०० |
| | | I.D. ₵ ४० mm | champion | १२ | ५०.०० | ६००.०० |
| | | I.D. ₵ २५ mm | champion | १२ | ४५.०० | ५४०.०० |
| २५ | एमरी क्लॉथ रफ | १२" x १२" | | ६ | १००.०० | ६००.०० |
| २६ | टुल बॉक्स (सर्व टुल्ससह सर्व रींग, पट्टी, बॉक्स स्पॅनरसह) | टपारीया | १ | ८०००.०० | ८०००.०० | |
| | | | | | **एकूण =** | **८७६६५.००** |

**ब) <u>एल.पी.गॅस स्पेअर पार्ट</u>**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य किचन बर्नर M ७८ | ₵ ११० mm | | १२ | १८००.०० | २१६००.०० |
| २ | मुख्य किचन बर्नर T ५० | ₵ ५० mm | | ६ | १४००.०० | ८४००.०० |
| ३ | निडल कट्रोल व्हॉल्व | ₵ ३/८ mm | | ३६ | २१०.०० | ७५६०.०० |
| ४ | मेन व्हॉल्व | ₵ ३/४' | | १२ | २७०.०० | ३२४०.०० |
| ५ | टॅपलॉन गॅसकेट PTFE | ₵ ५० mm | | ३६ | २५.०० | ९००.०० |
| | | ₵ ४० mm | | ३६ | २५.०० | ९००.०० |
| | | ₵ २५ mm | | ३६ | २०.०० | ७२०.०० |
| | | ₵ २० mm | | २४ | २०.०० | ४८०.०० |
| | | ₵ १५ mm | | २४ | २०.०० | ४८०.०० |
| ६ | सिंलेडर कॉपर पिगटेल | ₵ ३/८"x ५' | | १२ | ४५०.०० | ५४००.०० |
| ७ | बर्नर कॉपर पिगटेल | ₵ ३/८"x ५' | | ३६ | ५००.०० | १८०००.०० |
| ८ | सिलेंडर फेल्झीबल व्होज | ₵ ३/८"x ५' | | १२ | ३००.०० | ३६००.०० |
| ९ | बर्नर फेल्झीबल व्होज | ₵ ३/८"x ५' | | १२ | ३००.०० | ३६००.०० |
| १० | सिलेंडर टू बर्नर कॉपर पिगटेल | ₵ ३/८"x ५' | | १२ | ४००.०० | ४८००.०० |
| ११ | सिलेंडर टू बर्नर फेल्झीबल व्होज | ₵ ३/८"x ५' | | १२ | ३००.०० | ३६००.०० |
| १२ | बर्नर टु बर्नर वायरब्रांडेड पिगटेल | ₵ ३/८"x ५' | | ३६ | ३००.०० | १०८००.०० |
| १३ | बर्नर टु बर्नर कॉपर पिगटेल | ₵ ३/८"x ३' | | १२ | ४००.०० | ४८००.०० |
| १४ | बर्नर व्हेच्यूरी M७८ (Aluminium) | | | २४ | १००.०० | २४००.०० |
| १५ | बर्नर व्हेच्यूरी T ५० | | | १२ | ७५.०० | ९००.०० |
| १६ | बर्नर व्हेच्यूरी RV - ६-३ | | | २४ | ७५.०० | १८००.०० |
| १७ | कॉपर पिगटेल रबर O रिंग | | | २०० | ५.०० | १०००.०० |
| १८ | निडल कट्रोल व्हॉल्व रबर O रिंग | | | १०० | ५.०० | ५००.०० |
| १९ | सिंलेडर प्रेशर रेग्युलेटर विथ निडल कट्रोल व्हॉल्व | | ISI Mark | १२ | ३५०.०० | ४२००.०० |
| २० | सिलेडर प्रेशर रेग्युलेटर | | | १२ | ३५०.०० | ४२००.०० |
| २१ | टेपलॉन टेप PTFE | १/२" x ३ mtr | | ३६ | २५.०० | ९००.०० |
| | | | | | **एकूण =** | **११४७८०.००** |
| अ) | | | | | मशिनरी स्पेअरपार्ट एकुण किंमत = | ८७६६५.०० |
| ब) | | | | | गॅस स्पेअर पार्ट एकुण किंमत = | ११४७८०.०० |
| | | | | | **एकूण रक्कम =** | **२०२४४५.००** |
| | | | | | व्हॅट १२.५% = | २५३०५.६३ |
| | | | | | **एकूण रक्कम =** | **२,२७,७५१.००** |

वरील प्रमाणे स्पेअर पार्ट विहित पदधतीने कोटेशन मागावून खरेदी विभागामार्फत खरेदी करता येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे वार्षिक स्पेअरपार्ट खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २,२७,७५१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईप्रसादालयातील मेंटेनन्ससाठी आवश्यक असणारे वार्षिक स्पेअरपार्ट कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये २,२७,७५१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/ अधिक्षक- खरेदी विभाग)

---

**विषय नं.४६ बॉयलर चिमणी (३ नग) व जुना गॅस प्लॅन्ट ०२ नग व नवीन व जुन्या गॅस प्लॅन्टचे पाईपलाईनला पेंटींग करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील स्टीम बॉयलर चिमणी ०२ नग तसेच थर्मिक फ्ल्युड हिटर चिमणी ०१ नग सततच्या वापरामुळे व सध्या पावसाळा सुरु असलेने ओलेपणामुळे सदर तिनही चिमण्यांना गंज लागण्यास सुरुवात झालेली आहे. तसेच जुन्या व नव्या गॅस प्लॅन्टचे पाईपलाईनचा ऑईल पेंट निघाल्यामुळे पाईप लाईन गंज लागून खराब होत आहे. चिमणी व गॅस पाईप लाईनला कलर दिला नाही तर गंजण्याची क्रिया वाढत जाईल व बॉयलर चिमण्या खराब होतील त्यामुळे गॅस पाईप लाईनला गॅस लिकेजचा प्रकार होऊ शकेल.

बॉयलरच्या चिमण्यांचे आयुष्यमान वाढावे व गॅस पाईप लाईनला सुरक्षिततेच्या दृष्टीने रंगकाम करुन घेणे गरजेचे आहे. सदरील काम प्रसादालय विभागामार्फत विहीत पध्दतीने करता येईल.

उपरोक्तप्रमाणे बॉयलर चिमणी नग ३, जुन्या प्रसादालयाकडील एल.पी.गॅस स्टोअरेज टँक २ व जुन्या व नवीन प्रसादालयाकडील एल.पी. गॅस पाईप लाईनला पेन्टींगकामी स्थानिक इंडस्ट्रीयल पेटींग काम करणारे ठेकेदारांकडून कोटेशन मागवून पेटींगचे काम करुन घेता येईल.

तरी बॉयलर चिमणी ३, जुना गॅस प्लॅन्ट स्टोअरेज टँक २ व जुनी व नवीन एल.पी.गॅस पाईपलाईनला पेटींग करुन घेणेकामी व स्थानिक इंडस्ट्रीयल पेटींगचे काम करणा-या ठेकेदाराकडून कोटेशन मागविणे व त्याकामी अंदाजे रु.१,७५,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसादालयासाठी बॉयलर चिमणी ३, जुना गॅस प्लॅन्ट स्टोअरेज टँक २ व जुनी व नवीन एल.पी.गॅस पाईपलाईनला पेटींग करुन घेणेकामी स्थानिक इंडस्ट्रीयल पेटींगचे काम करणा-या ठेकेदारांकडून कोटेशन मागविण्यात यावेत याकामी येणारे अंदाजे रु.१,७५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४७ श्री साई प्रसादालयातील धान्य कडधान्य व किराणा माल घट तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयामध्ये दर्‌रोज ३०,००० ते ४५,००० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून दर्‌रोज सुमारे सरासरी ६००० अन्नपाकीटे व १,५०,००० मोतीचूर लाडूंची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल धान्य व कडधान्य, डाळी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येते. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो निवडला जातो. गहु व हरबराडाळ दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे,मातेरे निघते. वातावरणातील बदलामुळे ही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते.

पुर्वी वरील कारणास्तव येणारी घट-तुट थेट किराणा मालामध्ये खर्ची टाकण्याची पध्दत होती. परंतू सन २००५-२००६ या अर्थिक वर्षामध्ये स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक श्री लोंगाणी यांनी किराणा मालामध्ये येणारी घट-तुट नांवे टाकण्याबाबत मुद्दा उपस्थीत करुन घट-तुट नांवे टाकणेबाबत नियमावली तयार करावी असे सुचविले होते. त्यानूसार दिनांक १५/०८/२००६ पासून प्रसादभोजन, अन्नपाकीटे , व मोतीचूर लाडूकरीता प्रत्यक्ष खर्च होणारा किराणा माल खर्ची टाकण्यात आलेला होता. घट-तुट , कचरा, काडी, मातेरे कोंडा , वेस्टेज आटा वगैरे खर्ची टाकण्यात आला नव्हता. त्यानूसार दि.१५/०८/२००६ ते ३१/०३/२००७ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ चे सभेचे निर्णय क्र.४०५ मान्यतेने खर्ची टाकणेत आलेली आहे. मात्र त्यापुढील कालावधीतल घट-तुट खर्ची टाकणेसाठी नियमावली तयार करण्यात यावी असा निर्णय झालेला असल्यामुळे घट-तुट खर्ची टाकणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी सारखे मोठया प्रमाणात भोजन तयार करणा-या संस्थेकडील पध्दत व प्रमाण याबाबत माहीती मागविण्यात आलेली होती. त्यापैकी तिन संस्थेने त्यांचेकडील घट-तुट पध्दत कळविलेली होती. सन २००७ ते २००८ मध्ये प्रसादालय किराणा मालामध्ये आलेली घट-तुट व इतर संस्थेचे घट-तुट नांवे टाकण्याचे प्रमाण यांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता प्रसादालयामध्ये आलेली घट-तुट कमी दिसून आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० अन्वये सन २००७-२००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तुट खर्ची टाकणेत आलेली आहे. मात्र सदर घट-तुटीस मान्यता देतांना पुढील

कालावधीसाठी खालील प्रमाणे सुचना (नियमावली) मा.श्री अभय शास्त्री, मा.श्री ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे.

१) सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिण्यानंतर प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिस्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनूसार सन २००८-२००९ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील एकूण खर्च पडलेल्या किराणामालात प्रत्यक्ष आलेल्या घट-तुटीस मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ चे सभेतील निर्णय क्रं.७६५ ने मान्यता घेण्यात आलेली आहे

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती. तपासणीअंती प्रत्यक्ष आलेली किराणा मालातील घट-तुट ही सरासरी मान्य असलेल्या प्रमाणापेक्षा कमी आढळलेली आहे. त्याचा वस्तूनिष्ठ अहवाल खालीलप्रमाणे आहे.

**सन २००९-२०१० मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घटतुटीचा तपशिल-**

| अ. नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/०९ ते ३१/०३/१० अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल कि. ग्रॅ. | दि.०१/०४/०९ ते ३१/०३/१० अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट कि. ग्रॅ. | घट-तुटीचे प्रमाण कि. ग्रॅ. | मान्य झालेली घट-तुट प्रमाण कि. ग्रॅ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | गहु | १०८८३५३.००० | २८०००.००० | २.५७३ | ३.००० |
| २ | तांदुळ | ७६३९४४.००० | ४७३१.००० | ०.६१९ | १.००० |
| ३ | तुरडाळ | १३६५६८.७०० | १२३८.००० | ०.९०७ | १.००० |
| ४ | हरबराडाळ | ५३१९८५.००० | ८९१८.००० | १.६७६ | २.००० |
| ५ | मुगडाळ | १९५३८.३०० | १८८.००० | ०.९६२ | १.००० |
| ६ | गुळ | १८५३०.९८५ | १५५.००० | ०.८३६ | १.००० |
| ७ | रवा | २८८१०.००० | २८३.००० | ०.९८२ | १.००० |
| ८ | शेंगादाणे | २८८५३.८२० | २८४.००० | ०.९८४ | १.००० |
| ९ | मिरची | १३६४६.१०० | ५३७.००० | ३.९३५ | ४.००० |
| १० | हळद | ७५४०.५५० | २९८.००० | ३.९५२ | ४.००० |
| ११ | मोहरी | ३४४५.९०० | ६४.००० | १.८५७ | २.००० |
| १२ | जिरे | ३८४१.६५० | ७६.००० | १.९७८ | २.००० |
| १३ | मसाला | १५४९.९४० | ३३.२५० | २.१४५ | २.२५० |
| १४ | धनेपावडर | १२१४६.५०० | ३०१.५०० | २.४८२ | २.५०० |
| १५ | खोबरेवाटी | ७३५०.००० | ६१.४०० | ०.८३५ | १.००० |
| १६ | हिरवी विलायची | ३१९९.६०० | ३१.६०० | ०.९८८ | १.००० |
| १७ | हरबरा | ९१६०५.००० | ८१२.००० | ०.८८६ | १.००० |
| १८ | वाटाणा | ७२३५७.००० | ६७०.००० | ०.९२६ | १.००० |
| १९ | मुग | ३५६८३.३०० | ३४४.००० | ०.९६४ | १.००० |
| २० | मठ | ४६७७९.००० | ४५४.००० | ०.९७१ | १.००० |
| २१ | मेथी | १५३.६५० | ३.३५० | २.१८० | २.२५० |
| २२ | सुंठ | २७९.००० | १४.५०० | ५.१९७ | ५.२५० |
| २३ | मैदा | ६०६०९.००० | २४०.५०० | ०.३९७ | ०.५०० |
| २४ | भगर | ४१६.००० | ७.५०० | १.८०३ | २.००० |
| २५ | साबुदाणा | २१३६४.६०० | २३५.००० | १.१०० | १.२५० |
| २६ | कच्चे पोहे | ७२१.५०० | ७.१०० | ०.९८४ | १.००० |
| २७ | भाजके पोहे | २३१९.००० | ८८.००० | ३.७९५ | ४.००० |
| २८ | डाळया | ५०६.००० | ६.००० | १.१८६ | १.२५० |

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील खर्च पडलेल्या किराणा मालात वरीलप्रमाणे प्रत्यक्ष घट-तुट आलेली आहे. सदर घट-तुटीचे अवलोकन करता सदर प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे उपरोक्त घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्रं.३ नूसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र. ७२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील खर्च पडलेल्या किराणा मालात वरीलप्रमाणे प्रत्यक्ष आलेल्या घट-तुट नांवे टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४८ श्री साईसत्चरित्र तेलगू वाढीव पेजेसची रक्कम आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४.०७.२०१० चे सभेतील निर्णयानुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना उपरोक्त संदर्भिय क्र.२ अन्वये श्री साई सतचरित्र- तेलगू १,००,००० नग निम्नतम दर रु. ३३.७० प्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/८२७५/२०१० दि. १०.०७.२०१० ने छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

संस्थान प्रकाशित सर्व श्री साईबाबांचे जीवनावरील श्री साई सत् चरित्रांचा कव्हरचा दर्जा सुधारणे तसेच मजकूर मोठया अक्षरात साईभक्तांना उपलब्ध करुन देणे विषयी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देशानुसार काम चालू करण्यात आले आहे.

श्री साईसत्चरित्र- तेलगू चे मोठया अक्षरात सी.डी. तयार करुन देणेचे काम श्रीमती टी. शैलजा, हैद्राबाद यांचेवर दि. २५.०५.२०१० चे मंजूर प्रस्तावाने सोपविण्यात आले होते. काम देते वेळी सी.डी. केव्हा उपलब्ध होईल याची निश्चित नसल्याने पूर्वीप्रमाणे एकूण ३७६ पेजेस छपाई कामीचे दरपत्रकाची मागणी करणेत आली होती. श्रीमती टी.शैलजा, हैद्राबाद यांनी अतिशय मेहनत करुन श्री साईसत्चरित्र- तेलगू ची सी.डी. प्रकाशने विभागात दि. १२.०७.२०१० रोजी प्राप्त झाली आहे.

मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुबई यांना श्री साईसत्चरित्र- तेलगू मोठया अक्षरात ४०४ पेजेसची डी.टी.पी. देण्यात आली होती. डी.टी.पी. तील वाढीव २८ पेजेसची रक्कम त्यांनी दि. २९.०७.२०१० चे पत्राने कळविली आहे.

श्री साईसत्चरित्र- तेलगू मोठया अक्षरात ४०४ पेजेसमध्ये २८ पेजेस प्रती पेज दर रु. ०.०८ पैसे प्रमाणे प्रती नग रु. २.२४ पैसे ने श्री साईसत्चरित्र- तेलगू १,००,००० प्रतीसाठी येणाऱ्या जादा रक्कम रु. २,२४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसत्चरित्र- तेलगू मोठया अक्षरात ४०४ पेजेसमध्ये २८ पेजेस प्रती पेज दर रु.०.०८ पैसे प्रमाणे प्रती नग रु.२.२४ पैसे प्रमाणे श्री साईसत्चरित्र- तेलगू १,००,००० प्रतीसाठी येणाऱ्या जादा रक्कम रु.२,२४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४९ शिर्डी श्री साईबाबाकी, श्री साई मंदिरातील आरत्या मंत्रोच्चार व्हीसीडी व श्री साईबाबा आरती (ग्लीम्पसेस ऑफ साईबाबा) डीव्हीडी सुधारित आवृत्ती निर्मितीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे २१-२२.०२.२००४ चे सभेतील विषय नं.३४ निर्णय क्र.७५नुसार सन.२००४ मध्ये "शिरडी श्री साईबाबा की " व्हीसीडी व "श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार "व्हीसीडी व श्री साईबाबा आरती (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) डी.व्हीडी. निर्मितीचे वेळी श्री साईबाबांचे सिंहासन हे चांदीचे होते. त्यावर सदर सी.डी.ची निर्मिती करण्यात आलेल्या आहेत.

सध्या या ऑडीओ व व्हीडीओ सीडीचा स्टॉक खालील प्रमाणे..

| अ.नं. | तपशिल | प्रकार | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दर महा सरासरी विक्री |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी श्री साईबाबा की | व्हीसीडी | १००८८ | १०२०० | ८४१ |
| ०२ | श्री साईबाबा आरती | व्हीसीडी | १८०५७ | १३५९ | १५०५ |
| ०३ | श्री साईबाबा आरती (गिलीप्स ऑफ श्री साईबाबा) | डीव्हीडी | ८४८४ | ८७३२ | ७०७ |

आता "शिरडी श्री साईबाबा की " व "श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार " तसेच "श्री साईबाबा आरती " (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) डीव्हीडी या तीन सीडी सोन्याच्या सिंहासनाप्रमाणे आता नव्याने समाधी मंदिराचे आतिल भागास सोन्याचा मुलामा दिल्याने त्यांचे नव्याने चित्रिकरण करुन निर्मिती करणे आहे.

आता नव्याने चित्रिकरण करणे तसेच श्री साईबाबाचे मंदिर, शिरडीतील संस्थानशी निगडीत असलेली मंदिरे, बाबांचे चरीत्र, तसेच संस्थानकडून भक्तांना पुरविण्यात येणा-या सुविधा, समाधी मंदिरातील नित्याचे कार्यक्रम, उत्सव इत्यादी समाविष्ठ केलेले आहेत.त्यांचे ध्वनीमिक्सींग करणे आहे.

समाधी मंदिराचा कळस, सिंहासन समाधी चौधरा पादुका भिंतीचा काही भाग यावर सुवर्ण काम केले आहे. त्यामुळे या भागाचे पुनश्च चित्रीकरण करावे लागेल, यासाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | कॅमेरा भाडे ३ डीजीबीटा कॅमेरा -३ दिवस | ५४,०००.०० |
| ०२ | लाईट सामान ट्रॉली क्रेन - ३ दिवस | १८,०००.०० |
| ०३ | कॅमेरा सहायक - ३ दिवस | १५,०००.०० |
| ०४ | लाईटमन इलेक्ट्रीशियन, क्रेन ऑपरेटर -३ दिवस | १५,०००.०० |
| ०५ | डी ५ कॅमेरा | १५,०००.०० |
| ०६ | ३ कॅमेरामन - ३ दिवस | २७,०००.०० |
| ०७ | सहायक ३ कॅमेरामन - ३ दिवस | ९,०००.०० |
| ०८ | सहायक दिग्दर्शक | १०,०००.०० |
| ०९ | साहित्य भाडे | ५०,०००.०० |
| १० | चहा, जेवण व इतर खर्च | ३०,०००.०० |
| ११ | गाडी भाडे | ४०,०००.०० |
| १२ | एडीटींग स्टुडीओ रु.४०० x ३०० तास | १,२०,०००.०० |
| १३ | व्हीसीडी डीव्हीडी मास्टरींग | ५०,०००.०० |
| | एकूण अपेक्षित खर्च | ४,५३०००.०० |

संस्थान निर्मित "शिरडी श्री साईबाबा की " व "श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार " श्री साईबाबा आरती (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) या तीन सी.डी.करीता पुनश्च चित्रिकरण करणेस, ध्वनीमिक्सींग करणेस याकामी मुंबई येथील नामांकित स्टुडिओ धारकांकडून दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ४,५३,०००/-चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निर्मित "शिरडी श्री साईबाबा की " व "श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार " श्री साईबाबा आरती (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) या तीन सी.डी.करीता पुनश्च चित्रिकरण व ध्वनीमिक्सींग करणेकामी मुंबई येथील नामांकित स्टुडिओ धारकांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रु. ४,५३,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५० भक्तमंडळ सभासदांना पाठविण्यात येणाऱ्या निमंत्रण पत्रिका बुक पोस्ट ऐवजी इनलँड लेटर पध्दतीने पाठविणे व त्यासाठी पेपर फोल्डींग मशिन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा याप्रमाणे तीन उत्सव साजरे केले जातात. सदर उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका भक्तमंडळाच्या सभासदांना बुक-पोस्ट पध्दतीने पाठविण्यात येतात.

**निमंत्रण पत्रिका पाठविण्याची सध्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.**

१) साधारणतः दीड लाख पत्रिका सोबतच्या नमुन्याप्रमाणे छपाई केल्या जातात.

२) प्रत्येक निमंत्रण पत्रिकेच्या तीन घडया केल्या जातात. निमंत्रण पत्रिकांची संख्या मोठयाप्रमाणावर असते. सदर कामास वेळेचे बंधन (टाईम लिमिट) असल्याने संस्थानच्या शैक्षणिक संस्थेकडील विद्यार्थ्यांची घडया करणेकामी मदत घेतली जाते. त्याकामी अंदाजे १० दिवसांचा कालावधी लागतो. परिक्षेचा काळ असल्यास अडचणीचे होते.

३) सदर स्टिकरवर पत्त्याचे प्रिंटींग करावे लागते.

४) पत्त्याचे स्टिकर खरेदी करावे लागतात. त्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च ९०,००,०००/- इतका येतो. निमंत्रण पत्रिकेवर स्टिकर हाताने चिटकविणेसाठी १० दिवस लागतात. त्यासाठी खालील प्रमाणे मजूरीचा खर्च येतो.

| कर्मचारी संख्या | रोजंदारी दर | दिवस | एका उत्सवाचा खर्च | तीन उत्सवाचा खर्च |
|---|---|---|---|---|
| १६ | १३४ | १० | २१,४४०/- | ६४,३२०/- |

५) निमंत्रण पत्रिका पोस्टाने पाठविल्या जात असल्याने भारतातील सभासदांसाठी प्रति निमंत्रण पत्रिकेवर रु.४/- व परदेशातील सभासदांसाठी प्रति निमंत्रण पत्रिकेवर रु.२५/- किंमतीचे पोस्टेजचे फ्रँकिंग करावे लागते.

६) फ्रँकिंग केलेल्या निमंत्रण पत्रिका पोस्टात पाठविण्यात येतात.

७) बुक-पोस्ट पध्दतीने निमंत्रण पाठविण्यासाठी सध्या खालीलप्रमाणे पोस्टेज खर्च येतो.

| अ.नं. | भक्तमंडळ सभासद | संख्या | बुक-पोस्टचा दर | प्रति उत्सवाचा पोस्टेजचा खर्च | तीन उत्सवासाठी वार्षिक पोस्टेज खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | भारतातील सभासद | १,४७,५०६ | रु.४/- | रु.५,९०,०२४/- | रु.१७,७०,०७२/- |
| ०२ | परदेशातील सभासद | २,८६७ | रु.२५/- | रु.७१६७५/- | रु.२,१५,०२५/- |
| | | | | **एकूण -** | **१९,८५,०९७/-** |

उपरोक्त परिस्थिती व अडचणी विचारात घेता मानवी श्रम, वेळ व आर्थिक खर्च यात बचत करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती अवलंबता येईल.

१) निमंत्रण पत्रिका साध्या पध्दतीने छपाई करण्याऐवजी सोबतच्या नमुन्यानुसार सेल्फ अधेशीव (Self Adhecive) कन्टीन्युअस स्टेशनरीवर छपाई करणे.

२) निमंत्रण पत्रिका घडया करणेकामी पेपर फोल्डींग मशिनचा वापर करणे.

३) निमंत्रण पत्रिकेवर पत्त्याचे स्टिकरचा वापर करण्याऐवजी निमंत्रण पत्रिकेवर प्रिंटरच्या सहाय्याने पत्ते प्रिंट करणे.

४) बुक-पोस्ट पध्दतीऐवजी इनलँड पध्दतीने निमंत्रण पत्रिका पाठविल्यास खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | भक्तमंडळ सभासद | संख्या | बुक-पोस्टचा दर | प्रति उत्सवाचा पोस्टेजचा खर्च | तीन उत्सवासाठी वार्षिक पोस्टेज खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | भारतातील सभासद | १,४७,५०६ | रु.२.५०/- | रु.३,६८,७६५/- | रु.११,०६,२९५/- |
| ०२ | परदेशातील सभासद | २,८६७ | रु.१०/- | रु.२८६७०/- | रु.८६,०१०/- |
| | | | | **एकूण -** | **रु.११,९२,३०५/-** |

वरिलप्रमाणे सुधारीत पध्दतीचा अवलंब केल्यास दरवर्षी खालीलप्रमाणे खर्चात बचत होईल.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | स्टीकर खर्च | ९०,०००/- |
| २. | कंत्राटी कामगार मजूरी | ६४,३२०/- |
| ३. | पोस्टेज खर्च | ७,९२,७९२/- |
| | **एकूण** | ९,४७,११२/- |

इनलँड पध्दतीने निमंत्रण पत्रिका पाठविणेसाठी सेल्फ अधेशीव (Self Adhecive) कन्टीन्युअस स्टेशनरीवर छपाई करुन पेपर फोल्डींग मशिनच्या वापराद्वारे घडया करता येतील. सध्या बाजारपेठेमध्ये दोन प्रकारचे पेपर फोल्डींग मशिन उपलब्ध आहेत. सदरचे मशिनचे दादाजी धाकजी इन्फोटेक प्रा.लि.मुंबई यांनी दरपत्रक दिलेले असून त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Model | Speed per Hour | Cost | Vat.5% | Total cost |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Postmate III | 4800 to 5500 | 4,75,000/- | 23750/- | 498750 |
| 2. | Postmate VI | 9000 | 7,50,000/- | 37500/- | 787500 |

मे. दादाजी धाकजी इन्फोटेक प्रा.लि. मुंबई यांनी Postmate VI या मशिनव्दारे निमंत्रण पत्रिकांना घडया घालणेचे कामाचे प्रात्याक्षिक दिनांक १२/०६/२०१० रोजी मा.अध्यक्ष सो. यांना मा.कार्यकारी अधिकारी , मा उप कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी यांचे उपस्थितीत दाखविले आहे. यावेळी त्यांनी कन्टयुनियस कॅाम्प्युटर स्टेशनरी स्वरुपातील निमंत्रण पत्रिकेचे नमुने सादर केले होते. ते पुर्वीच्या नेहमिच्या निमंत्रण पत्रिकेपेक्षा चांगल्या स्वरुपाचे आहेत.

प्रात्याक्षिक पाहणीनंतर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संबधितांना सदर मशिनचे दर किती कमी करता येतील ते कळविणेस सांगीतले होते. यावर त्यांनी सुधारीत दर फॅक्स व्दारे दिलेले आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Model | Speed per Hour | Revise Cost | Vat.5% | Total cost |
|---|---|---|---|---|---|
| 2. | Postmate VI | 9000 | 7,40,000/- | 37000/- | 7,70,000/- |

सदर सुधारीत पध्दतीचा अवलंब करणेसाठी संस्थानला एका पेपर फोल्डींग मशिनची आवश्यकता आहे. वरील पैकी Postmate VI फोल्डींग मशिनव्दारे ताशी ९००० निमंत्रण पत्रिकाचे फोल्डींग करता येईल. पर्यायाने कामाचे १० दिवस वाचतील तसेच विद्यार्थ्यांची मदत घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

तरी उपरोक्त प्रमाणे सध्याच्या पध्दतीऐवजी यापुढील उत्सवात इनलॅण्ड लेटर (अंर्तदेशीय पत्र) पध्दतीच्या निमंत्रण पत्रिका पाठविणे बाबत तसेच उपरोक्त पैकी (Postmate VI) मशिन खरेदी करणेस अगर देणगीदार मिळाल्यास देणगी घेणे बाबत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सध्याच्या पध्दतीऐवजी यापुढील उत्सवात इनलॅण्ड लेटर (अंर्तदेशीय पत्र) पध्दतीच्या निमंत्रण पत्रिका पाठविणे बाबत तसेच उपरोक्त पैकी (Postmate VI) मशिन खरेदी करण्यात यावी अगर देणगीदार मिळाल्यास देणगी घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०८)

---

**विषय नं.५१ मल्याळम भाषेतील श्री साईचरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती मिनालोचनी, बंगलोर यांनी दि.१९.०२.१० चे पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

१) त्यांचेवडील श्री. पी.ए.नारायणस्वामी यांनी संस्थान प्रकाशित इंग्रजी साईचरित्राचे मल्याळम भाषेत भाषांतर केले आहे.

२) सदर मल्याळम भाषेतील साईचरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करण्यात यावे.

३) सदर पत्रासोबत त्यांनी डिटीपी व सी.डी. पाठविली आहे.

४) सदर मल्याळम भाषेतील साईचरित्राचे सर्व हक्क ते संस्थानला देणेस तयार आहेत.

५) इंग्रजी भाषेतील साईचरित्राचे मल्याळम भाषेतील केलेले भाषांतर डॉ.एन.गोपालकृष्णन, माजी डेप्युटी डायरेक्टर एज्युकेशन कॉलेज तिरुअनंतरपुरम यांचेकडून तपासून घेतलेचा त्यांचा दाखला सोबत सादर केला आहे.

संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

सध्या १२ भाषेत संस्थान प्रकाशित साईचरित्रे उपलब्ध आहेत. मल्याळम भाषेतील साईचरित्र संस्थानकडे उपलब्ध नाही. श्री साईबाबांचे भक्त भारतात तसेच परदेशातही आहेत. जास्तीत जास्त भाषेत साईचरित्र उपलब्ध असणे हे संस्थानला भुषणावह आहे. मल्याळम भाषेतील साईचरित्र संस्थानने प्रकाशित केल्यास ओरिया भाषिक साई भक्तात साईबाबांचा प्रचार-प्रसार होईल.

तूर्तास मल्याळम भाषेतील २००० साईचरित्रे छपाई करणेबाबत विचार होणेस विनंती.

मल्याळम भाषेत भाषांतर केलेले साईचरित्र हे संस्थान प्रकाशित इंग्रजी भाषेतील साईचरित्रानुसार बरोबर आहे. त्यात काहीही फेरबदल नाही. अशा आशयाचे अधिकृत विद्यापीठाकडील दाखला सादर करणेबाबत त्यांना कळविता येईल.

तरी मल्याळम भाषेत भाषांतर केलेले साईचरित्र २,००० प्रती छपाई करणेस, व प्रती दर रु.४०/- प्रमाणे अंदाजे एकूण रुपये ८०,०००/- मात्र चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मल्याळम भाषेत भाषांतर केलेले साईचरित्र २,००० प्रती छपाई करणेस व याकामी येणारे अंदाजे एकूण रुपये ८०,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५२ श्री साईसत्चरित्र तामिळ वाढीव पेजेसची रक्कम आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१० चे सभेतील निर्णयानुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना उपरोक्त संदर्भिय क्र. २ अन्वये श्री साई सतचरित्र - तामिळ ४०,००० नग निम्नतम दर रु.४०.७६ पैसे प्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७५/२०१० दि.१०.०७.२०१० ने छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

संस्थान प्रकाशित सर्व श्री साईबाबांचे जीवनावरील श्री साई सत् चरित्रे मजकूर मोठ्या अक्षरात साईभक्तांना उपलब्ध करुन देणे विषयी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी त्यांचे कक्षेत मौखिक निर्देश दिले आहेत.तसेच बहुतेक साईभक्तांनी तोंडी मागणी आहे. मध्यंतरी मिटींगमध्ये संस्थान प्रकाशित सर्व साईचरित्रे अक्षर मोठे करणेस चर्चा झालेली आहे. जेणेकरुन वयोवृध्द व्यक्तींना त्याचे वाचन करणेस सुलभ व सोईस्कर होईल. तसेच चरित्रांचा दर्जा सुधारण्यात यावा. त्यानुसार यापूर्वी हिन्दी चरित्राचा फॉन्ट वाढविण्यात येऊन, त्यानुसार चरित्र साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदरचे चरित्र मोठ्या अक्षरात केल्याने साईभक्तांना वाचण्यास सोईस्कर झाले आहे. तसेच सध्या काऊंटरवर श्री साईचरित्र गुजराथी कव्हरचा दर्जा सुधारण्यात येऊन छपाई करुन दिल्याने चरित्रांविषयी काऊंटरवर साईभक्तांनी संस्थानविषयी चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

श्री साईसत्चरित्र - तामिळ चे मोठया अक्षरात सी.डी. तयार करुन देणेचे काम श्री चोकलिंगम सुब्रमन्यम,कुंभकोनम,तामिळनाडू यांचेवर सोपविण्यात आले होते. काम देते वेळी सी.डी.केव्हा उपलब्ध होईल याची निश्चित नसल्याने पूर्वीप्रमाणे एकूण ४३२ पेजेस छपाई कामीचे दरपत्रकाची मागणी करणेत आली होती. श्री चोकलिंगम सुब्रमन्यम,कुंभकोनम,तामिळनाडू यांचेकडून श्री साईसत्चरित्र - तामिळ ची सी.डी. प्रकाशने विभागात दि. १५.०७.२०१० रोजी प्राप्त झाली आहे. या अगोदर वरील संदर्भीय क्र. २ नुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना श्री साईसत्चरित्र - तामिळ ४३२ पेजेस चे ४०,००० प्रती निम्नतम मंजूर दर रु. ४०.७६ पैसे प्रमाणे छपाई कामीचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

श्री साईसत्चरित्र - तामिळ मोठया अक्षरातील ५७५ पेजसचे सी.डी.वरुन छपाईचे आदेशीत श्री साईसतचरित्र तामिळ ४०,००० प्रतींचे काम करुन घेणे असल्याने श्री साई सत् चरित्र तेलगू वाढीव पेज छपाईसाठी प्राप्त मंजूर दर प्रती पेज ०.०८ पैसे या दराने जादाचे वाढीव १४३ पेजेस छपाईकामी प्रती प्रत नग रु.११.४४ पैसे प्रमाणे वाढीव रक्कम रु.४,५७,६००/- मात्र आदा करावी लागणार आहे.

उपरोक्त प्रमाणे श्री साईसतचरित्र तामिळ ४०,००० प्रतींचे छपाईकामी प्रत प्रती नग रु.११.४४ पैसे प्रमाणे वाढीव रक्कम रु.४,५७,६००/- मात्र खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईसतचरित्र तामिळ ४०,००० प्रतींचे छपाईकामी प्रती नग रु.११.४४ पैसे प्रमाणे वाढीव रक्कम रु.४,५७,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५३** **लेखापाल पदाची पूर्वलक्षी प्रभावाने वेतन देऊन कनिष्ठ लेखा व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेबाबत श्री.सुरेंद्रकुमार पाण्डेय यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री सुरेंद्रकुमार दिनानाथ पांडे, लेखापाल श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी त्यांचे **दि.०८/०७/२०१०** रोजीचे अर्जाने ' लेखापाल ' पदाची वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने मिळणेबाबत तसेच ' कनिष्ठ लेखा व्यवस्थापक ' या पदावर पदोन्नती मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

श्री सुरेंद्रकुमार पांडे यांचे बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल विविध पदांचा कायम कर्मचारी संख्या ६६९ + कंत्राटी ७६ असा एकूण ७४५ कर्मचारी संख्येचा आकृतीबंध दि.१२/०४/२००५ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. सदरचे आकृतीबंधात हॉस्पिटलचे लेखा / अर्थ विषयक कामासाठी खालीलप्रमाणे पदनिहाय कर्मचारी संख्या प्रस्तावीत केलेली आहे.

| पदनाम. | शैक्षणिक पात्रता. | वेतनश्रेणी रुपये. | पदसंख्या. |
|---|---|---|---|
| वरिष्ठ व्यवस्थापक (अर्थ) | बी.कॉम./एम.कॉम./सी.ए-/ आय.सी.डब्ल्यु.ए.व एम.बी. ए., एफ.आय.एन.ए. | ६५००-१०५०० | ०१. |
| कनिष्ठ व्यवस्थापक (लेखा) | बी.कॉम./एम.कॉम | ५०००-८००० | ०३. |
| लिपीकवर्गीय वित्त (फायनान्स) लेखा (अकौटंटस) | पदवीधर (बी.कॉम.) | ३०५०-४५९०. | १०. |

दरम्यानचे कालावधीत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सो.यांचे तोंडी आदेशानुसार श्री सुरेंद्रकुमार पांडे यांना रु ५०००/- मासिक मानधनावर दि.४/११/०५ पासुन लेखापाल या पदावर नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यापुढे दि.१२/०१/०६ रोजी मुंबई येथे घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये ' लेखापाल ' या पदासाठी श्री पांडे यांची निवड करण्यात आलेली आहे व त्यानुसार त्यांना दि. १७/०२/०६ रोजीचे नेमणुक पत्राने मासिक रु.५०००/- एकत्रित मानधनावर दि. ४/११/०५ ते दि ३/५/०६ या सहा महिन्याचे कालावधीसाठी नेमणुक करण्यात आली आहे त्यापुढे त्यांना दि.०३/०६/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि. ०४/०५/२००६ ते ३/११/०६ पर्यत सहा महिन्यांसाठी आहे त्याच अटी शर्तीवर रू ५०००/- एकत्रित मासिक मानधनावर मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

त्यापुढे दि १९/०८/०६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६३२ नुसार श्री पांडे यांना रु ३०५०-४५९० या वेतनश्रेणीमध्ये त्यांचे मुळ नेमणुक पत्रातील अटी शर्तीस अधिन राहुन एकत्रित मासिक रु. ५०००/- मानधनावर सेवेत कायम करण्यात आलेले आहे.

त्यापुढे शासनाकडे पाठविणेत आलेला श्री साईबाबा सुपर स्पेशालिस्टी हॉस्पिटलचे विविध पदांचा आकृतीबंध शासन निर्णय क्र.सासंवि २००५/३१७/ (१०३)-का.सोळा,मंत्रालय, मुंबई-३२ दि.१३/०६/२००७ नुसार मंजूर होवून आलेला आहे. त्यामध्ये हॉस्पिटलचे लेखाविषयक कामासाठी वर नमूद केल्याप्रमाणे पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

उपरोक्तप्रमाणे हॉस्पिटलचा कर्मचारी आकृतीबंध शासनाकडून मंजूर होऊन आल्यानंतर दि. ११/८/०७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६८० नुसार श्री सुरेद्रकुमार पांडे यांची दि.०१/०८/२००७ पासून ' लेखापाल ' या पदावर रू ३०५०-७५-३९५०-८०-४५९० या कनिष्ठ लिपीकाचे मंजूर वेतनश्रेणीमध्ये मुळ वेतन रू ३०५०- अधिक त्यावर अनुज्ञेय होणारे भत्ते देऊन सेवा पुढे चालु ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार आजपर्यंत त्यांची सेवा चालू आहे व त्याप्रमाणे श्री.पांडे यांना रू ३०५०-७५-३९५०-८०-४५९० वेतनश्रेणीत वेळोवेळी वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

त्यापुढे शासन निर्णय क्र.सासंवि २००९/४३३/(३७/०९) का-सोळा, मंत्रालय, मुंबई -३२ दि.०७ ऑगस्ट २००९ नुसार आकृतीबंध मंजुर झालेला आहे. या मंजुर आकृतीबंधामध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलचे वित्त / लेखा विभागासाठी खालीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

| पदनाम. | वेतनश्रेणी रुपये. | पदसंख्या. |
|---|---|---|
| अर्थ व्यवस्थापक. | ६५००-१०५००. | ०१. |
| कनिष्ठ लेखा व्यवस्थापक. | ५०००-८०००. | ०३. |
| लिपीक - लेखा. | ३०५०-४५९०. | १०. |

उपरोक्तप्रमाणे शासनाकडून नव्याने मंजूर होऊन आलेल्या हॉस्पिटलच्या कर्मचारी आकृतीबंधामध्ये मुळ आकृतीबंधात मंजूर असलेली लिपीक वर्गीय रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीतील ' वित्त / लेखा (अकौंटंट) ' हया हुद्दयाची १० पदे लिपीक लेखा पदनामाने मंजूर झालेली आहेत. हॉस्पिटलचे विद्यमान मंजूर आकृतीबंधामध्ये संस्थानचे दोनही हॉस्पिटलसाठी अथवा इतर विभागांसाठी ' लेखापाल ' हे पद मंजूर नाही.

श्री.सुरेंद्रकुमार पांडे यांची नेमणूक ही श्री साईबाबा हॉस्पिटलकडील मुळ आकृतीबंधानुसार लेखपाल या पदावर करण्यात आलेली असली तरी हे पद मंजूर आकृतीबंधानुसार कनिष्ठ लिपीक वर्गीय

असून या पदाची वेतनश्रेणीत रु.३०५०-४५९० ही आहे. व या मंजूर वेतनश्रेणीतच श्री.पांडे यांना दि.०१/०८/२००७ पासून वेतन देण्यात येत आहे. ' लेखापाल ' या पदाची वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने मिळावी ही त्यांची मागणीच चुकीची आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलकडे रु.५०००-८००० या असुधारीत वेतनश्रेणीमध्ये ' कनिष्ठ लेखा व्यवस्थापक ' या हुद्दयाची ३ पदे मंजूर आहेत. या पदावर पदोन्नती मिळणेबाबत श्री.सुरेंद्रकुमार पांडे यांची मागणी आहे. तथापि श्री.पांडे यांचेप्रमाणेच संस्थान सेवेतील वरिष्ठ लिपीक पदावर सुमारे २० ते २५ वर्षापासून सेवेत असलेल्या बी.कॉम्. शैक्षणिक पात्रताधारक कर्मचाऱ्यांनीही या पदावर पदोन्नती मिळण्याची मागणी असून तसा विनंती अर्ज त्यांनीही सादर केलेला आहे. त्यामुळे संस्थान सेवेतील वरिष्ठ लिपीक पदांवरील बी कॉम्/ एम.कॉम् पात्रताधारक सेवाजेष्ठ कर्मचा-यांना विचारात न घेता श्री पांडे यांना कनिष्ठ लेखा व्यवस्थापक या पदावर थेट पदोन्नती देणे योग्य होईल असे वाटत नाही.

**निर्णय क्र. ७२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, बी.कॉम/एम.कॉम पात्रताधारक कर्मचारी अनेक वर्षापासून संस्थान सेवेत आहेत. ' कनिष्ठ लेखा व्यवस्थापक ' या पदावर पदोन्नती देतांना या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करावा लागणार असल्याने सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५४ सिंकदराबाद येथील संस्थानचे माहिती सुविधा केंद्रासाठी श्री.चंद्रकांत सुराणा यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आंध्रप्रदेशातील भक्तांच्या सोयी सुविधेसाठी एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांनी संस्थानला नाममात्र भाडे पट्ट्याने दिलेल्या माहिती सुविधा केंद्राचे दि.३०/०८/२०१० रोजी मा.मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश तसेच संस्थानचे विश्वस्त यांचे उपस्थितीत उद्‌घाटनाचा कार्यक्रम संपन्न झालेला आहे.

वरील कार्यक्रमासाठी मा.मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश यांना निमंत्रण देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे खालील सदस्य व संस्थान अधिकारी यांनी दि.१६ ऑगष्ट २०१० ते १७ ऑगष्ट २०१० रोजी सिकंदराबाद येथे समक्ष भेट दिलेली आहे.

१) मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
२) मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
३) मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
४) मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर
५) श्री.आर.बी.आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग

सदर भेटीचे वेळी सिकंदराबाद येथील माहिती सुविधा केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी स्थानिक व्यक्तीची नेमणूक करणेबाबत चर्चा करणेत आली. त्यानुसार खालील दोन स्थानिक उमेदवारांची मुलाखत दि.१७ ऑगष्ट २०१० रोजी सिकंदराबाद येथील माहिती सुविधा केंद्राच्या कार्यालयात घेणेत आली.

०१) श्री.विनोद एन. वर्मा, मालेगांव (वाशिम) यांचे शिक्षण १० वी पास असून त्यांना टंकलेखन, संगणक याविषयी काहीच ज्ञान नाही. तसेच त्यांची पगाराची अपेक्षा रुपये १०,०००/- पति महिना अशी आहे.

०२) श्री.चंद्रकांत माणिकचंद सुराणा, बोलारम, सिकंदराबाद यांची शैक्षणिक पात्रता बी.कॉम., डिप्लोमा इन टॅक्सेसन असून ते गेल्या १० वर्षापासून खाजगी लेखापरीक्षकाच्या संस्थेमध्ये काम करीत आहेत. त्यांना संगणकाचे ज्ञान असून इंग्रजी, हिंदी, मराठी भाषा येते. तसेच तेलगू भाषेत ते बोलू शकतात तथापि लिहू अथवा वाचू शकत नाहीत. सध्या त्यांना खाजगी संस्थेमध्ये रुपये ६,५००/- मात्र प्रति महिना वेतन मिळत आहे. ते वेतन अथवा संस्थान निश्चित करीत त्या वेतनात ते काम करणेस इच्छुक आहेत.

व्यवस्थापन समिती सदस्य श्री.वाबळे साहेब व श्री.खांबेकर साहेब यांना श्री.सुराणा यांचे व्यक्तिमत्व डावेपणाचे जाणवले. तथापि डॉ.गोंदकर साहेब यांनी श्री.सुराणा यांना खाजगी संस्थेमध्ये कामाचा अनुभव असल्याने दैनंदिन हिशोब ठेवणे, रजिष्टर लिहिणे, पुस्तक विक्री करणे, भक्तांना माहिती देणे आदि सर्वसाधारण कामे करु शकतात त्यामुळे त्यांची नेमणूक करण्यात यावी, असा तोंडी अभिप्राय दिला आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (तामिळनाडू) येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी श्री.त्यागराजन शिवराम सरमा यांची कार्यालयिन सहाय्यक (Office Assitant) या पदावर मासिक रु.५०००/- या एकत्रित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता संस्थानचे सिकंदराबाद येथील माहिती सुविधा केंद्रासाठी श्री.चंद्रकांत माणिकचंद सुराणा यांची कार्यालयिन सहाय्यक (Office Assitant) म्हणून श्री.त्यागराजन यांचे प्रमाणेच मासिक वेतन रु.५०००/- देऊन एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देणेबाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ७२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सिकंदराबाद येथील माहिती सुविधा केंद्रासाठी श्री.चंद्रकांत माणिकचंद सुराणा यांची कार्यालयिन सहाय्यक (Office Asstt.) म्हणून एकत्रीत मासिक रु.५०००/- मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/अधिक्षक,प्रकाशने विभाग )

---

**विषय नं.५५ श्री एस.त्यागराजन, ऑफीस इनचार्ज, माहिती केंद्र चेन्नई यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री एस.त्यागराजन, ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांनी दि.०२/०८/२०१० रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५७७ नुसार श्री एस.त्यागराजन यांची "ऑफिस इनचार्ज" म्हणून जा.नं.एसएसएस वशी ०१/९८२६/२००९ दि.०५/०८/२००९ अन्वये शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई (तामिळनाडू) येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी प्रतिमहा रु.५०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दि. ०५/०८/२००९ रोजी कामावर हजर झाले आहेत.

श्री एस.त्यागराजन यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०४/०८/२०१० अखेर संपूष्ठात आला असून त्यांनी दि.०२/०८/२०१० रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी "मुदतवाढ देणेस हरकत" नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री एस.त्यागराजन यांच्या अर्जातील विनंती व अधीक्षक प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता श्री एस.त्यागराजन यांना दि.०५/०८/२०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ७३० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.त्यागराजन यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर दि.०५/०८/२०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५६ श्री साईबाबा /श्री साईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी/आरएमओ या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०७/२०१० रोजी सभेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यकत वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक व इतर पॅरामेडीकल पदाच्या वॉक इन इंटरव्ह्युव घेण्यात आलेल्या आहे. सदर इंटरव्ह्वुच्या वेळी खालील अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून अ.नं. १ ते २ चे उमेदवारांकडुन शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांच्या पूर्तता करुन त्यांना कनिष्ठ भुलतज्ञ या पदावर नेमणुक आदेश देणेस तसेच अ नं ३ यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे आरएमओ या पदावर नेमणुक आदेश देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. ०३ चे मंजूर टिपणीअन्वये खालील उमेदवारांना नेमणूक आदेश देणेत आलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणुक आदेश क्र. | दिलेले पदनाम व एकत्रित मानधन/ वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. वैभव दिलीप कांबळे मु पो कोपरगाव जि अहमदनगर | एमबीबीएस-०४ डीए-२०१० | जा.नं.एसएसएस/वशी-एसएसबीएच/२५२१ दि. १७/०८/२०१० | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक रु. २७,०००/-फिक्सपेवर कनिष्ठ भूलतज्ञ पदावर नेमणूक |
| ०२ | डॉ. विलास उत्तमराव कुसारे मु पो भाऊसाहेब नगर, ता निफाड, जि नाशिक | एमबीबीएस-०५ डीए-२०१० | जा.नं.एसएसएस/वशी-एसएसबीएच/२५२०/१० दि. १७/०८/२०१० | श्री साईबाबा हॉस्पिटलकडे मासिक रु. २७,०००/-फिक्सपेवर कनिष्ठ भूलतज्ञ पदावर नेमणूक |
| ०३ | डॉ. चैताली विष्णु चौधरी मु पो भुसावळ, जि. जळगाव | एमबीबीएस-०६ डीओआरएल-१० | जा.नं.एसएसएस/वशी-एसएसबीएच/२५२२/१० दि. १७/०८/२०१० | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक रु. २७,०००/-फिक्सपेवर आरएमओ पदावर नेमणूक |

उपरोक्त अ.नं. १ ते ३ यांना त्यांचे नावासमोर नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ७३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा /श्री साईनाथ हॉस्पिटलकडे वैद्यकीय अधिकारी/ आरएमओ या पदावर देण्यात आलेल्या उपरोक्त नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ई.एन.टी ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु. करीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर/इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या कमर्शियल निविदा उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु., जनरल आय.सी.यु. इ. तातडीने कार्यान्वित करणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस व वैद्यकिय संचालक यांना सदरचे ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारे मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इन्स्ट्रुमेंट / किरकोळ साहित्य इ. सर्व प्रकारचे खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व आय.सी.यु. साठी लागणारी आवश्यक मशिनरी / उपकरणे / फर्निचर / इन्स्ट्रुमेंट / किरकोळ साहित्य इ. खरेदीस व त्यासाठी अंदाजे खर्च रु. ५८,३०,०००/- (अक्षरी रु. अठ्ठावन्न लाख तीस हजार मात्र) चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देण्याचा प्रस्ताव दि.११/०३/२०१० चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून घेण्याची उपसमितीने शिफारस केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस - पुणे व महाराष्ट्र टाईम्स - पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर सदरची जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत ही दि.०५/०४/२०१० ते १५/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१७/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकुण ८३ उत्पादक / पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र.५५३० दि.०५.०४.२०१० अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय मिळून तेवीस (२३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | A. G. Joshi & Co., Pune |
| 2 | Allwin Lifecare,Mumbai |
| 3 | Biomedicon Services (I) Pvt.Ltd.,Mumbai |
| 4 | Concept Integrations (I) Pvt.Ltd.,Pune |
| 5 | Cyronics Instruments Pvt.Ltd.,Pune |
| 6 | Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai |
| 7 | Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai |
| 8 | Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai |
| 9 | Esbbe Dynamed Pvt.Ltd, Mumbai |
| 10 | Excel Corporation , Nashik |
| 11 | Gandhi Enterprises,Ahmednager |
| 12 | Jalaram Furniture Pvt.Ltd., Surat |
| 13 | Janak Healthcare Pvt.Ltd.,Mumbai |
| 14 | Kalelkar Surgical Pvt.Ltd.,Mumbai |
| 15 | Life Care Medical Systems,Mumbai |
| 16 | Life Care Medical Systems,Mumbai |
| 17 | Life Care Medical Systems,Mumbai |
| 18 | M.Shah And Company,Pune |
| 19 | PSN Instrumentation Pvt.Ltd.,Delhi |
| 20 | Qualisurge Surgical Pvt.Ltd.,Pune |
| 21 | Sai Enterprises,Shrirampur |
| 22 | Saitrons Medical Equipments,Loni |
| 23 | Summit Healthcare (P) Ltd.,Mumbai |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या २३ तांत्रिक निविदा दि. २२/०५/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता श्री साईनाथ रुग्णालयातील नाक-कान-घसा तज्ञ डॉ. कुलकर्णी यांना दाखविण्यात आलेला आहे.

वरील निविदा धारकांपैकी अ.नं. २, १५, १६ व १७ या निविदा धारकांनी निविदेच्या पाकीटावर उल्लेख करताना ई.एन.टी / ऑप्थॅलमिक ओ. टी. करीता लागणारे मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट साठी निविदा असे नमुद केलेले आहे, परंतु तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्यांनी प्रत्यक्षात निविदा भरताना नविन

कार्डीयाक ओ.टी. करीता लागणारे मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट याकरीता Technical Specification दिलेले आहे. त्यामुळे सदरच्या निविदा ई.एन.टी / ऑप्थॅलमिक ओ. टी. करीता लागणारे मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट या खरेदीमध्ये विचारात घेण्यात आलेल्या नाहीत.

तरी उर्वरीत प्राप्त १९ Commercial निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ७३२ श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ई.एन.टी ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु करीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर/इन्स्टूमेंट /किरकोळ साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या १९ कमर्शियल निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ कोपरगांव लोकन्यायालयास फूड पॅकेट देणे बाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये कोपरगांव लोकन्यायालय यांनी दि.१३/०८/२०१० रोजीचे पत्रान्वये सर्व प्रकारच्या केससचे लोकन्यायालय आयोजित केलेले आहे. लोकन्यायालय हे महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याकारणाने लोकन्यायालयासाठी सुमारे ५०० पाकिटे मिळणेबाबत अधिक्षक, जिल्हान्यायालय यांनी विनंती केलेली आहे. सदरील विनंती नुसार मा. विश्वस्त श्री अशोक खांबेकर यांनी सदरील विषयाची टीपणी मा.व्यवस्थापन समिती समोर ठेवणेबाबत सुचना केलेली आहे.

लोकन्यायालया करिता यापुर्वी सन २००५ पासुन ते २००७ पर्यंत कोपरगांव व राहाता लोकन्यायालयाचे मागणीनुसार खालीलप्रमाणे अन्नपाकिटे मोफत पुरविणेत आलेली आहेत.

| अ.नं. | मागणी करणार | दिनांक | नग | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | लोकन्यायालय कोपरगाव | ०३/०७/०५ | २०० | ६००/- |
| ०२. | लोकन्यायालय कोपरगाव | ०९/१०/०५ | ७०० | २१००/- |
| ०३. | लोकन्यायालय कोपरगाव | १८/१२/०५ | ५०० | १५००/- |
| ०४. | राहाता तालुका बार असोशिएशन | ०२/०४/०६ | ३०० | ९००/- |
| ०५. | लोकन्यायालय कोपरगाव | ०८/१०/०६ | ४०० | १२००/- |
| ०६. | लोकन्यायालय कोपरगाव | १७/१२/०६ | ३०० | ९००/- |
| ०७. | लोकन्यायालय कोपरगाव | ०९/०८/०७ | ५०० | १५००/- |
| | | **एकूण =** | **२९००** | **८७००/-** |

तथापी लोकन्यायालय कोपरगांव यांना मा.का.अ. श्री मोरे साहेब यांनी दि.१७/०२/२००८ रोजी ५०० नाष्टा पॅकेट व वकील संघ कोपरगाव यांना दि.०५/१०/०८ रोजी ४०० नाष्टा पॅकेट सवलतीचे दरात सशुल्क स्वरुपात देण्यात आलेली आहेत. लोकन्यायालय कोपरगांव यांना सवलतीचे दरात ५०० नाष्टा पॅकेट द्यावयाचे झालेस रु.१५००/- खर्च येईल. तसेच टेंडर मधील मंजुर दराप्रमाणे प्रती पॅकेट येणारा खर्च रु.७.३२ असुन एकुण ५०० फुड पॅकेटसाठी रक्कम रु.३,६६०/- एवढा खर्च येईल.

तरी अधिक्षक, जिल्हा न्यायालय-१ व सत्र न्यायालय, कोपरगांव यांचे मागणी नुसार फुड पॅकेटस् देणे बाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ७३३ लोकन्यायालय, कोपरगांव यांना आवश्यक असणाऱ्या ५०० नाष्टा पाकीटांचा खर्च कोपरगांव येथील साईभक्त देणार असल्याचे सभेत सांगण्यात आल्याने सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ नविन टायर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स, टयुबसह खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायर एकूण वापर कि.मी. | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ व्ही-९९८८ | टोयोटा ईनोव्हा/ कार्यालयीन | ५२,२१२ | २०५-६५R-१५ टयुबलेस | ब्रिजस्टोन | ०५ |
| २. | एमएच-१७/ व्ही-१७०१ | टाटा सुमो/ कार्यालयीन | ७६,१२७ | २१५-७५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| | | | | | **एकुण टायर्स** | **१०** |

वरील प्रमाणे दोन वाहनांकरीता १० टायर्स, टयुबसह खरेदी कामी रू.६०,०००/- (अक्षरी रक्कम रू.साठ हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

टोयोटा ईनोव्हा व टाटा सुमो या दोन्ही वाहनांकरीता ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन टायर्स खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे टोयोटा ईनोव्हा व टाटा सुमो या दोन वाहनांकरीता १० टायर्स, टयुबसह खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रू.६०,०००/- (अक्षरी रक्कम रू.साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे टोयोटा ईनोव्हा व टाटा सुमो या दोन वाहनांकरीता आवश्यक असणारे १० टायर्स, टयुबसह कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रू.६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे छताचे स्लॅबसाठी वॉटरप्रुफिंग करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.४६१ अन्वये संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे छताचे स्लॅबला वॉटरप्रुफिंग करणेकामी अंदाजे रु.९०,२३१/- मात्र इतके अपेक्षित खर्चास तसेच याकामी ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन इकडील जा.क्र. ९०८१/२०१० दि.१८/०८/२०१० रोजीचे पत्रान्वये खालील ठेकेदार यांना निविदा विक्रीबाबत कळविण्यात आले होते.

०१. मे. मिलींद एस पाचोरकर, निफाड जि. नाशिक
०२. इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव
०३. एस.एन. गुंजेगांवकर, निमगांव
०४. मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव
०५. मे. पारकर केमिकल्स, पुणे
०६. डी.ए. खर्डे, कोल्हार
०७. ए.एम.धोत्रे, कोल्पापूर ह.मु. लक्ष्मीवाडी ता. राहाता

उपरोक्त पैकी खालील चार निविदा धारकांनी निविदा विकत घेतल्या आहेत. याकामी दि.०३/०९/२०१० अखेर निविदा सादर करणे कामी मूदतवाढ देण्यात आली होती.

०१. इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव
०२. एस.एन. गुंजेगांवकर, निमगांव
०३. ए.एस. धोत्रे, कोल्हापूर ह.मु. लक्ष्मीवाडी ता. राहाता
०४. मे. पारकर केमिकल्स, पुणे

उपरोक्तपैकी चार निविदा धारकांपैकी खालील तिन निविदा धारकांनी निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | २३४८४/ दि. ०२/०९/२०१० |
| ०२ | ए.एस. धोत्रे, कोल्हापूर ह.मु. लक्ष्मीवाडी ता. राहाता | २३५३०/ दि. ०३/०९/२०१० |
| ०३ | मे. पारकर केमिकल्स, पुणे | २३०४९/ दि. २७/०९/२०१० |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या, त्यांचे दर खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | अपात्र |
| ०२ | ए.एस. धोत्रे, कोल्हापूर ह.मु. लक्ष्मीवाडी ता. राहाता | अपात्र |
| ०३ | मे. पारकर केमिकल्स, पुणे | २,१३,७६०/- |

**निर्णय क्र. ७३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी एकच पात्र निविदा प्राप्त झालेने सदर सर्व निविदा रद्द करुन उपरोक्त काम खात्यामार्फत आवश्यक ते मटेरिअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत करुन घेण्यात यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ नविन श्रीसाईप्रसादालय समोरील श्रीसाईबाबांचे शिल्पासाठी छत तयार करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयासमोर श्री साईबाबा भक्तांसाठी प्रसाद भोजन बनवित आहेत अशा मुद्रेत शिल्प उभारण्यात आले आहे. सदर शिल्पाचे ऊन, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी छत तयार करणेत यावे

अशा आशयाचे निवेदन काही साईभक्तांनी दिले आहे. याबाबत साई भक्तांकडून सातत्याने मागणी होत आहे. त्यानुसार दि.१०/०१/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२१ अन्वये नविन श्री साई प्रसादालय समोरील श्री साईबाबांचे शिल्पासाठी छत तयार करणेकामी आर्किटेक्ट शक्ती परमार अथवा इतर नामांकीत आर्किटेक्ट यांचेकडून याकामी डिझाईन व एस्टीमेट घेण्यात यावे व त्यानुसार निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट शक्ती परमार यांचेकडून सदर छताचे डिझाईन करुन घेण्यात आले व इकडील विभागामार्फत निविदा तयार करण्यात आल्या आहेत. दि.१७/०८/२०१० रोजीचे दरपत्रक मागणी पत्रान्वये ठेकेदारांना को-या निविदा देऊन त्यांचेकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. विहीत मूदतीत ०५ ठेकेदारांनी को-या निविदा विकत घेतल्या आहेत. सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदारांना दि. २१/०८/२०१० पर्यंत मूदत देण्यात आली होती. पंरतू सदरचे काम हे विशिष्ट प्रकारचे असल्याने व बिरला व्हाईटचे जी.आर.सी. रुफ चे असल्याने सदरच्या निविदा सादर करणेसाठी काही कालावधी आवश्यक आहे असे काही ठेकेदारांनी कळविले होते आता उपरोक्त ०५ ठेकेदारांपैकी खालील ०४ ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | ठेकेदार | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव | २२४७८ | २१/०८/२०१० |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | २२४९१ | २१/०८/२०१० |
| ०३ | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | २२६९८ | २४/०८/२०१० |
| ०४ | स्टलवार्ट आर्किटेक्टचरल सोल्युशनस्, मुंबई | २२८३६ | २६/०८/२०१० |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्रं. | ठेकेदार | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव | ५,५८,९८०/- | अनुपस्थित |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ५,६६,७२०/- | ५,३७,४३४/- |
| ०३ | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ६,५५,०००/- | ५,५६,७५०/- |
| ०४ | स्टलवार्ट आर्किटेक्टचरल सोल्युशनस्, मुंबई | ६,९२,०९९/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र. ७३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ संस्थान रुग्णालयाकरीता लॉण्ड्री शेड उभारणेकामी आलेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०४/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६९ अन्वये संस्थान रुग्णालयांसाठी स्वतंत्र लॉण्ड्री शेड उभारणेसाठी रु.४,६८,२९१/- मात्रचे खर्चास तसेच सदरहु लॉण्ड्री शेडचे बांधकाम सर्व्हे क्र.१२५ मधिल श्री.लोढा यांचेकडून खरेदी केलेल्या जागेत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरहु बांधकामासाठी आलेल्या निविदांबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३२ अन्वये ठेकेदार श्री. ईश्वर पंढरीनाथ जंजीरे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना सदरहू कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार ठेकेदार यांना इकडील जा.क्र. एसएसएसटी/बांध/१२४००/२००९ दि. ०७/१०/२००९ नुसार कार्यादेश देणेत आला होता. त्यांची मंजूर निविदा रक्कम रु. ५,७६,८१७/- मात्र इतकी होती.

विद्युत विभाग प्रमुख यांनी दि.०४/०२/२०१० चे पत्रानुसार साईनगर परिसरातील जागेत नव्याने सबस्टेशन उभारणीकामी सध्याची असलेली जागा अपुरी पडणार असल्यामुळे सध्याचे सबस्टेशनचे पश्चिम बाजू कंपाऊंड ते समर्पण इमारती पर्यंतची जागा सबस्टेशन उभारणीकरीता आरक्षित राहू देणेस कळविले आहे. सदरहू कामाचे ठेकेदार मे. आय.पी.जंजीरे, श्रीगोंदा यांनी लॉण्ड्री शेडचे काम करणेस असमर्थता दाखविली आहे. व त्यांना दिलेला कार्यादेश रद्द करावा म्हणून विनंती केली आहे. त्यानुसार सदर ठेकेदार यांचा कार्यादेश रद्द केल्यास लॉण्ड्री उभारणेसाठी नव्याने निविदा प्रक्रिया करावी लागेल व त्यामुळे लॉण्ड्री शेड उभारणेस विलंब होईल. साईनाथ रुग्णालयाचे पश्चिम बाजूस पुर्वी धर्मशाळेत निवासाकरीता बसव्दारे येणाऱ्या साईभक्तांसाठी स्वयंपाक करणेसाठी शेड उभारणेत आलेले होते. पंरतू आता तेथिल धर्मशाळा वापर बंद झाल्याने या शेडचा किचन म्हणून वापर करण्यात येत नाही. याकरीता इकडील विभागाचे दि.२७/०२/२०१० रोजीचे टिपणी नुसार संस्थान रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील शेड मध्ये करणेस व त्याकरीता खात्यामार्फत मटेरीअल खरेदी करुन स्थानिक मजुरी ठेकेदारामार्फत मजुरीदराने काम करुन घेणेस मान्यता घेणेत आली आहे. त्याकरीता विहीत पध्दतीने

कोटेशन मागवून अथवा मागिल मंजूर दरात मटेरीअल खरेदी करणेत आले आहे. त्यासाठी आलेल्या खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| अ.नं | मटेरीअलचा तपशिल | ठेकेदार/ पुरवठा दाराचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | विट | वाक्चौरे पाटील सेल्स एजन्सी, शिर्डी | १७,८५७.०० |
| ०२ | सिमेंट | वाक्चौरे पाटील सेल्स एजन्सी, शिर्डी | २०,७००.०० |
| ०३ | वाळू | श्री संदीप थोरात, कोपरगांव | ९३३०.०० |
| ०४ | सिव्हील काम मजुरी दराने | महेंद्र आर टाटीया, श्रीरामपूर | ५६,२५७.०० |
| ०५ | फॅब्रीकेशन वर्क | महेंद्र आर टाटीया, श्रीरामपूर | |
| | | **एकूण रुपये** | **१,०५,७७.००** |

तरी संस्थानचे रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री उभारणेकरीता मटेरीअल व मजुरीसह आलेल्या एकूण रु.१,०५,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री उभारणेकरीता मटेरीअल व मजुरीसह आलेल्या एकूण रु.१,०५,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ डाटा सेंटर हॉलमधील नियोजीत केबिन्स करिता जिप्सम पार्टीशन दरवाजे व फॉल्स सिलींग करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील नि.क्र. २९३ अन्वये साई प्रसादालयातील उत्तरेकडील पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये डाटा सेंटर व इतर अनुषंगिक सुविधा करणेस येणारे रु.३२.०० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेतील नि.क्र.३६३ अन्वये फॉल्स सिलींग, जिप्सम प्लास्टर, दरवाजे, पेंटींग इंटेरीअर इ. कामांसाठी मटेरीअलसह कोटेशन मागवून काम करणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार इकडील विभागाचे जा.क्र.९००१ दि.१४/०८/२०१० रोजीचे कोटेशन मागणी पत्राव्दारे अशा प्रकारचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून विषयांकीत कामासाठी कोटेशन मागविणेत आले असता खालिलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आ.क्र./ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | त्रिमीती इंटेरीअर्स, नाशिक | २२३५१/दि.२०/०८/२०१० |
| ०२ | वेव इंटेरीअर प्रा.लि. नाशिक | २२१६१/दि.१७/०८/२०१० |
| ०३ | मगर जायभावे असो., नाशिक | २२१७९/ दि.२१/०८/२०१० |
| ०४ | ॲरीस, पुणे | २२४७७/दि.२१/०८/२०१० |
| ०५ | शुभंकर इंटरप्रायझेजस, पुणे | २२९६५/दि. २७/०८/२०१० |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्रं. | ठेकेदार | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | त्रिमीती इंटेरीअर्स, नाशिक | ५,६७,३१८/- | ४,९९,२४०/- |
| ०२ | वेव इंटेरीअर प्रा.लि. नाशिक | ५,४४,६३२/- | ४,८४,७२२/- |
| ०३ | मगर जायभावे असो., नाशिक | ४,९५,५६४/- | ४,६०,८७५/- |
| ०४ | ॲरीस, पुणे | ६,६१,३०६/- | अनुपस्थित |
| ०५ | शुभंकर इंटरप्रायझेजस, पुणे | १३,०३,७४१/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र. ७३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मगर जायभावे असो., नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ ट्रांन्झीट सुट नं. ३ व ४ चे टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जनसंपर्क कार्यालयाजवळील ट्रांन्झीट सुट नं. १ ते ४ खोल्या विश्वस्त, अधिकारी व अतिमहत्वाचे मान्यवरांसाठी अल्प विश्रांतीसाठी तयार करणेत आलेल्या आहेत. सदरहू रुमचे व टॉयलेट मधिल रंगकाम व फ्लोरींग सततचे वापरांमुळे खराब झालेला असल्याने ट्रान्झीट सुट नं. १ व २ चे नूतनीकरण करुन घेणेत आलेले आहेत. व्ही.आय.पी. साईभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता ट्रांझीट सुट नं. ३ व ४ मधिल पार्टीशन भिंत काढून घेणेत येवून सदर ठिकाणची मार्बल फ्लोरींग सततच्या वापरामुळे खराब झालेले असल्याने इकडील विभागाकडील देणगी दाखल आलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्सची फ्लोरींग विभागामार्फत करुन घेणेत

आलेले आहे व रंगकाम करुन घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ट्रान्झीट सुट नं. ३ व ४ चे टॉयलेट ब्लॉकचे फ्लोअरींग, डॅडोच्या टाईल्स व रंगकाम खराब झालेले असल्याने सदरचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. याकरीता टॉयलेट ब्लॉक मधिल फ्लोरींग, डॅडो करीता टाईल्स बसविणे, प्लॅबिंग व सॅनिटरी फिटींग करणे इ. कामाकरीता अंदाजे रु.१,७१,१८३.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच व्ही.आय.पी. साईभक्तांना बसविणेकरीता Three Seater Composite leather foam Sofa with wooden frame with ४" fibre legs ०६ खरेदी करणेकरीता अंदाजे रु.१,२१,५००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. म्हणजेच याकामी एकूण रु.२,९२,६८३/- मात्र खर्च येईल.

सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागावून मटेरीअल खरेदी करुन मजुरी दराने करुन घेता येईल.

तरी याकामी येणारे एकूण अंदाजे रु.२,९२,६८३/- मात्रचे खर्चास व सदरचे कामाकरीता आवश्यक मटेरीअल व सोफा विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन मजुरी दराने काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ श्री साईनाथ रुग्णालय नविन ऑपरेशन थिएटरमध्ये बसविणेकामी ए.सी. खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाकडे नविन ऑपरेशन थिएटर, डॉक्टर केबीन, नर्सिंग स्टेशन व नविन आय.सी.सी.यु.तयार करण्यात आलेले असून यामध्ये हॉस्पीटल मार्फत १५ नग स्प्लिट ए.सी.खरेदी करुन बसवून देण्यात आलेले आहेत.

आता श्री साईनाथ रुग्णालयाकडून रुम नंबर - ११३ व ११४ मध्ये जादा ए.सी.बसवून मिळणेबाबत मागणी करण्यात आलेली आहेत. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरील प्रत्येक रुममध्ये २ टन क्षमतेचे ०२ नग ए.सी. असे एकुण ०४ नग ए.सी.बसविणे आवश्यक आहेत.

सध्या विद्युत विभागाकडे नविन ए.सी.शिल्लक नसल्याने आपणाला नविन ए.सी. श्री साईनाथ रुग्णालय नविन ऑपेशन थिएटरमध्ये खरेदी करुन बसवावे लागणार आहे. त्यासाठी ते खालीलप्रमाणे खरेदी करावे लागणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या CSR मध्ये खालीलप्रमाणे वर्णन व दर नमूद आहेत.

| Sr.No. | C.S.R | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 3-2-7 | Supplying and erecting split type room Airconditioning unit 2 TR capacity 250V. 50 cycles, A.C. supply having 1 No of air handling unit hi-wall mounting type complete at position as per specification no. AP-AC/SAC | 04 Nos | 40,181.40 | 1,60,725.60 |
| | | | | Total. | 1,60,725.60 |
| | | | | **Round up :-** | **1,60,726.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय नविन ऑपेशन थिएटरमध्ये नविन ए.सी.ची खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. १,६०,७२६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे ए.सी. कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७४० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे नविन ऑपेशन थिएटरमध्ये नविन ए.सी. बसविणेसाठी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. १,६०,७२६/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेच्या सर्व्हिस कॉन्ट्रक्टची रक्कम मे.सुझलॉन एनर्जी लि. यांचेऐवजी मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांना रक्कम आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत २.५ मेगावॅट पवनचक्की प्रकल्प मे.सुझलॉन एनर्जी लि. यांनी दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करून कार्यान्वित केलेला आहे.

मे.सुझलॉन एनर्जी लि.पुणे यांनी माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ अखेर रु. २७,३१,७०४.८० इतकी रक्कम ऑपरेशन - मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (ए. एम. सी.) कळविल्यानुसार ही रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता.

दि. ०४-०७-२०१० रोजी मा.व्यवस्थापन समितीच्या झालेल्या सभेत विषय क्र. ५२ नुसार निर्णय क्र. ५७१ नुसार या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर विद्युत विभागामार्फत दि. २५-०७-२०१० रोजी मुख्य लेखाधिकारी यांचा बजेटबाबतचा अभिप्राय घेऊन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यास दि. ३०-०७-२०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. यानंतर हे बील लेखाशाखेकडे कार्यवाहीसाठी पाठविले असता बील मे. सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांचे नांवे असल्याने मे. सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि.,यांचे नांवावर चेक देण्यासाठी मे.सुझलॉन एनर्जी लि., यांचे लेखी पत्र घ्यावे म्हणून सांगितल्यानुसार

मे.सुझलॉन एनर्जी लि., यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दि. ०९-०८-२०१० ला लेखी पत्र पाठवून पेमेंट हे मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांचे नांवे मिळावे म्हणून लेखी कळविले आहे.

तरी मे.सुझलॉन एनर्जी लि., यांचे लेखी पत्रानुसार मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांना माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या कालावधीकरीता ऑपरेशन - मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (ए. एम. सी.) रु. २७,३१,७०५/- इतकी रक्कम आदा करणेसाठी मान्यता मिळणेकामी संस्थान ऑडीटर यांनी विद्युत विभागास, मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी म्हणून कळविले आहे.

तरी मे.सुझलॉन एनर्जी लि., यांचे लेखी पत्रानुसार मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांना माहे एप्रिल २०१० ते मार्च २०११ या कालावधीकरीता ऑपरेशन - मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (ए. एम. सी.) रु. २७,३१,७०५/- इतकी रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सुझलॉन एनर्जी लि., यांचे लेखी पत्रानुसार मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांना माहे एप्रिल २०१० ते मार्च- २०११ या कालावधीकरीता ऑपरेशन - मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी (ए. एम. सी.) रु. २७,३१,७०५/- इतकी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या पवनचक्कीचे मे.सुझलॉन हेच स्वत: उत्पादक असल्याने व त्यांनी उत्पादित व उभारणी केलेल्या पवनचक्की यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांचेशिवाय दुसरी कोणतीही कंपनी करु शकत नसल्याने यापुढे दरवर्षी मे.सुझलॉन यांनी उत्पादित व उभारणी केलेल्या संस्थान मालकीच्या पवनचक्की यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस लि., यांचेशी करणेस व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता बनविलेल्या लॉन्ड्री शेडला ग्रील तयार करणे व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांकरीता लोखंडी फ्रेम तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन लॉन्ड्री शेड करण्याचे काम पुर्ण झालेले आहे. सदर शेडची लांबी पुर्व बाजू-५० फूट तर दक्षिण व उत्तर प्रत्येकी २० फूट अशी असून विद्युत विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करुन लोखंडी ग्रील बसवून मिळणेकामी औषध भांडार, श्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी यांनी उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील विविध ठिकाणी विविध विभागाकरीता ०८ नग किचन ओटया टाईप लोखंडी फ्रेम तयार करुन मिळणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये कळविले आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन लॉन्ड्री शेडच्या साईडने ग्रील बसविणे कामी तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील विविध ठिकाणी विविध विभागाकरीता लोखंडी फ्रेम तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ५० x ५० x ५ एम.एम. | ७८०<br>किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | ३९,०००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ३५ x ३५ x ५ एम.एम. | ५५०<br>किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | २७,५००.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :- २५ x ५ एम.एम. | ३८०<br>किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | १९,०००.०० |
| ०४) | एम.एस.सॉलीड राऊंड बार,<br>साईज :- ८ एम.एम. | २००<br>किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | १०,०००.०० |
| ०५) | एम.एस.सॉलीड स्क्वेअर बार,<br>साईज :- १० एम.एम. | २५०<br>किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | १२,५००.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | १,०८,०००.००<br>१३,५००.०० |
| | एकुण रक्कम :-<br>लेबर + ट्रान्सपोर्ट चार्जेस ४०% मजुरी | | | १,२१,५००.००<br>४८,६००.०० |
| | | **एकुण रक्कम :-** | | **१,७०,१००.००** |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन लॉन्ड्री शेडच्या साईडने लोखंडी ग्रील लावणेसाठी तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील विविध ठिकाणी विविध विभागाकरीता लोखंडी फ्रेम तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,२१,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन लॉन्ड्री शेडच्या साईडने लोखंडी ग्रील लावणेसाठी तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील विविध ठिकाणी विविध विभागाकरीता लोखंडी फ्रेम तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,२१,५००/- मात्र खर्चास तसेच सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ सिक्युरिटी सिस्टिमचे कामाबरोबरच गर्दीचे नियोजनासाठी शांतिनिवास दर्शन हॉलचे प्रवेशव्दाराचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणे व दर्शन प्रवेशव्दाराजवळ बॅगेज स्कॅनरसाठी ट्रॉली बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परीसरात सुरक्षिततेसाठी सिक्युरिटी कॅमेरे, स्कॅनर बसविण्याचे काम चालू आहे. यासंबंधात दिनांक ०३-०९-२०१० रोजी संबंधित काम करणारी कंपनीचे अधिका-यांचा मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत कामाची पाहणी करणेसाठी व कामात येणा-या अडचणींवर मार्ग काढणेसाठी राऊंड झाला. या राऊंडमध्ये मनोजकुमार गोस्वामी पथावरील शांतिनिवास दर्शन हॉलचे बाहेरील मोठे कास्टींगचे दोन गेट हे दर्शनलाईनमध्ये येणा-या भक्तांमध्ये व कॅमे-याच्या पोझिशनमध्ये अडचण निर्माण करीत असल्याने तसेच गर्दीचे नियोजनासाठी हे गेट स्लाईडिंग करुन घ्यावे लागणारआहे.

तसेच स्कॅनर मशिन बसविणेसाठी स्टॅंड तयार करुन दयावे लागणार आहेत. सदरचे हे काम बाहेरील बाहेरील वर्कशॉप / फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**०१). शांतिनिवास दर्शन हॉलचे प्रवेशव्दाराचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणे :-**

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | खालील बाजूस व वरील बाजूस लोखंडी चॅनेलचा आधार देणे. साईज :- ISMC - १०० X ८mm | २३० किलो | ५०.०० | ११,५००.०० |
| ०२) | खालील बाजूस व वरील बाजूस लोखंडी अँगलचा स्लाईडींग रेल देणे. साईज :- ISA - ५० X ५mm | १०० किलो | ५०.०० | ०५,०००.०० |
| ०३) | स्लाईडींग चाक, बेअरींग व ब्रॅकेटसह, साईज :- DIA १०० MM X २" | ०४ नग. | १,५००.०० | ०६,०००.०० |
| ०४) | स्लाईडींग गाईड रोलर, बेअरींग व ब्रॅकेटसह, साईज :-DIA ५० MM X ६" | १६ नग. | ५००.०० | ०८,०००.०० |
| ०५) | स्लाईडींग आधारासाठी गेटला पाईप लावून रुंदी वाढविणे. साईज :- Sq.Pipe ५० x ५० x ५mm | ७० किलो | ६०.०० | ०४,२००.०० |
| | | | एकुण | ३४,७००.०० |
| | | | लेबर चार्जेस | १८,०००.०० |
| | **एका गेटसाठी येणारा खर्च :-** | | एकुण :- | ५२,७००.०० |
| | | | वॅट १२.५% | ०६,५८७.५० |
| | | | ट्रासपोर्ट चार्जेस | ०३,०००.०० |
| | | | एकुण रक्कम | ६२,२८७.५० |
| | | | पुर्णांकित रक्कम | ६२,२८८.०० |
| | | | **दोन गेटसाठी येणारा खर्च :-** | **१,२४,५७६.००** |

**०२). दर्शन प्रवेशव्दाराजवळ बॅगेज स्कॅनरसाठी ट्रॉली बनविणे.**

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | पाईप फ्रेम, साईज :- Sq.Pipe ५० x ५० x ३mm | ६० फूट | ४००.०० | २४,०००.०० |
| ०२) | टॉप पाईप फ्रेम, साईज :- Sq.Pipe ५० x ५० x ३mm | २५ फूट | ४००.०० | १०,०००.०० |
| ०३) | उंची कमी-जास्त करणेसाठी स्क्रु लावणे, (G.I.)साईज:-DIA ३०० MM X ८" | ०४ नग. | १,०००.०० | ४,०००.०० |
| ०४) | व्हील , बेअरींग व ब्रॅकेटसह, साईज :- DIA २०० MM X २" | ०४ नग. | १,०००.०० | ४,०००.०० |
| | | | एकुण | ४२,०००.०० |
| | | | लेबर चार्जेस | २०,०००.०० |
| | **एका ट्रॉलीसाठी येणारा खर्च :-** | | एकुण :- | ६२,०००.०० |
| | | | वॅट १२.५% | ७,७५०.०० |
| | | | ट्रासपोर्ट चार्जेस | ३,०००.०० |

| | |
|---|---|
| **एकुण रक्कम** | **७२,७५०.००** |
| **दोन ट्रॉलीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये** | **१,४५,५००.००** |

उपरोक्तप्रमाणे शांतिनिवास दर्शनहॉलचे प्रवेशव्दाराचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणेकामी दोन गेटसाठी रक्कम रुपये १,२४,५७६/-+बॅगेज स्कॅनरसाठी दोन नग ट्रॉली बनविणेकामी रक्कम रु. १,४५,५००/- मात्र मिळून रक्कम रुपये २,७०,०७६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शांतिनिवास दर्शनहॉलचे प्रवेशव्दाराचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणेकामी दोन गेटसाठी रक्कम रुपये १,२४,५७६/-+ बॅगेज स्कॅनरसाठी दोन नग ट्रॉली बनविणेकामी रक्कम रु. १,४५,५००/- मात्र मिळून रक्कम रुपये २,७०,०७६/- इतका खर्चास तसेच सदरहू काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री साईनाथ रुग्णालय पॅसेज विंडोला जाळी, संडास-बाथरुमच्या साईड विंडोला जाळी तसेच कारपार्कीगच्या बाजूला स्टोअरसाठी जाळीचे कंपार्टमेंट बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ०३-०९-२०१० रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब तसेच वैद्यकीय संचालक, वैद्यकीय संचालक यांचा कामाची पाहणी करणेसाठी व कामात येणा-या अडचणींवर मार्ग काढणेसाठी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राऊंड झाला. या राऊंडमध्ये श्री साईनाथ रुग्णालय पॅसेज विंडोला जाळी, संडास-बाथरुमच्या साईड विंडोला जाळी तसेच कारपार्कीगच्या बाजूला स्टोअरसाठी जाळीचे कंपार्टमेंट बनविणे काम करुन दयावे लागणारआहे.

सदरचे हे काम बाहेरील बाहेरील वर्कशॉप/फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :-३० x ३० x ३ एम.एम. | १००० किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | रु. ०,५०,०००.०० |
| ०२) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :-२५ x ३ एम.एम. | ०१०० किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | रु. ०,०५,०००.०० |
| ०३) | एम.एस.स्क्वेअर जाळी,<br>साईज :- २५ x ४ एम.एम. | १००० रनिंग फूट | रु. ६०.००<br>(प्रति रनिंग फूट) | रु. ०,६०,०००.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | रु. १,१५,०००.००<br>रु. ०,१४,३७५.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | रु. १,२९,३७५.००<br>रु. ०,५१,७५०.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. १,८१,१२५.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय पॅसेज विंडोला जाळी, संडास-बाथरुमच्या साईड विंडोला जाळी तसेच कारपार्कीगच्या बाजूला स्टोअरसाठी जाळीचे कंपार्टमेंट बनविणेचे काम करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,८१,१२५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ७४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय पॅसेज विंडोला जाळी, संडास-बाथरुमच्या साईड विंडोला जाळी तसेच कारपार्कीगच्या बाजूला स्टोअरसाठी जाळीचे कंपार्टमेंट बनविणेचे काम करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,८१,१२५/- चे खर्चास व सदरहू काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव-२०१० साजरा करणेस व येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.
"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये

विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव शनिवार दिनांक १६/१०/२०१० ते मंगळवार दिनांक १९/१०/२०१० ( आश्वीन शुध्द ९ शके १९३२ ते आश्वीन शुध्द १२ शके १९३२) असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे. **उत्सवाचा मुख्य दिवस रविवार दिनांक १७/१०/२०१० आहे.**

**या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.**

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१ | **उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद** | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ६० हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. तसेच उत्सव समाप्ती नंतर सर्व सभासदांना पोष्टाने उदी-प्रसाद पाठविण्यात येईल. |
| ०२ | **उत्सव व्यवस्था-** | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | **शनिवार, दिनांक-१६/१०/२०१० ( प्रारंभ दिवस)** | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | **रविवार दिनांक १७/१०/२०१० ( मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (१८/१०/२०१०)कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **सोमवार, दिनांक १८/१०/२०१० ( तृतीय दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) |
| | **मंगळवार, दिनांक १९/१०/२०१० (सांगता दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी चार दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. किर्तनकार निश्चीती करावयाची आहे. |
| | **क) विविध पुजा व आराधना विधी** | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात विश्वस्तांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक,_आराधना विधी, विणा, व पोथी त्यातील विश्वस्तांचा सहभाग, सिमोल्लंघन, इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथे प्रमाणे करण्यात येतील. |
| ०३ | **श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा** | उत्सवकाळात दि. १६/१०/२०१० ते दि. १९/१०/२०१० अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा चालू राहतील. |
| ०४ | **अखंड पारायण व्यवस्था** | उत्सव काळात दिनांक १६/१०/२०१० रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १७/१०/२०१० रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक १५/१०/२०१० रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे - नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्तांची नांवे ठरविणे आहेत. सोबत कोरा तक्ता जोडलेला आहे. तसेच श्री गुरुपोर्णिमा उत्सव सन २०१० मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. विश्वस्तांचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. विश्वस्त सहभाग या सभेत निश्चित करणे आहे. |
| ०५ | **पालखी व रथ मिरवणूक** | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दि.१६/१०/२०१० रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, रविवार दि. १७/१०/२०१० रोजी रात्रौ ०९.१५ वा. रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ०६ | **विद्युत रोषणाई** | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येणार आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. (विद्युत विभाग) |
| ०७ | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात |

| | | |
|---|---|---|
| | | ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. (संरक्षण विभाग) |
| **०८** | **प्रसाद - भोजन व्यवस्था** | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकरांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच ती-नही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री पुण्यतीथी उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. (प्रसादालय व कॅंटीन विभाग)<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन २०१० तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br><u>या उत्सवात खालील प्रमाणे मिष्टांन्न देता येतील.</u><br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस -जिलेबी (०३) तृतीय दिन-बर्फी (०४) सांगता दिन - बुंदी |
| **०९** | **<u>गांवजेवण</u>** | उत्सवाचे शेवटचे दिवशी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. या करीता स्वतंत्र पत्रिका न छापता उत्सवाचे निमंत्रण पत्रिकेत त्याचा उल्लेख करण्यात येईल. तसेच गावात सुचना फलक लावण्यात येतील. |
| **१०** | **लिलाव** | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. (लेखाशाखा) |
| **११** | **देणगी काऊंटर्स** | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. (लेखाशाखा) |
| **१२** | **जादा कंत्राटी कर्मचारी** | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील.(कामगार विभाग) |
| **१३** | **भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था** | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, साईऊदयान , मंगलकार्यालय, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, साईप्रसाद निवासस्थान व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. (बांधकाम विभाग) |
| **१४** | **रुग्णालय व्यवस्था** | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. (दोन्ही रुग्णालय) |
| **१५** | **पालखी व्यवस्था** | श्री पुण्यतीथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/ शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. दोन-तीन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| **१६** | **पाणीपुरवठा** | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| **१७** | **कार्यक्रमाची सांगता** | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| **१८** | **खर्चाचे अंदाज पत्रक** | श्रीसाईबाबा पुण्यतीथी उत्सव - २००९ मध्ये अंदाजपत्रकीय रुपये ४५,७१,०००/-(अक्षरी रु. पंचेचाळीस लाख एकाहत्तर मात्र) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ३४,१८,७६७/-(अक्षरी रु. चौतीस लाख अठरा हजार सातशे सदुसष्ठ मात्र) इतका खर्च झाला होता.<br>श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव - २०१० करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४४,००,०००.०० (अक्षरी रु. चौरेचाळीस लाख मात्र) मंजूरीसाठी सादर केलेले आहे.<br>अंदाजपत्रकाचा तपशिलवार माहिती तक्ता सोबत माहिती करीता जोडला आहे. |

**निर्णय क्र. ७४५ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पुण्यतिथी उत्सव-२०१० मध्ये कार्यक्रम आयोजित करणेस व याकामी येणारे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४४,००,०००/- (अक्षरी रु. चौरेचाळीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ सन २०१०-११ बांधकाम विभागासाठी सिमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ सालामध्ये संस्थानचे बांधकाम विभागाचे कामकाजासाठी आवश्यक सिमेंट खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| बाधकाम विभाग | रु. ३,६०,०००/- |
| एकुण | रु. ३,६०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु. ३,६०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल

अ) सन २०१०-११ मध्ये ४३ ग्रेड मे.अल्ट्रा टेक सिमेंट लिमिटेड, पुणे कंपनीशी संपर्क साधून अस्तित्वात असलेल्या दराने किंवा आवश्यकता भासल्यास अल्ट्रा टेक,ए.सी.सी., राजश्री बिर्ला A१, बिर्ला गोल्ड व अंबुजा सिमेंटच्या डिलरकडून कोटेशन मागवून बांधकाम विभागामार्फत खरेदी करता येईल.

सन २०१०-११ साठी आवश्यक असणारे सिमेंट खरेदीसाठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेत येईल. तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस व त्याकामी येणाऱ्या खर्चास तत्वत: मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ७४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २०१०-११ मध्ये ४३ ग्रेड मे.अल्ट्रा टेक सिमेंट लिमिटेड, पुणे कंपनीशी संपर्क साधून अस्तित्वात असलेल्या दराने किंवा आवश्यकता भासल्यास अल्ट्रा टेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला A१, बिर्ला गोल्ड व अंबुजा सिमेंटच्या डिलरकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावे याकामी येणारे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ लंडन येथील साई भजन संध्या कार्यक्रमाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०८.२०१० रोजी झालेल्या स्थानिक समिती सभेत श्री साईबाबांचे भक्तीचा प्रचार व प्रसार व्हावा याकरिता दि.१९ सप्टेंबर २०१० रोजी लंडन येथे साई भजनसंध्या कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले आहे. त्यानुसार लंडन येथील जगविख्यात रॉयल अलबर्ट हॉल येथे श्री.मनहर उधास, पं.सुरेश वाडकर, पद्मश्री श्रीमती पद्मजा फेनानी- जोगळेकर व श्री.मुकूल नाग या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

सदर भजनसंध्या कार्यक्रमासाठी संस्थान अधिकारी व कलाकारांचा जाणे-येणे विमान प्रवास खर्च, निवास खर्च, कार्यक्रमासाठी इव्हेंट मॅनेजमेंट, जाहिरात, कलाकारांचे Work permit, Visa, मानधन, स्थानिक प्रवास खर्च, पुस्तके हवाई वाहतूक, पॅकींग तसेच इतर अनुषंगिक खर्चासाठी रक्कम रु.५०,००,०००/- (रु.पन्नास लाख) मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता मिळावी, तसेच लंडन येथील कार्यक्रमाचे वेळी ऐनवेळेस तातडीच्या प्रासंगिक खर्चाची गरज भागविणेसाठी ॲक्सीस बँक- ट्रॅव्हल कार्ड घेण्यास व यामध्ये रक्कम रु.१० लाख पर्यंतची रक्कम नेण्यास मान्यता मिळणेस विनंती. सदर कार्ड घेण्यासाठी फक्त रु.२५०/- खर्च असून रक्कम हाताळण्यापेक्षा हे कार्ड वापरणे जास्त सुरक्षित आहे.

तरी सदर कार्यक्रमासाठी रक्कम रु.५०,००,०००/- ची अंदाजपत्रकीय तरतूद करणेस ॲक्सीस बँक, शिर्डी कडून ट्रॅव्हल कार्ड घेण्यास मान्यता मिळावी असा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला होता.

**निर्णय क्र. ७४७ यावर सविस्तर चर्चा होऊन,लंडन येथे होणाऱ्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी प्रस्तावानुसार रक्कम रुपये ५०,००,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय तरतूदीस व लंडन येथील कार्यक्रमाचे वेळी तातडीच्या प्रासंगिक खर्चाची गरज भागविणेसाठी Axix बँक, शिर्डी यांचेकडून मा.कार्यकारी अधिकारी यांचे नावे Travel Card घेणेस व त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे रक्कम नेण्यासही मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी/प्रशासन शाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७ श्रीमती नफीसा अब्दुल हाफिज बाणकोटकर, रा. मादांड, ता. तळा, जि. रायगड यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती नफीसा अब्दुल हाफिज बाणकोटकर, रा. मादांड, ता. तळा, जि. रायगड यांना संस्थानमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेबाबत मा. नामदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, मंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र शासन, यांनी शिफारस पत्र दिलेले असून दि. १७.०८.२०१० मागणी अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे दिलेली नाहीत.

श्रीमती बाणकोटकर ह्या दोन्ही पायांनी आजारी आहेत. त्यांचे पायावर जसलोक हॉस्पिटल, मुंबई या रुग्णालयात (Tibia and Femur Bone Detormity Correction) ही शस्त्रक्रिया होणार असून त्याकरीता रु. ४,००,०००/- खर्च येणार असल्याने प्रमाणपत्र संबंधीत रुग्णालयाने दिलेले आहे. तसेच शस्त्रक्रियेची तारीख १८.०७.२०१० दर्शविलेली आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्रीमती बाणकोटकर यांचे वैद्यकीय उपचाराकरीता अनुदान देण्यात येत नाही. तसे श्रीमती बाणकोटकर यांना इकडील जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/२६३८/२०१० दि.२३.०८.२०१० रोजीचे पत्रान्वयक दिलगीरीपुर्वक कळविण्यात आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी श्रीमती बाणकोटकर यांची अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दि. ०४.०९.२०१० रोजी दुरध्वनीव्दारे कळविलेले आहे.

**निर्णय क्र. ७४८ सदरचे आजारासाठी अर्थिक अनुदान देणेबाबत संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत तरतूद नाही. तथापि एक विशेष बाब म्हणून कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन श्रीमती नफीसा अब्दुल हाफिज बाणकोटकर, रा. मादांड, ता. तळा, जि. रायगड यांना संस्थान नियमानुसार आर्थिक अनुदान देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८ "सारेगमप लिटल चॅम्प्स" कार्यक्रमाचे आयोजनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री भगवान द वैशंपायन, यांनी त्यांचे दिनांक १५.०८.२०१० चे पत्रान्वये "सारेगमप लिटल चॅम्प्स" हा कार्यक्रम पुण्यतिथी उत्सवात दिनांक १८ ऑक्टोबर, २०१० रोजी आयोजित करणेबाबत विनंती केली असून सदर कार्यक्रमाच्या कलाकारांचे मानधन व इतर तपशिल खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं | तपशिल | मानधन रुपये |
|---|---|---|
| ०१ | लिटील चॅम्प्स (कु.मुग्धा वैशंपायन, कु.आर्या आंबेकर, कु.कार्तिकी गायकवाड, कु.प्रथमेश लघाटे,कु.रोहीत राऊत)यांचे मानधन व प्रवास खर्च | २,२५,०००/- |
| ०२ | वादक कलाकार ( श्री सत्यजित प्रभू, श्री निलेश परब, श्री अमर ओक, श्री आर्चिस लेले व श्री दत्ता तावडे ) यांचे मानधन व प्रवास खर्च | ५०,०००/- |
| ०३ | सुत्र चालक श्री कुलकर्णी यांचे मानधन व प्रवास खर्च | १२,०००/- |
| | एकूण रुपये | २,८७,०००/- |

या व्यतिरिक्त सदर कार्यक्रमास लागणारी ध्वनीक्षेपन यंत्रणा, प्रकाश योजना, रंगमंच व्यवस्था, प्रेक्षकांकरीता बैठक व्यवस्था व सुरक्षा व्यवस्था इत्यादी संस्थानमार्फत करण्यात यावी, असे कळविले आहे.

**निर्णय क्र. ७४९ यावर सविस्तर चर्चा होऊन श्री पुण्यतिथी उत्सवात दिनांक १८ ऑक्टोबर, २०१० रोजी "सारेगमप लिटल चॅम्प्स" कार्यक्रम आयोजित करण्यात यावा सदर कलाकारांचे मानधन व प्रवासखर्च रुपये २,८७,०००/- देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९ आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २००९-१० या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

"Provided also that the fund of trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [ or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ]

a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दि.३० सप्टेंबर, २०१० पर्यंत दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २००९-१० या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीने अखर्चित उत्पन्न पुढील ५ वर्षामध्ये विविध उपक्रमांवर खर्च करणेबाबतच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खाली सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणेस विनंती.

Shri Saibaba Sansthan Trust is contemplating to take up various project towards the fulfillment of its objects. The execution of these projects would take a period of 4-5 years.

The Trust is likely to generate a surplus for the accounting year ended on 31st March,2010. Such surplus could be expended for the fulfillment of these projects.

It is therefore, recommended that such surplus be set aside out of the surplus for the year, to be spent on the projects as resolved hereinafter. An application in this regard be also made to the Income Tax Assessing Officer, to set aside the funds in terms of section 11(2) of the Income Tax Act, 1961.

## RESOLUTION

" Resolved that such surplus as is available for the year ending 31st March,2010 shall be accumulated or set apart as per requirements of section 11(2) of the Income Tax Act, 1961 and shall be spent on the following objects and activities of the Trust :

*(Rs. In Crores)*

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | To provide essential services in Sai Aashram Bhakta Niwas Project other than civil work ie. Internal Roads, Gutters, Water Supply, Electricity, Plumbing, Waste Water Treatment Plant, Mattresses, Cots, Furniture, other essential materials etc | 35.00 |
| 2 | Beautification and Redevelopment of Temple Complex Project to facilitate Sai Devotees. | 100.00 |
| 3 | To develop education complex with modern and advanced amenities | 50.00 |
| 4 | To construct Bus Stand with modern facilities and Bhaktaniwas | 10.00 |
| 5 | **Sai Tech Project:** To implement Turnkey software solutions for efficient and effective management of various activities of Sansthan to provide more facilities to Sai Devotees and to increase the efficiency of work. | 15.00 |
| 6 | To purchase Land for development of various projects/ activities of the Sansthan for providing better facilities to Sai devotees | 50.00 |
| 7 | To Construct New Buildings for New Super Specialty Hospital | 100.00 |
| 8 | Contribution for Local infrastructural work within Shirdi Nagarpanchayat Limits i.e. Construction of Internal Roads, Subways, peripheral roads etc for Sai Devotees. | 50.00 |
| 9 | To purchase additional and modern Machinery, Furniture Equipments, Instruments for Hospital, Education purposes | 50.00 |

| | | |
|---|---|---|
| | and for other department of the Sansthan. | |
| 10 | To provide additional safe water supply for Sai devotees by developing new water supply scheme. | 15.00 |
| 11 | To develop Garden for Sai Devotees (Sai Garden Theme Park) | 80.00 |
| 12 | To purchase interior necessities like furniture, mattresses, machinery, TV sets etc. for Sai Aashram Project. | 25.00 |
| | TOTAL | **580.00** |

FURTHER RESOLVED THAT an application be made to the Income Tax Office seeking permission U/s 11(2) of the Income Tax Act' 1961 and a copy of this Resolution be provided along with the application for the purpose of their record ."

**निर्णय क्र. ७५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०  मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत**

**निर्णय क्र. ७५१** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये साफसफाई व्यवस्थीत होत नाही. याकरीता वैद्यकीय संचालक यांनी योग्य ती काळजी घ्यावी. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०२) लहान मुलांचे कॉकलर इनप्लॅन्ट या आजारावर शस्त्रक्रिया व उपचार संस्थानमार्फत सुरु करणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा.
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०३) श्री साईबाबा हॉस्पिटलचे नगर-मनमाड रोडचे गेट बंद करण्यात यावे.
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०४) मारुती मंदिराचे संस्थानमार्फत नुतनीकरण करण्यात आलेले आहे. या ठिकाणी पूर्वीची असलेली मूर्ती काढून नवी मूर्ती बसविण्यात आलेली असल्याने जुनी मुर्ती म्युझियम मध्ये ठेवण्यात यावी.
(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग/बांधकाम विभागप्रमुख)

०५) लंडन येथे साईभजन संध्या कार्यक्रमासाठी मा.कार्यकारी अधिकारी व एक पुजारी पाठविण्यात यावा. (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग/मुख्य लेखाधिकारी )

०६) प्रसादालय विभागाकडे प्रसाद लाडूची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. यामूळे जागा कमी पडत आहे. यासाठी जागा, माल ये-जा करण्याची वाहतूकीचा मार्ग, मोठ्या प्रमाणात दाळ दळण्याची मिल, लाडू वाळविण्यासाठी हवेशिर शेड इत्यादीसाठी प्रसादालयाजवळ जागा निश्चित करण्यात आलेली आहे. परंतू सदर जमीनीचा झोन बदलण्याची कार्यवाही चालू असलेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सांगितले. याबाबत आराखडे तयार करणेकामी श्री सुरेश बाबू, मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी. याकामी त्यांना योग्य ते मानधन देण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र ६७६ ते ७५१ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)